**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.४६/अपील क्र.६८५२/०२**

**श्री.एम.व्ही.रुपारेलिया**
**ए ५०३, रश्मी उत्सव, जंगीड इस्टेट व विजय पार्कजवळ,**
**मिरा रोड (पू), जि.ठाणे ४०१ १०७. ... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग/विसयो-२,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग/विसयो-२,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २९.०१.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ११.०७.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर.**

अपिलकर्ता यांनी दि.०३.०४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडे Information in respect of Welfare Schemes for Senior Citizens, Adoption of NPOP, 99 by State Creation of State & Council for Senior Citizens इत्यादीच्या संदर्भात एकूण सहा मुदयांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२३.०४.२०१० रोजी संबंधीत कक्ष अधिकारी यांचेकडे असलेली माहिती उपलब्ध दिलेली दिसून येते. परंतु मुद्दा क्र.२ ची माहिती जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, ठाणे व कार्यासन विसयो-१ कडे उपलब्ध आहे त्यानंतर मुद्दा क्र.३ च्या संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, ठाणे मुद्दा क्र.४ व ६ च्या संदर्भात कार्यासन सुधार १ समाजिक न्याय व विशेष सहायक विभाग, मंत्रालय, मुद्दा क्र.५ सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुद्दा क्र.७ कार्यासन आस्थापना-३ सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग यांचेकडे उपलब्ध असल्याने त्यांचेकडे अर्ज पाठविण्यात आला व माहिती ही परस्पर उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि.२९.०६.२०१० रोजी मुद्दा २ व ३ ची माहिती तहसिलदार, पालघर

कार्यालय यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यावर समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२१.०७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता हे सुनावणीस विलंबाने उपस्थित झाले. अपिलकर्ता यांनी युक्तीवादात असे सांगितले की, त्यांना काही माहिती मिळाली व इतर सर्व माहिती सामाजिक न्याय विभागात उपलब्ध असताना ती उपलब्ध करुन दिली नाही. जन माहिती आधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांना मुद्या क्र.१, २ व ३ ची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. मुद्या ४, ६ व ७ ची माहिती सामाजिक न्याय व विषेश सहाय्य विभागातील इतर कार्यासनाकडे असल्याने त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिले होते व मुद्या क्र.५ ची माहिती ही सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडे असल्याने त्यांना पत्र दिलेले होते. मंत्रालयीन विभागामध्ये सर्व साधारण धोरण ठरत असते व त्या बद्दलची माहिती त्यांना दिलेली आहे. अमंलबजावणीतील सांखिकी माहिती ही त्या त्या प्रशासकीय स्तरावर उपलब्ध असते व त्यामुळे त्यांना तसे कळविले होते. परंतु जन माहिती अधिकारी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी त्यांच्याच विभागातील इतर कार्यासनांनी माहिती दिली किंवा नाही हे त्यांना माहिती नाही असे सांगितले. वास्तविक एकाच सार्वजनिक प्राधिकरणामध्ये, अनेक शाखांमध्ये माहिती जर उपलब्ध असेल तर ती संकलीत करुन द्यावी किंवा त्या त्या कार्यासनाने माहिती दिली किंवा नाही याबाबत पाठपुरावा त्यांनी करणे आवश्यक आहे. ज्या माहिती अधिका-यांकडे अर्ज हस्तांतरित होतो ते कधीच माहिती देत नाही असा आयोगाचा अनुभव आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी हे त्याच कार्यालयामध्ये वरिष्ठ अधिकारी असल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अर्जाचे हस्तांतरण केले असल्यास त्याच कार्यालयातील कार्यासनांनी माहिती दिली किंवा नाही ही बाब प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस पडताळून पाहणे आवश्यक असते. परंतु प्रथम अपिलीय प्राधिकारी हे वरिष्ठ अधिकारी असले तरी त्यांचे कार्यालयातील माहिती अधिका-यांनी माहिती द्यावी अशा प्रकारचा निरर्थक असा आदेश पारित करत असतात किंवा त्यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी अर्ज हस्तांतर केला आहे तो योग्य आहे असा निर्णय देत असतात. परिणामी अर्जदारास कोणतीही माहिती उपलब्ध होत नाही. प्रथम अपिलाची सुनावणी घेताना दूरध्वनी वरुन संपर्क साधुन सुनावणीस बोलावणे या बद्दलही कोणताही पुरावा सादर करता येत नसल्याने अशा प्रकारची कार्य

पध्दती अवलंबिने म्हणजेच योग्य पध्दतीने काम करणे नव्हे, कोणत्याही अपीलाची सुनावणी घेताना अपिलार्थी व अर्जदार व माहिती अधिकारी हे उपस्थित राहतील या दृष्टीने नोटीस व सुनावणीची तारीख यामध्ये कमीत कमी वीस दिवसांचा तरी कालावधी आवश्यक आहे. सुनावणीस बोलविण्यात आले परंतु हजर झाले नाही अशा प्रकारची सबब सांगणे योग्य नाही.

३. अपिलकर्ता यांना मुद्या क्र.४, ६ व ७ ची माहिती जन माहिती अधिकारी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी उपलबध करुन देणे संयुक्तिक राहील. मुद्दा क्र. ५ संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शास्ती लादणे संयुक्तीक राहील. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत मुद्दा क्र. ४, ६ व ७ ची माहिती विनामूल्य रजिष्टर पोस्टाने जन माहिती अधिकारी, कार्यासन सुधार १ व कार्यासन आस्थापना ३, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी उपलब्ध करुन द्यावी.**

**२. मुद्दा क्र.७ ची माहिती ही जन माहिती अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी उपलब्ध करुन दिलेली नसल्याने त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते व अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत विनामूल्य रजिष्टर पोस्टाने माहिती उपलबध करुन द्यावी.**

**३. माहिती अधिकारी कार्यासन सुधार-१, कार्यासन आस्थापना-३ याचेंविरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.**

**४. सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय यांचेकडे व एक प्रत प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय यांचेकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.**

**३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ११.०७.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.५१/अपील क्र.६८५५/०२**

**श्री.के.सुधाकर रेड्डी**
**व्दारा-व्ही.बी.तिवारी आणि कं.,**
**४६ इस्लाम बिल्डींग, १६ ए,**
**१ ला मजला, अकबर अलीच्या समोर,**
**व्ही.एन.रोड, फोर्ट, मुंबई ४०० ०२३. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष**
**पिपल्स एज्युकेशन सोसायटी,**
**तळ मजला, आनंद भवन, डॉ.डी.एन.रोड,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य**
**सिद्धार्थ कॉलेज ऑफ लॉ,**
**३ रा मजला, आनंद भवन, डॉ.डी.एन.रोड,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १०.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ११.०७.२०११**
**अपिलकर्ता गैरहजर, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.०९.२०१० रोजी, प्राचार्य, सिदधार्थ विधी महाविद्यालय यांचेकडे प्राचार्य यांची सेवा विषयक माहिती मागितली आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.२१.१०.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपील हे पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्याने व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे व त्यांना माहिती मिळाली नाही म्हणुन कारण दिलेले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य हजर आहे व अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणताना सांगितले की, अर्जदार श्री.के.एस रेड्डी, हे महाविद्यालयात

सहा.प्राध्यापक आहेत व ते कोणत्याही प्रकारची शिस्त पाळत नाहीत. नियम पाळत नाही व प्राचार्य म्हणुन त्याबद्दल त्यांना विचारणा केल्यास माहितीच्या अधिकारातील अर्ज टाकून वेगवेगळ्या प्रकारची माहिती मागत असतात. त्यांच्या विरुध्द कोणकोणत्या प्रकारचे आरोप आहे त्याबद्दल दि.२१.१०.२०१० च्या अर्जामध्येच संपूर्ण नमूद करुनच त्यांना माहिती सुध्दा दिलेली आहे. स्वत: रोज मस्टरवर सही करतात व पुन्हा तीच माहिती मागतात व निरिक्षण करा सांगितल्यास करत नाहीत. त्यांचे विरुध्द कमीत कमी बारा आरोप आहेत व ते त्यांना दिलेल्या उत्तरातसुध्दा नमूद केलेले आहेत. राज्य माहिती आयोगाकडे अपिल क्र.२०१०/६०७५/०२ चा निर्णय दि.३०.०६.२०१० रोजी झालेला असून अपिलकर्ता यांना माहिती दिली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते व यावरुनच प्राचार्य यांच्या म्हणण्यामध्ये तथ्य दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ज्या हेतूने पारित करण्यात आला आहे त्या हेतूशी विसंगत असे अर्जदाराचे अर्ज दिसून येतात. कोणत्याही कार्यालयास स्वहितासाठी वेठीस धरणे हा या अधिनियमाचा उद्देश निश्चितच नाही. माहितीचा अधिकार हा प्रशासनास जबाबदारपणा पारदर्शकता आणण्यासाठी दिला आहे. अधिकार दिला आहे म्हणुन विनाकारण माहिती मागणे हे गैर आहे तसेच आकस म्हणून माहिती मागणे सुध्दा गैर आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**

**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**

**(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ११.०७.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/नोंदणी क्र.४७/अपील क्र.६८५३/०२

श्री.जितेंद्र रामकृष्ण जगताप
घर क्र.१६०/१/४, रेल्वे इमारत क्र.१७८ च्या बाजूला,
तीन बंगला, खार (पू), मुंबई ४०० ०५१. ... अपिलार्थी

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक
नागरी संरक्षण संचालनालय,
जुने सचिवालय जोड इमारत,
फोर्ट, मुंबई ४०० ०३२. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त नियंत्रक
नागरी संरक्षण, बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडई इमारत,
३ रा मजला, माता रमाबाई आंबेडकर मार्ग,
मुंबई ४०० ००१.

## निर्णय

**व्दितीय अपीलाचा दिनांक १०.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ११.०७.२०११**

**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेवतीने श्री.वाकडे प्रशासकीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१७.०५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी नागरी संरक्षण दल यांचेकडे सन २००७ ते २००९ या कालावधीतील एच/इ विभागा संबधित तसेच जितेंद्र जगताप म्हणजे स्वत: अर्जदार यांचेविरुध्द पाठविलेल्या अहवालाच्या संदर्भात व इतर मुद्याच्या संदर्भात एकूण १२ मुद्यामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने खर्चाचा भरणा रू.२३४०/- भरावा असे त्यांना दि.१९.०६.२०१० रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. अपिलकर्ता यांनी दि.२३.०९.२०१० रोजी खर्चाचा भरणा केलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.२५.११.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२५.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.१५.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांचे म्हणने ऐकूण घेतले व माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितलेकी, त्यांचेकडून रू.२३४०/- भरणा करुन घेतला. त्यांनी माहिती जी मागितली ती एच/इ विभागाची माहिती मागितली होती. मात्र ती न देता त्यांना इतरच

विभागाची माहिती जी त्यांनी मागितली नव्हती ती दिली आहे व त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात नस्तीचे निरीक्षण सुध्दा देत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलकर्ता यांना आता पर्यंत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. त्यावर पुन्हा अपिलकर्ता यांनी त्यांना उपलब्ध करून दिलेली माहिती आयोगाच्या निदर्शनास आणली व ती माहिती त्यांनी मागितलेली नाही हे ही त्यांना आयोगास दाखविले.

३. वास्तविक ही बाब प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी पडताळून पाहणे आवश्यक होते. परंतु त्यांनी प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला नाही व अपिलकर्ता यांचे म्हणने ऐकून घेतले व माहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी असे आदेश स्वत: हस्ताक्षरात दिलेले दिसून येतात. कोणताही कारणमिमांसा देणारा आदेश दिला नाही त्यामुळे अपिलकर्ता यांना व्दितीय अपील दाखल करावे लागले आहे असे दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी केलेला खर्चाचा भरणा रू.२३४०/- हे त्यांना परत करणे संयुक्तीक राहिल तसेच अर्जाचे वाचन करून अर्जात मागितलेली माहितीची कागदपत्रे विनामूल्य उपलब्ध करून देणे संयुक्तीक राहील याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.१७.०५.२०१० च्या अर्जात मागितलेली मुद्दयेनिहाय माहिती ही विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करून द्यावी.**

**२. अपिलकर्ता यांना रू.२३४०/- हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आत परत करण्यात यावे. तसे न केल्यास विद्यमान माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.**

**३.प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज वाचून जन माहिती अधिकारी यांनी काय माहिती दिली याबाबतची पडताळणी करून कारण मिमांसा देणारे निर्णय द्यावेत. निरर्थक निर्णय देउ नये.**

**४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ११.०७.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/नोंदणी क्र.४८/अपील क्र.६८५४/०२

श्री.जितेंद्र रामकृष्ण जगताप
घर क्र.१६०/१/४, रेल्वे इमारत क्र.१७८ च्या बाजूला,
तीन बंगला, खार (पू), मुंबई ४०० ०५१. ... अपिलार्थी

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक
नागरी संरक्षण संचालनालय,
जुने सचिवालय जोड इमारत,
फोर्ट, मुंबई ४०० ०३२. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त नियंत्रक
नागरी संरक्षण, बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडई इमारत,
३ रा मजला, माता रमाबाई आंबेडकर मार्ग,
मुंबई ४०० ००१.

निर्णय

व्दितीय अपीलाचा दिनांक १०.१२.२०१०
सुनावणीचा दिनांक ११.०७.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेवतीने श्री.वाकडे प्रशासकीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली आहे व त्यांची कोणतीही तक्रार नाही व अपील मागे घेण्यास विनंती अर्ज करण्यात आला असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

Sd--
(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ११.०७.२०११
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.३६/अपील क्र.६८६०/०२**

**श्री.शंभू सरण सक्सेना**
**रूम नं.१०१४, मुळेबाई चाळ, रामगड नगर,**
**गोशाळा रोड, मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०. ... अपिलार्थी**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त, टी विभाग कार्यालय,**
**देवीदयाळ रोड, मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त, टी विभाग कार्यालय,**
**देवीदयाळ रोड, मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०४.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १२.०७.२०११**
**अपिलकर्ता गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर आहे.**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर आहे.**

अपिलकर्ता यांनी दि.०९.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी टी वॉर्ड यांचेकडे मिस्तु मार्बल कंपनीला बांधकामाच्या संदर्भामध्ये परवानगी दिली आहे काय, दिलेली असल्यास कागदपत्रे किंवा दिलेली नसल्यास अनधिकृत बांधकामाचे विरूध्द कोणती कारवाई किती दिवसात करणार अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.०१.१०.२०१० रोजी मुदयेनिहाय माहिती उपलब्ध करून दिली असून कागदपत्रांच्या करिता खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दि.०१.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.११.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी विहित शुल्क भरल्यावर मुळ अर्जावर मागितलेल्या कारवाई संबंधिची माहिती १५ दिवसांचे आत देण्यात यावी असे आदेश दिलेले

दिसून येतात.  परंतु त्यानंतर ही माहिती मिळाली नाही म्हणुन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे.  जन माहिती अधिकारी हे हजर असून त्यांनी अपिलकर्ता यांना ५ पृष्ठे उपलब्ध करुन दिलेली असून त्याबद्दलची पोच त्यांनी दिलेली आहे असे आयोगाच्या निदर्शनास आणल्याने सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १२.०७.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

१. निवडनस्ती,
२. स्वीय सहाय्यक

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.१०३५ /अपील क्र.६८७९/०२**

**श्री.अश्विन जयवंत मोरे**
**प्लॉट क्र.२९/सी/५, बैंगणवाडी,**
**शिवाजी नगर क्र.२, गोवंडी,**
**मुंबई ४०० ०४३.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव**
**नियोजन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**नियोजन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ११.०२.२०११**
**सुनावणीचा दिनांक १२.०७.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०९.१२.२०१० रोजी अर्जदार लिपीक टंकलेखक यांनी नियोजन विभागास टंकलेखनाचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत वाढ मिळण्याबाबत दि.२०.११.२००७ च्या अर्जान्वये विनंती केली होती. त्या निवेदनावर सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या कार्यवाहीच्या अभिप्रायाच्या संपूर्ण झेरॉक्स प्रती तात्काळ देण्यात याव्या अशी शिघ्र नोंदणीकृत टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२९.१२.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.१९.०१.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०१.०२.२०११ रोजी देण्यात आला असून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी नियोजन विभागास केलेला मुदत वाढ मिळण्याबाबतचा अर्ज नियोजन विभागाने गृह विभागाप्रमाणे सामान्य प्रशासन विभागास मुदत मिळण्यासाठी, अभिप्रायासाठी पाठविलाच नाही. त्याबद्‌दल योग्य ती कारवाई व्हावी, अशी त्यांनी आयोगाकडे विनंती केली. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सामान्य प्रशासन विभागाकडे अर्ज किंवा निवेदन हे त्यांचे अभिप्राय उपलब्ध करुन घेण्यासाठी पाठविण्यात यावी अशी कोणतीही तरतुद नाही व त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाकडील अभिप्राय नस्तीमध्ये आढळून येत नाही व ती माहिती त्यांना मुदतीत दिली आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहितीच्या पेक्षा त्यांच्या प्रकरणात आयोगाने कारवाई करावी अशी त्यांची अपेक्षा दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे च्या स्वरुपात माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन देता येते. कोणत्याही प्रकारची कारवाई करावी असे आदेश देउन माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. माहिती उपलब्ध झाल्यानंतर त्या माहितीच्या आधारावर त्या विषयासंदर्भामध्ये योग्य त्या सक्षम अधिका-यांकडे तक्रार करणे संयुक्तीक असते. या प्रकरणात अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध असल्याने सदरचे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १२.०७.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रत प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.३९/अपील क्र.६८६२/०२**

**श्री.कमलाकर रत्नाकर शेणॉय**
**२/१३, आदिनाथ को.ऑ.सो,**
**इल्लीकडुरी शाळेसमोर,**
**माझगांव, मुंबई ४०० ०१०.** **... अपिलार्थी**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०७.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १२.०७.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित आहे.**

अपिलकर्ता यांनी दि.२९.०९.२०१० रोजी माहिती अधिकारी गृह मंत्री कार्यालय यांना १८ महिन्यापासून आदेशांकरिता मा.गृह मंत्री यांचेकडे भ्रष्टाचार निर्मुलन कायदयाच्या खाली विधी व न्याय विभागाने मार्च २००९ मध्ये जे अभिप्राय दिलेले असून सुध्दा कारवाई झालेली नाही त्या संदर्भामध्ये नस्ती मधील टिपणी पत्र व्यवहार व पी.ओ.एल-२ ने कोणत्या प्रकारची कारवाई केली त्याबद्‌दलची संपूर्ण माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतील माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी दि.३०.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णय नंतर समाधान न झाल्याने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, सिडको कडून अनेक इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले. त्याबद्‌दल त्यांनी तक्रार केली होती. परंतु त्यांच्या तक्रारीची अदयापही दखल घेतली जात नाही व कारवाई सुध्दा केली जात नसल्यामुळे त्यांनी माहितीच्या अधिकाराच्या

तरतुदीप्रमाणे माहिती मागितली आहे. परंतु सदरची माहिती अदयाप पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली नाही. मात्र दि.०८.११.२०१० रोजी अर्जातील विषयातील संबंधित त्या विभागाची नस्ती पुढील कार्यवाहीसाठी नगर विकास विभागाकडे हस्तांतरण करण्यात आली आहे व त्याप्रमाणे त्या कार्यालयाशी संपर्क साधुन माहिती उपलब्ध करुन घेणे योग्य राहील असे कळविले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, मुळ नस्ती ही नगर विकास विभागाची आहे. गृह विभागाच्या कार्यवाहीनंतर ती नस्ती नगर विकास विभागाकडे हस्तांतर होउन पुढील कार्यवाही ही नगर विकास विभागानेच करावयाची असल्याने त्यांना तसे कळविण्यात आले होते व अदयाप पर्यंत त्या नस्तीमधील प्रकरणात नगर विकास विभागाने सुध्दा कोणतीही कारवाई केली नाही व सदरची नस्ती ही अनावधानाने पुन्हा गृह विभागाकडे आली आहे. असे असल्यास गृह विभागाने त्यांच्या विभागात जी टिप्पणी झालेली आहे. त्या टिपणीची प्रत अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील व नगर विकास विभागाकडे अपिलकर्ता यांनी स्वतंत्र पणे माहिती मागणे संयुक्तीक राहील. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात जी माहिती अभिलेखे, कागदपत्रे, दस्तेएवज, च्या स्वरुपात जशी आहे तशी उपलब्ध होते. विशिष्ट प्रकरणामध्ये कारवाई केली जात नाही याकरिता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीमध्ये कारवाईचे आदेश देण्याचे कोणतीही तरतुद नाही. मात्र गृह विभागातील टिपणीच्या संदर्भात अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजुर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपील अशंत: मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून जन माहिती अधिकारी, गृह विभाग यांनी त्यांच्या विभागातील संबंधित टिपणीची प्रत १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांना रजिष्ट्रर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**
**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १२.०७.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.३७/अपील क्र.६८६१/०२**

**श्री. अंकुश व्यंकट दावत**
**फादर ॲग्नेल टेक्नीकल हायस्कूल आणि ज्यू कॉलेज,**
**बॅन्डस्टँड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.** **... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग (व्यशि-४),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग (व्यशि-४),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०७.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १२.०७.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकोरी उपस्थित व**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थिक्त**

अपिलकर्ता यांनी दि.११.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचेकडे त्यांच्या दि.०७.१२.२००९ च्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती दोन मुदयामध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१८.०८.२०१० रोजी मुदयेनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामध्ये मुद्दा क्र.१ च्या संदर्भात खर्चाचा भरणा करावा व मुद्दा क्र.२ च्या संदर्भात माहिती गोपनीय असल्याने ती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले व त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने दि.०९.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०४.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता हे सुनावणीस हजर न राहिल्याने त्यांचा प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात आला व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना चौकशी अहवालाची प्रत ही गोपनीयतेच्या कारणास्तव नाकारण्यात आलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तक्रारीच्या संदर्भामध्ये प्राथमिक चौकशी अहवाल झालेला आहे व त्या प्राथमिक चौकशी अहवालाच्या आधारावर पुढील चौकशी संदर्भात निर्णय घेण्यात येतील. परंतु अदयाप पर्यत तशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला नसल्याने प्राथमिक चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिल्यास पुढील चौकशीवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असल्याने सदरचा चौकशी अहवाल हा गोपनीय आहे या कारणास्तव अधिनियमाचे कलम ८(१) (ज) प्रमाणे नाकारण्यात आलेला आहे. परंतु चौकशीची प्रक्रिया संपूर्ण झाल्यावर व निर्णय झाल्यावर अपिलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिली जाईल असे आयेगास जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. असे असल्यास अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजुर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१. अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांच्या दि.०७.१२.२००९ च्या तक्रारीच्या संदर्भामध्ये संपूर्ण चौकशी झाल्यानंतर झालेल्या निर्णयाची माहिती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने त्यांना कळविण्यात यावी. तशी ती कळविली नाही तर त्यावेळेस जे माहिती अधिकारी असतील ते शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**

**(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १२.०७.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.७९/अपील क्र.६८६५/०२**

**श्री.बालमुकूंद सी.त्रिवेदी**
**सी-२, मोदी नगर, माथुरदास रोड,**
**कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त,**
**आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**एस.व्ही.पी जलतरण तलावाजवळ,**
**एम.जी.क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (मेंटेंनन्स)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त,**
**आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**एस.व्ही.पी जलतरण तलावाजवळ,**
**एम.जी.क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १३.१२.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १३.०७.२०११**

**अपिलकर्ता हजर, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर.**

अपिलकर्ता यांनी दि.०१.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, वॉर्ड ऑफिस, आर/साउथ वॉर्ड, मनपा, MGX रोड नं.२ यांचेकडे रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या संदर्भामध्ये गेल्या पाच वर्षाच्या कालावधीतील कोणते अधिकारी जबाबदार आहेत. या संदर्भामध्ये तपशिलामध्ये एकूण १० मुदयांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती ही मोघम आणि अतिशय

व्यापक प्रमाणात असल्याने व्यक्तीश: निरीक्षण करुन पाहिजे असलेली माहितीच्या कागदपत्रांची प्रती पृष्ठ रु.२/- चा खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.०४.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०३.०१.२०११ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध आहे ती द्यावी. तसेच तपशिलातील माहिती करिता अपिलकर्ता यांना निरीक्षणास बोलवावे असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि.०९.०७.२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाप्रमाणे सर्व कागदपत्रांचे निरीक्षण करावे व त्यातुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. प्रथम अपिलीय प्रगाधिकारी यांच्या आदेशापूर्वी अनेक वेळा निरीक्षणाकरिता बोलविण्यात आले होते परंतु अपिलकर्ता हजर राहिले नाहीत. त्यामुळे पुन्हा आपण निरीक्षणासाठी यावे व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु निरीक्षण न करता अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, मागितलेली माहिती ही त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी निरीक्षणास बोलवून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविल्यामुळेच निरीक्षण करण्यास गेले नाहीत. त्यावर जन माहिती आधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागिल पाच वर्षातील माहिती जी मागितली आहे ती अतिशय व्यापक प्रमाणात आहे. त्या संदर्भातील हजारो पृष्ठ आहेत व त्यातुन अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती काढून किंवा तयार करुन देणे शक्य नाही. त्यामुळे त्यांना निरीक्षण करण्याकरिता कळविण्यात आले होते.

त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या अवलोकन केले असता साउथ/आर वॉर्ड मधील सर्व रस्त्यांच्या संदर्भामध्ये गेल्या पाच वर्षात वेळोवेळी केलेल्या कामाच्या संदर्भामध्ये माहिती दयावयाची झाल्यास ती प्रथम दर्शनिच अतिशय व्यापक प्रमाणात आहे, असे दिसून येते. अर्जादारांना कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजाच्या कार्यपध्दतीची माहिती जाणुन घेणे, आवश्यक वाटत नाही व माहितीचा अधिकार मिळालेला आहे म्हणुन त्या संदर्भातील कोणत्याही प्रकारचा विचार न करता माहिती मागितली जाते. वास्तविक माहितीचा अधिकार एखादया विशिष्ट प्रकरणाच्या संदर्भात किंवा प्रकल्पाच्या संदर्भात माहिती मागणे आणि कोणत्याही प्रकारचे वर्णन न करता गेल्या पाच, दहा वर्षातील

कामकाजासंदर्भातील माहिती मागणे यात अर्जदारास काहीही फरक वाटत नाही हा त्या अधिकाराचा गैरवापरच आहे. परंतु अशा प्रकारे मोघंम माहिती मागितली असली तर त्या माहितीच्या संदर्भातील जेव्हढी कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्रांच्या अंदाजे पृष्ठ संख्या कळवून प्रती पृष्ठ रू.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे कळविले किंवा अधिनियमामचे कलम २(त्र) प्रमाणे निरीक्षण किंवा तपासणी करणे असे पर्याय आहे व त्या प्रमाणेच दुसरा पर्याय हा जन माहिती अधिकारी यांनी कळविलेला असल्याने त्यांप्रमाणे अपिलकर्ता यांनी निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. कागदपत्रांमधुन माहिती काढून देणे अपेक्षीत नसल्याने अपिलकर्ता यांना निरीक्षण करावयाचे नसल्यास त्या संदर्भातील गेल्या पाच वर्षातीलची कागदपत्रे उपलब्ध असतील त्या सर्व कागदपत्रांची छायांकित प्रती पृष्ठ २/- प्रमाणे अपिलकर्ता यांनी घेणे संयुक्तीक राहिल. जन माहिती अधिकारी यांनी योग्यरित्या कळविले असल्याने अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**

**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**

**(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १३.०७.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/नोंदणी क्र.८०/अपील क्र.६८६६/०२

श्री.बालमुकूंद सी.त्रिवेदी
सी-२, मोदी नगर, माथुरदास रोड,
कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७. ... अपिलार्थी

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा पालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका,
सहाय्यक पालिका आयुक्त,
आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
एस.व्ही.पी जलतरण तलावाजवळ,
एम.जी.क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प),
मुंबई ४०० ०६७. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा मेडीकल अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका,
सहाय्यक पालिका आयुक्त,
आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
एस.व्ही.पी जलतरण तलावाजवळ,
एम.जी.क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प),
मुंबई ४०० ०६७.

निर्णय

व्दितीय अपीलाचा दिनांक १३.१२.२०१०
सुनावणीचा दिनांक १३.०७.२०११
अपिलकर्ता हजर, जन माहिती अधिकारी हजर आहेत व
प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर आहे.

अपिलकर्ता यांनी दि.०१.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, वॉड ऑफिस, आर/साउथ वॉर्ड, MOH विभाग यांचेकडे Complaint Ref No.ACRS/2103 mon dt 19.04.2006 तसेच MOHR/s 77/dt.05.05.2006 च्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती व अधिका-यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.०१.१२.२०१० रोजी माहिती उपलब्ध करून दिलेली

दिसून येते.  परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.०८.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.  प्रथम अपीलचा निर्णय हा दि.०२.१२.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी डॉ.बजाम यांनी विना मुल्य माहिती उपलब्ध करुन दयावी असे दिलेले दिसून येतात.  परंतु त्या नंतर सुध्दा माहिती दिलेली दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी वॉर्निंग लेटरवर कोणत्या प्रकारची कारवाई झाली याबद्दलची माहिती मागितली होती.  परंतु तशी माहिती उपलब्ध करुन न देता त्यांना फक्त वॉर्निंग लेटरची प्रत दिली आहे.  यावरुन जन माहिती अधिकारी यांनी एकतर अर्जात काय मागितले आहे हे संमजून घेतले नाही किंवा त्यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केली आहे.  प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुध्दा आदेश देउन ही त्यांनी माहिती दिलेली नाही.  प्रथम अपिलाच्या निर्णयात डॉ बजाम यांनी असे सांगितलेले दिसून येते की, अपिलकर्ता यांनी सारखेच दोन अर्ज दाखल केले होते व एका अर्जाची माहिती दिली मात्र चुकून दुस-या अर्जाची माहिती दिली गेली नाही.  असे असले तरी माहिती अपूर्ण दिली आहे हे निश्चित दिसून येते.  जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना कार्यवाही झालेल्या अहवालाची प्रत देण्यात आलेली नाही.  ती उपलब्ध करुन देता येईल.  यावरुनच जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.  त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे.  त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांना त्यांचे दि.०१.१०.२०१० च्या अर्जातील मुद्दा क्र.१ ची माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२. अपिलकर्ता यांच्या दि.०१.१०.२०१० च्या अर्जाप्रमाणे तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाप्रमाणे सुध्दा मुद्दा क्र.१ प्रमाणे कारवाई अहवालची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येते.  सदरची शिस्तभंगाची कारवाई ही सक्षम अधिका-यांनी**

करावयाची असल्याने सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, मनपा यांचेकडे कारवाईसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.

Sd--

(विलास पाटील)

राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १३.०७.२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव

राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.७८/अपील क्र.६८६४/०२**

**श्री.बालमुकूंद सी.त्रिवेदी**
**सी-२, मोदी नगर, माथुरदास रोड,**
**कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७. ... अपिलार्थी**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. पालिका आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त,**
**आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**एस.व्ही.पी जलतरण तलावाजवळ,**
**एम.जी.क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (परवाना)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त,**
**आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**एस.व्ही.पी जलतरण तलावाजवळ,**
**एम.जी.क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १३.१२.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १३.०७.२०११**

**अपिलकर्ता हजर, जन माहिती अधिकारी हजर व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर आहे.**

अपिलकर्ता यांनी दि.०१.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, वॉड ऑफिस, आर/साउथ वॉर्ड, वरिष्ठ निरीक्षक, एल.आय.सी. विभाग यांचेकडे दि.१२.०४.२००६ च्या तक्रारींच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.२९.११.२०१० रोजी उपलब्धं करून दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.०८.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०३.१२.२०१० रोजी देण्यात आला असून अधिक्षक, अनुज्ञप्ती यांनी

माहिती उपलब्ध करुन दयावी असे आदेश दिलेले दिसून येतात व त्यानंतर ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये ३(g) (h) या मुद्दयांच्या संदर्भामध्ये कोणतेही रेकॉर्ड नाही असे कळविलेले असल्यामुळे त्यांनी प्रथम व व्दितीय अपील दाखल केलेले आहे. त्यावर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, एखादया निरीक्षकाच्या संदर्भामध्ये त्यांनी किती तक्रारी हाताळल्या व किती तक्रारींवर कारवाई केली अशी तयार माहिती उपलब्ध नसते. तसेच प्रत्येक अधिका-यांच्या संदर्भामध्ये तशी सांख्यीकी माहिती सुध्दा काढलेली नसते. कारण एका तक्रारींची प्रक्रिया ही अनेक कर्मचारी व अधिकारी यांचेकडून हाताळली जाते. मात्र आलेल्या तक्रारींच्या संदर्भातील कारवाई सहीत सर्व कागदपत्रे उपलब्ध असतात व त्या सर्व कागदपत्रांमधुन माहिती काढून देणे किंवा तयार करुन घेणे हे अपेक्षित नाही. त्यामुळे त्या संदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येतील. असे असल्याने सदरचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांना श्री.अवसरे यांच्या कालावधीतील दाखल झालेल्या तक्रारी व त्यावरील कार्यवाहीची उपलब्ध असलेली कागदपत्रे विना मुल्य निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी व त्यातुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विना मुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.**
**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १३.०७.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.७७/अपील क्र.६८६३/०२**

**श्री.बालमुकूंद सी.त्रिवेदी**
**सी-२, मोदी नगर, माथुरदास रोड,**
**कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७.** **... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त,**
**आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**एस.व्ही.पी जलतरण तलावाजवळ,**
**एम.जी.क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त,**
**आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**एस.व्ही.पी जलतरण तलावाजवळ,**
**एम.जी.क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १३.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १३.०७.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०१.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, आर/साउथ वॉर्ड, मनपा, सहा.अभियंता (इ व का) यांचेकडे श्री.एस.के.पाठारे, वकील यांनी दि.२६.०२.२००७ रोजी दिलेल्या तक्रारींच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली त्याबद्दलची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.११.१०.२०१० रोजी अर्जातील मुद्दा क्र.१, ४ व ५ च्या संदर्भामध्ये कागदपत्रांमध्ये माहिती उपलब्ध नाही. २००७ मध्ये कर्मचारी कार्यरत होते त्यांची आता बदली झाली आहे. तरी सुध्दा श्री.मिश्रा यांनी त्यांची राहण्याची जागा ही व्यापारी वापराकरिता बदललेली असल्याने त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे व त्या संदर्भामध्ये माहिती पाहिजे असल्यास प्रति पृष्ठ रु.२/- प्रमाणे खर्चाचा

भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२७.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०३.०१.२०११ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी तक्रारींवर काय कार्यवाही केली याबद्दलची माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाली मात्र श्री.पाठारे यांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या संदर्भामध्ये झालेल्या कारवाईची माहिती दिली नाही तसेच श्री.पाठारे यांचा तक्रार अर्ज हा दि.२६.०२.२००७ रोजी सहा.आयुक्त, आर/दक्षिण यांचे कार्यालयामध्ये नोंदणी होउन सुध्दा उपलब्ध नाही असे सांगितले. त्यामुळे ज्या अधिका-यांने सदरच्या तक्रारींची नोंद नोंदवहीमध्ये घेतलेली नाही व कार्यवाहीसाठी सुध्दा ती तक्रार आढळून येत नाही ही बाब बेजबाबदार असल्याने दि.२६.०२.२००७ रोजी नोंदणी कक्षामध्ये जे कर्मचारी कार्यरत असतील त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

<u>**आदेश**</u>

**१. अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून नोंदणी कार्यालयातील तत्कालीन अधिकारी किंवा कर्मचारी जो नोंदणीस जबाबदार असेल त्या अधिका-यांच्या विरुध्द जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कारवाई करावी व तशी कारवाई झाल्यावर अपिलकर्ता यांना कळवावी.**
**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १३.०७.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.८४/अपील क्र.६८७४/०२**

**श्रीमती.स्मिता सदानंद पराडकर**
**५०/११६४, सुशांत को.ऑ.हौ.सोसा., (मर्या)**
**कन्नमवार नगर क्र.१, विक्रोळी (पू),**
**मुंबई ४०० ०८३.**

**श्री.नारायण भिकाजी परब**
**१७२/ब/५७५५, वन्दे -पुष्पा को.ऑ.हौ,**
**कन्नमवार नगर क्र.१, विक्रोळी (पू),**
**मुंबई ४०० ०८३.** **... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**तहसिलदार-कुर्ला (मुलुंड) यांचे कार्यालय**
**टोपीवाला कॉलेज इमारत, १ ला मजला,**
**सरोजिनी नायडू रोड, मुलुंड (प),**
**मुंबई ४०० ०८०.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिलदार-कुर्ला (मुलुंड) यांचे कार्यालय**
**टोपीवाला कॉलेज इमारत, १ ला मजला,**
**सरोजिनी नायडू रोड, मुलुंड (प),**
**मुंबई ४०० ०८०.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १३.१२.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १४.०७.२०११**

**अपिलकर्ता हजर, जन माहिती अधिकारी गैरहजर व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेवतीने नायब तहसिलदार हजर आहेत.**

अपिलकर्ता यांनी दि.०४.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (कुर्ला-मुलुंड) यांचेकडे सर्वे क्र.३८० या जागेची बिनशेतीसारा देण्यात येणारी पावती अर्जदारांचे नावे मिळण्याबाबत माहिती एकूण ३ मुद्दयांमध्ये मागिलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.०८.०९.२०१० रोजी मंडळ अधिकारी घाटाकोपर तथा माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या

माहिती मुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.०४.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.२१.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपील निकाली काढण्यात आलेले असल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, मौजे मुलुंड तालुका कुर्ला येथील सर्वे क्र.३८० या जागेची बिनशेतीसारा पावती त्यांचे नावे मिळत असताना ती दुस-याच्या नावे झाल्याने तसेच दि.१९.०१.२००९ रोजी दिलेल्या अर्जावर घेतलेल्या निर्णयाची साक्षांकित प्रत तसेच दि.२१.११.२००३ रोजी दिलेली पावती क्र.१३-१४७९२ त्यांचे नावे असताना नवीन पावती बनवली त्याबद्‌दलच्या सर्व प्रती व्यक्तीश: मागितल्या होत्या. त्यावर त्यांनी त्याचे नावे बिनशेती थकबाकी खाते असल्याचे दिसून येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यासंदर्भात अपिलकर्ता यांनी आयोगापुढे त्यांनी भरलेल्या सा-याच्या पावत्या दाखविल्या त्यावर त्याचे स्वत:चे नाव आहे व त्यावर भगवानदास जमनादास असे ही आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे कार्यालयातील बिनशेती आदेश क्र.ATN/NA/KRL-7986 दि.२०.०१.१९९८ अन्वये मौजे मुलुंड सर्वे नं.३८० या जागेचा बिनशेती आदेश श्रीमती.सविता कालीदास यांचे नावे पारित झालेले आहेत. त्यानंतर कार्यालयाचे शुध्दीपत्रक दि.२०.११.२००३ अन्वये बिनशेती आदेश श्री.नारायण भिकाजी परब यांचे नावे पारित झालेला आहे. अनधिकृत वापराबाबतची त्यांचे कार्यालयाची कार्यवाही संपले असल्याने त्यापुढे कार्यालयाकडून बिनशेती कर वसून केला जात नाही. दि.२१.११.२००३ च्या शुध्दीपत्रकांन्वये सौ.पराटकर यांचे नावे पावती देण्यात आली आहे. त्यानंतर कार्यालयामार्फत कोणताही आदेश पारित केलेला नाही. दि.१९.०१.२००९ ची पावती कार्यालयामार्फत देण्यात आलेली नाही असे आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु अपिलकर्ता यांनी आयोगापुढे खरेदी करारपत्र दाखविले त्यामध्ये त्यांनी सविता टाक यांचेकडून जमिनीवरील बांधकाम हे खरेदी केलेले दिसून येते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी सर्वे नं.३८० सात बारा दाखविला असता त्यावर मात्र भगवानदास जमनादास यांचे नाव आहे. त्याबाबत तहसिलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, श्रीमती.सविता भगवानदास टाक यांचेकडून खरेदी खताव्दारे विकत घेतली असून तरी त्यांचे नाव अदयाप पर्यंत त्या जमिनीस लावण्यात आले नाही. त्याकरिता त्यांनी महाराष्ट्र जमिन महसुल सहिता

१९६६ च्या कलम ४७ प्रमाणे मा.जिल्हाधिकारी किंवा अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार स्वरुपातील अपील दाखल करणे आवश्यक आहे. मात्र मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यांत येत आहे.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १४.०७.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.८१/अपील क्र.६८७१/०२**

**श्रीमती. मोती बी.ईरानी,**
**पिरोजा मेन्शन, फ्लॅट नं.४०, दुसरा मजला,**
**अलिभाई प्रेमजी मार्ग, ग्रँट रोड (पू),**
**मुंबई ४०० ००७.** **... अपिलार्थी**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष) झोन-१,**
**ई विभाग, म्युन्सिपल कार्यालय, ३ रा मजला,**
**शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा (प),**
**मुंबई ४०० ००८.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ए विभाग म्युन्सिपल कार्यालय,**
**१३४-इ शहिद भगत सिंग मार्ग, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १३.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १४.०७.२०११**
**अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी हजर, जन माहिती अधिकारी हजर व प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर.**

अपिलकर्ता यांनी दि.०२.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता, इ व का यांचेकडे "लेटर नंबर Asst. C/A/31121/Bldg dt 10.02.2010 च्या" संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.०६.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.०२.११.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. परंतु अपिलकर्ता यांना ते मिळाले नसल्याने पुन्हा त्यांना रजिस्टर पोस्टाने देण्यात यावे असा निर्णय देउन अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील नसल्याने दि.१०.०२.२०१० रोजी इमारत व प्रस्ताव यांचेकडे पत्र दिले व अपिलकर्ता यांनी दिलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये मंजूर आराखडयाची माहिती तातडीने पाठवावी असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु इमारत व प्रस्ताव या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नव्हती व त्यामुळेच सदरचा अर्ज व प्रथम अपील हे निकाली काढण्यात आलेले होते. मात्र आता सदरचे पत्र त्या विभागाकडून आलेले असून त्यामध्ये मागितलेल्या इमारतीच्या संदर्भातील मुळ मंजूर आराखडा उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. परंतु ती प्रत अपिलकर्ता यांना आज आणता आलेली नाही. परंतु प्रत आज देता येईल असे आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अपिलकर्ता यांनी मंजूर आराखडा हा महानगरपालिकेकडे उपलब्ध असला पाहिजे व नसल्यास योग्य ती कार्यवाही करावी असे सांगितले. परंतु माहिती जी उपलब्ध आहे ती मिळू शकते. परंतु जी माहिती उपलब्ध नाही ती पुरवता येत नसल्यास जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरता येणार नाही. मात्र याकरिता अर्जदाराने त्याच सार्वजनिक प्राधिकरणातील वरिष्ठ अधिका-यांकडे स्वतंत्रपणे नियमाप्रमाणे तक्रार दाखल करणे संयुक्तीक राहिल. माहिती अदयाप पर्यंत उपलब्ध करून दिली नसल्याने सदरचे अपील अशंत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितल्या प्रमाणे आजच इमारत व प्रस्ताव विभागाकडे आलेल्या पत्रांची प्रत अपिलकर्ता यांना उपलब्ध करून देण्यात यावी.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १४.०७.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/नोंदणी क्र.८२/अपील क्र.६८७२/०२

श्रीमती. मोती बी.ईरानी,
पिरोजा मेन्शन, फ्लॅट नं.४०, दुसरा मजला,
अलिभाई प्रेमजी मार्ग, ग्रँट रोड (पू),
मुंबई ४०० ००७. ... अपिलार्थी

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष) झोन-१,
ई विभाग, म्युन्सिपल कार्यालय, ३ रा मजला,
शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा (प),
मुंबई ४०० ००८. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का)
बृहन्मुंबई महानगरपालिका, ए विभाग म्युन्सिपल कार्यालय,
१३४-इ शहिद भगत सिंग मार्ग, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक १३.१२.२०१०
सुनावणीचा दिनांक १४.०७.२०११
अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी हजर, जन माहिती अधिकारी हजर व
प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर.

अपिलकर्ता यांनी दि.०२.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सहा.आयुक्त यांचेकडे 1. Letter No.EB/1415/AR of Dt 05.05.1990, 2. Letter No.EB/1415/AAR of dt 09.11.1994 च्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती व पत्र व्यवहार तसेच चौकशीच्या संदर्भामध्ये माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन दयावी असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.०६.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.०२.११.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी श्री.कंथारीया, ए/वॉर्ड यांनी पुन्हा एकवेळ सखोल शोध घेउन अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती व कागदपत्रे उपलब्ध करुन दयावी असा

निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, दि.०५.०५.१९९० रोजी कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव यांनी आर्किटेक, श्री.सतिश कुलकर्णी यांना पत्र दिले व त्या पत्राची प्रत ही ए/वॉर्ड, BH & AD Board कार्यकारी अभियंता यांना दिले असून त्यांचेकडून अभिप्राय मागितलेले होते. त्याचप्रमाणे त्या पत्राचा उल्लेख करून दि.०९.११.१९९४ रोजी इमारत प्रस्ताव विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी कार्यकारी अभियंता ए डिव्हीजन BBR & R Board यांना पत्र देउन Repair to building 103 Bora Bzaaar Street च्या संदर्भामध्ये मंजूर आराखडयाप्रमाणे बांधकाम पूर्ण झाल्याची तारीख कळवावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. परंतु त्याप्रमाणे काहिही माहिती त्यांना अद्याप पर्यंत मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचे शाखेमध्ये सदरचे पत्र हे दिलेले नाही व त्यामुळे त्यावर कार्यवाही झालेली दिसून येते नाही. असे असल्यास अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना १९९४ च्या Inward Register व Action taken Register च्या छायांकित प्रती तसेच १९९० मध्ये दि.०५.०५.१९९० च्या पत्राप्रमाणे कार्यकारी अभियंता ए/वॉर्ड, BH & AD Board यांचेकडून कार्यवाहीची माहिती आल्यास ती माहिती उपलब्ध करुन दयावी त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील अशंत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांना त्यांचे कार्यालयातील १९९४ च्या Inward Register व Action Taken Register ची छायांकित प्रती तसेच सन १९९०/१९९४ च्या पत्रांच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता B.B.R & R Board यांचेकडून आलेल्या माहिती किंवा अभिप्राय आलेले असल्यास विना मुल्य उपलब्ध करून दयाव्या.**

**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**

**(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १४.०७.२०११**

**मुंबई**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.८३/अपील क्र.६८७३/०२**

**श्रीमती. मोती बी.ईरानी,**
**पिरोजा मेन्शन, फ्लॅट नं.४०, दुसरा मजला,**
**अलिभाई प्रेमजी मार्ग, ग्रँट रोड (पू),**
**मुंबई ४०० ००७. ... अपिलार्थी**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष) झोन-१,**
**ई विभाग, म्युन्सिपल कार्यालय, ३ रा मजला,**
**शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा (प),**
**मुंबई ४०० ००८. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ए विभाग म्युन्सिपल कार्यालय,**
**१३४-इ शहिद भगत सिंग मार्ग, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १३.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १४.०७.२०११**
**अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी हजर, जन माहिती अधिकारी हजर व प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर.**

अपिलकर्ता यांनी दि.०२.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सहा.अभियंता, इमारत व कारखाने यांचे माहिती अधिकारी यांचेकडे पत्र क्र.WOA/38109/Building of dt 05.03.2010 च्या पत्राच्या संदर्भात माहिती उपलब्ध करून दयावी असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.१५.०३.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करून दिलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.०२.११.२०१० रोजी देण्यात आलेला असून संबंधित माहिती १० दिवसांत देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यांनतरही माहिती मिळाली नसल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जामध्ये जी माहिती मागितलेली आहे त्या संदर्भात त्यांना कर आकारणीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या अर्जामध्ये पत्राच्या प्रती उपलब्ध करुन द्यावी असे म्हटले आहे व सदरची माहिती सुध्दा सहा.अभियंता, ए/वॉर्ड यांचेकडे नसून करनिर्धारक या शाखेकडे आहे. संबंधित करनिर्धारनाच्या संदर्भामध्ये त्यांना त्यावेळेसच्या छायांकित प्रती हवे असल्यास त्यांना त्या शाखेकडून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तीक राहील. मात्र अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध असल्याने सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यांत येते.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १४.०७.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.४९९५४/अपील क्र.६८८१/०२**

**श्री.तुषार धनंजय मंडलेकर**
**२०, एन.आय.टी.कॉम्लेक्स,**
**हिल रोड, गांधी नगर,**
**नागपुर ४४० ०१०. ... अपिलार्थी**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह परिवहन आयुक्त**
**परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत,**
**४ था मजला, शासकीय वसाहत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा परिवहन उप आयुक्त (प्रशासन)**
**परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत,**
**४ था मजला, शासकीय वसाहत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २३.१०.२००७**
**सुनावणीचा दिनांक १५.०७.२०११**
**अपिलकर्ता हजर, तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर व**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर आहेत.**

अपिलकर्ता यांनी दि.११.०४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, उपायुक्त परिवहन यांचेकडे Criminal offenses again transport (०१.०१.१९९९ ते १०.०४.२००७) च्या संदर्भामध्ये पंधरा मुदयामध्ये माहिती मागितली होती. सदरची माहिती साध्या पोस्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.०६.०६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२६.०७.२०१० रोजी दिलेला असून दि.१४.०६.२००७ रोजी माहिती देण्यात आली तसेच संबंधितांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर ती देण्यात येईल असा निर्णय दिला असल्याने व त्यानंतर सुध्दा माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपील दाखल केल्यानंतर मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयापुर्वी दि.१४.०६.२००७ रोजी त्यांना काहि मुद्दयांची माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु मुद्दा क्र.ई च्या संदर्भामध्ये त्यावेळेस आर.टी.ओ.नागपूर (City & Ruler) यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त नसल्याचे कळविले होते. तसेच मुद्दा क्र.आय प्रमाणे क्राईम नंबर दिलेला असल्याने त्यात पूर्ण तपशिल दिला नसल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले होते व त्यामुळे या दोन मुद्दयांची माहिती त्यांना अदयाप पर्यंत उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, चौकशी अहवाल, नागपूर आर.टी.ओ कडून प्राप्त झाला असल्यास तो देण्यात येईल. तसेच मुददा क्र.आय च्या संदर्भात अपिलकर्ता यांनी तिनही गुन्हयाच्या संदर्भात तपशिल दिल्यास ती माहिती सुध्दा उपलब्ध करुन देता येईल त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील अशंत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांच्या दि.१४.०६.२००७ च्या अर्जामधील मुद्दा क्र.ई प्रमाणे चौकशी अहवालाच्या प्रती विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात.**

**मुद्दा क्र.आय मध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांनी गुन्हयाच्या संदर्भातील तपशिल दिल्यावरती उपलब्ध असलेली माहिती विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात.**

**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १५.०७.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/नोंदणी क्र.४५३८४/अपील क्र.५४९६/०२

**श्री.सॅमसन अँथनी**
**१/१४६, बी.एम.सी.कॉलनी,**
**खारोडी, मारवे रोड,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०९५.** ... अपिलार्थी

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ वॉर्ड,**
**लिबर्टी गार्डन, मालाड (प), मुंबई.** ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता**
**मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ वॉर्ड,**
**लिबर्टी गार्डन, मालाड (प), मुंबई.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १८.११.२००९**
**सुनावणीचा दिनांक १५.०७.२०११**
**अपिलकर्ता गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर व**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.०४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जल विभाग यांचेकडे एकूण अनधिकृत जल जोडणीच्या संदर्भामध्ये काही प्रश्न उपस्थित करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदती माहिती उपलबध झाली नाही म्हणुन प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते पण प्रथम अपीलाची प्रत जोडली नाही. मात्र प्रथम अपीलाचा आदेश दि.०६.०८.२००९ रोजी दिलेला असून अपिलकर्ता यांनी मागितलेल्या तोडलेल्या जल जोडणीबाबत उर्वरित माहिती १० दिवसांत द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.०७.०८.२००९ रोजी माहिती दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे ही समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी, जल कामे यांना नोटीस काढली नाही परंतु सहा.अभियंता, पी/उत्तर विभाग यांना नोटीस काढल्याने ते हजर झाले आहेत. त्यांनी आयोगापुढे असे

सांगितले की, सदरचा अर्ज हा सहा.अभियंता जल कामे यांच्या विभागातील आहे. बांधकाम विभागामध्ये कोणत्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करावी असा कोणताही अर्ज हा त्यांच्या कार्यालयात दिलेला नाही. त्यामुळे त्या संदर्भामध्ये त्यांचे कार्यालयात कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

३. कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की, दि.१७.०६.२००९ रोजी अपिलकर्ता यांना मुदयेनिहाय माहिती उपलब्ध करून दिलेली दिसून येते. परंतु व्दितीय अपीलामध्ये पुन्हा त्यांनी अनधिकृत जल जोडणीच्या संदर्भामध्ये कारवाई करावी अशी विनंती केली आहे.

४. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणामध्ये निर्णय प्रक्रियेमध्ये किंवा कारवाई मध्ये हस्तक्षेप करता येत नाही. कार्यालयामध्ये कागदपत्रांच्या स्वरुपातील उपलब्ध माहिती मिळते. त्यातही कोणत्याही प्रकरणात निर्णयप्रक्रिये संदर्भात किंवा निकषांच्या संदर्भामध्ये किंवा नियमाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित नाही व अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय तसेच अनधिकृत जल जोडणीच्या संदर्भामध्ये कारवाई ची अपेक्षा केली असल्याने सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यांत येते.**
**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १५.०७.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रत प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.४६८६७/अपील क्र.६८८२/०२**

**श्री.किशोर के.पटेल, जितेंद्र के.पटेल,**
**१६२/५, हिल रोड, रिजवी चेंबरसच्या मागे,**
**बांद्रा एच/पश्चिम ऑफिसच्या जवळ,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०. ... अपिलार्थी**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम वॉर्ड,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम वॉर्ड,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०९.०२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १५.०७.२०११**
**अपिलकर्ता हजर, जन माहिती अधिकारी हजर व**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.०५.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, सहा.अभियंता, इमारती व कारखाने, एच/वेस्ट वॉर्ड, बांद्रा (प) यांचेकडे एप्रिल २००४ ते अर्जाच्या तारखेपर्यंतच्या कालावधीत अनधिकृत बेकायदेशीर बांधकाम, शॉप नं.१ ते ४, ६ ते ११, प्लॉट नं.एफ/१२५४-एफ/१२५६ च्या संदर्भामध्ये दिलेल्या तक्रारींच्या संदर्भात कारवाईची माहिती तसेच शॉप नं.१ सुट नं.२५८० ऑफ ०५, शॉप नं.६ सुट नं.२६२५ ऑफ ०५, शॉप नं.५ सुट नं.२२४ ऑफ ०८, शॉप नं.८ सुट नं.१८१ ऑफ ०८, शॉप नं.९ सुट नं.२४९२ ऑफ ०६, शॉप नं.१० सुट नं.२४९३ ऑफ ०६, शॉप नं.२ सुट नं.२६८९ ऑफ ०५ च्या संदर्भामध्ये Inerim relief आदेश, अपील दाखल झाले असल्यास त्या संदर्भातील सर्व माहिती Judgment इत्यादींच्या प्रती ची माहिती तपशिलात मागितलेली दिसून येते. तसेच शॉप नं.७ यांस दिलेल्या नोटीसीच्या प्रती सुध्दा मागितलेल्या दिसून येतात. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.०६.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये न्यायालयाचे आदेश हे विधी विभागात उपलब्ध आहेत, ती माहिती या विभागात उपलब्ध आहे, त्याकरीता खर्चाचा भरणा करावा व शॉप नं.७ संदर्भामध्ये सिनीअर इन्स्पेक्टर,

लायसन्स, एच/वेस्ट वॉर्ड यांचेकडे संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.२६.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्यानंतर ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, हिल रोड येथे त्यांचे वडीलांचे क्लिनीक असून शॉप नं.५ आहे व शॉप नं.१, २, ३, ४, ६, ७, ८, ९ यांनी पाठीमांगच्या बाजूला अनधिकृत बांधकाम केले आहे. शॉप नं.७ च्या भोगवटादारांनी त्यांचे शॉपच्या पाठीमागे दरवाजा तयार करुन तेथे दाग-दागीने घडविण्याचे मशिने ठेवली आहे व त्यातून केमिकल वगैरे त्यांचे शॉपच्या जागेमध्ये सोडले आहे व त्यामुळे त्यांनी अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये आयुक्त, महानगरपालिका यांचेकडे तक्रार केली होती. त्या तक्रारी प्रमाणे अनधिकृत बांधकाम काढण्याचे आदेश पण दिले होते. परंतु त्या आदेशाविरुध्द सर्व दुकान मालकांनी न्यायालयामध्ये दावे दाखल केले आहेत व त्या दाव्याच्या संदर्भामध्ये झालेले निर्णय किंवा अपील केले असतील तर उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेले अपील व त्यांचे मेमो यांची माहिती मागितलेली होती. कारण सर्वच दुकान मालक व महानगरपालिकेचे अधिकारी मिळून त्यांचे दुकान हे काढून घेउन त्यांना हकलून देण्याच्या विचारात आहेत व त्यामुळेच त्यांना अदयाप पर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.०६.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती घेउन जाण्यासाठी कळविले होते. परंतु त्यांनी खर्चाचा भरणा केला नाही तसेच प्रथम अपीलाच्या दि.२२.१२.२००९ आदेशाप्रमाणे त्यांना कार्यालयात बोलविले होते. परंतु ते कार्यालयात उपस्थित झाले नाही. त्यावर अपिलकर्ता यांनी पुन्हा असे सांगितले की, त्यांच्या दि.०५.१०.२००९ च्या अर्जाप्रमाणे ३० दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तसेच कोणताही पत्र व्यवहार केलेला नाही. ३० दिवसांचे मुदतीनंतर दि.०६.११.२००९ रोजी निश्चित किती कागदपत्रे आहे व किती खर्चाचा भरणा करावा हे अधिनियमाचे कलम ७(३) प्रमाणे कळविले नाही. तसेच मुद्दा क्र.७ च्या संदर्भामध्ये अर्ज हा सिनिअर इन्स्पेक्टर लायसन्स यांचेकडे पाठविला असे कळविले. ते स्वत: तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित झाले होते. परंतु कागदपत्रे किती होतील व खर्चाचा भरणा किती करावा हे त्यांनी सांगितले नाही त्यामुळे खर्चाचा भरणा करता आलेला नाही व तसेही त्यांनी

३० दिवसांचे नंतर कळविलेले असल्याने माहिती ही विनामूल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा त्यांना बोलविण्यात आले होते. परंतु त्यांनी मागितलेली माहिती ही स्पष्ट आहे व माहिती पोस्टाने मागितलेली होती त्यामुळे ती त्यांनी विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. वास्तविक प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी ३० दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणुन विनामूल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश द्यायला हवे होते. परिणामी त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही.

३. त्यावर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांना त्यांनी संपूर्ण कागदपत्रे उपलब्ध करुन दिली होती व त्यातून त्यांनी ६१९ पृष्ठे घेतलेली आहे व त्याबद्दलची पोच त्यांनी दिलेली आहे ती त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणली आहे. पंरतु अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती मिळाली नाही असे आयोगास सांगितले. असे असल्यास जन माहिती अधिकारी यंानी अपिलकर्ता यांना कोणती कागदपत्रे घेतली याबद्दलची पडताळणी करुनच माहिती दिली अशा प्रकारची पोच घेणे आवश्यक होते व ती तशी घेतली नसल्याने अपिलकर्ता यांना माहिती मिळाली नाही असे आयोगापुढे सांगितलेले दिसून येते. माहिती उपलब्ध करुन देतांना अर्जात मागितलेली मुदयेनिहाय कागदपत्रे उपलब्ध करुन देणे अपेक्षीत असते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.०५.१०.२००९ च्या अर्जातील माहितीचे वर्णन केलेले मुदयाप्रमाणे प्रत्येक नस्तीतील कागदपत्रे विना मूल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

<u>**आदेश**</u>

**१. अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.०५.१०.२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने मागितलेल्या माहितीची कागदपत्रे विनामूल्य पोस्टाने उपलब्ध करून देण्यात यावे, तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १५.०७.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.४६८६९/अपील क्र.६८८३/०२**

**श्री.किशोर के.पटेल, जितेंद्र के.पटेल,**
**१६२/५, हिल रोड, रिजवी चेंबरसच्या मागे,**
**बांद्रा एच/पश्चिम ऑफिसच्या जवळ,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०. ... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम वॉर्ड,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम वॉर्ड,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०९.०२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १५.०७.२०११**
**अपिलकर्ता हजर, जन माहिती अधिकारी हजर व**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.३०.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, तथा सहा.अभियंता, इमारती व कारखाने विभाग यांचेकडे ललिता सदन, तळ मजला, एस.व्ही.रोड, पाटकर जुना ब्लॉक या संदर्भात केलेले अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये जानेवारी, २००९ ते अर्जाच्या तारखेपर्यंत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.२९.१२.२००९ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी "माहिती कार्यालयात उपलब्ध आहे व निरीक्षण करुन खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी" असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.३०.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.२३.०१.२०१० रोजी देण्यात आला असून 'जन माहिती अधिकारी यांनी अर्जाचे आकलन न करता उत्तर दिलेले आहे, अपिलकर्ता यांनी प्रती मागितलेल्या आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांना

निरीक्षणाकरिता बोलाविले आहे हे योग्य नाही व तातडीने सर्व कागदपत्रे यावीत' असे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे दि.११.०२.२०१० रोजी अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली असे अपिलकर्ता यांनी लेखी दिलेले दिसून येते व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. प्रथम अपीलाचा निर्णय हा स्वयंस्पष्ट आहे. त्यामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी जे दि.२९.१२.२००९ रोजी उत्तर दिलेले आहे ते उत्तर अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. अर्जदाराने निश्चित वर्णन करुन जर माहिती मागितली असेल तर त्यास निरीक्षणासाठी बोलविण्याची आवश्यकता नाही व अर्जदाराच्या दि.३०.११.२००९ च्या अर्जामध्ये सर्व कागदपत्रांचे निश्चित वर्णन केलेले आहे. माहिती उपलब्ध करुन देण्याची संपूर्ण प्रक्रिया ही ३० दिवसांमध्ये पूर्ण करावयाची असते. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ३० व्या दिवशी म्हणजे दि.२९.१२.२००९ रोजी अपिलकर्ता यांना कागदपत्रांच्या निरीक्षणाकरिता बोलाविले हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही व ही बाब प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुध्दा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे संदर्भात आदेशात नमूद केले आहे व त्यानंतरही अपिलकर्ता यांना संपूर्ण कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाहीत. अपिलकर्ता यांनी माहिती पोस्टाने मागितली होती. त्यामुळे अधिनियमाचे कलम ७(३) प्रमाणे अपिलकर्ता यांना मागितलेल्या माहितीची उपलब्ध असलेली कागदपत्रांची एकूण पृष्ठ व त्या संदर्भातील खर्च तसेच टपाल खर्च कळविणे आवश्यक होते व अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यावर व तसे जन माहिती अधिकारी यांचे निदर्शनास आणल्यावर कागदपत्रे यांच्या छायांकित प्रती स्पिड पोस्टाने पाठविणे आवश्यक होते. ही प्रक्रिया ३० दिवसांत पूर्ण करणे आवश्यक असते. खर्चाचा भरणा करण्याचे पत्र दिल्यापासून तो खर्चाचा भरणाकडे पर्यंतचा कालावधी हा ३० दिवसाचे परिगणना करताना वगळून मिळतो. परंतु जन माहिती अधिकारी हे अभियंता असून सुध्दा कायद्यांच्या तरतुदींची माहिती न घेता माहितीच्या अर्जाचे उत्तर देतात असे दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांना अधिनियमाचे कलम ७(६) प्रमाणे ३० दिवसांत माहिती दिली नसल्यास ती विना मुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद असल्यामुळे विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येते.

<u>आदेश</u>

१. अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या दि.३०.११.२००९ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करून देण्यात याव्यात. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.

**Sd--**

(विलास पाटील)

राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १५.०७.२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव

राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/नों.क्र.२५०/तक्रार क्र.१६९/०१**

**श्री.दिपील नेवाटिया**
**५ अे, शशी दीप, वरळी सी फेस,**
**मुंबई ४०० ०३०. ... तक्रारदार**

**<u>विरूध्द</u>**

**श्री.रविंद्र मानसिंगराव कदम**
**ॲडव्होकेट जनरल, महाराष्ट्र राज्य,**
**उच्च न्यायालय विस्तार इमारत,**
**१ ला मजला, मुंबई ४०० ०३२. ... गैरतक्रारदार**

**<u>निर्णय</u>**

**सुनावणीचा दिनांक १०.०५.२०११**
**तक्रारदार - हजर**
**ॲडव्होकेट जनरल कार्यालयाचे वकील - श्री विजय पाटील व श्री साठे हजर**
**जन माहिती अधिकारी - हजर, खुलासा अप्राप्त.**

तक्रारदार यांनी त्यांच्या दि.०७.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, विधी व न्याय विभाग यांचेकडे महाराष्ट्राचे महाअधिवक्ता यांच्या कार्यालयामध्ये महाराष्ट्र Vexatious Litigation (Prevention) Act 1971 या अधिनियमाखाली किती तक्रारी दाखल झाल्या व त्या तक्रारींच्या संदर्भामध्ये कोणत्या प्रकारची कार्यवाही झाली याबद्दल ६ मुदयांमध्ये माहिती मागितलेली होती. परंतु सदरची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणुन त्यांनी दि.२७.१२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय विहित मुदतीत दिला नसल्याने त्यांनी दि.१९.०१.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमाचे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. परंतु त्यामध्ये माहिती अधिकारी विधी व न्याय विभाग यांना गैरतक्रारदार किंवा उत्तरवादी करण्यांत आलेले नसुन तक्रार ही जन माहिती अधिकारी, महाअधिवक्ता कार्यालय यांचे विरूध्द दाखल केलेली नसून महाअधिवक्ता यांचेविरुध्द सार्वजनिक प्राधिकरण म्हणुन दाखल केलेली आहे.

२. सदरच्या तक्रारींच्या संदर्भात तक्रारदार यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, महाअधिवक्ता हे पद संविधानाप्रमाणे निर्माण केले असल्यामुळे ते अधिनियमातील कलम २(ज) मधील सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेच्या व्याख्येत समाविष्ट होते व त्यामुळे त्या कार्यालयास माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात.  तसेच अधिनियमाचे कलम ४ प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणावर त्यांच्या कार्यालयातील कार्यपध्दतीच्या संदर्भामध्ये एकूण १७ मुदयांची माहिती ही अधिनियम १२ ऑक्टोंबर, २००५ रोजी अमलात येण्यापूर्वी १०० दिवसांचे आत सर्व १७ मुदयांविषयी माहिती ही प्रसिध्द करणे आवश्यक होते.  तसेच अधिनियमाचे कलम ५ प्रमाणे अधिनियम अमलात येणे पूर्वी १०० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी व कलम १९(१) अन्वये प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक होते.  तक्रारदाराने ऑक्टोंबर २०१० मध्ये महाअधिवक्ता यांचे कार्यालयात माहिती मागण्यासाठी इंटरनेटवर जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी व अधिनियमाचे कलम ४ प्रमाणे प्रसिध्द केलेल्या माहितीचा शोध घेतला.  परंतु महाअधिवक्ता यांच्या कार्यालयाची संकेतस्थळ सुध्दा नाही व मुळ माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली दिसून आलेली नाही व त्यामुळेच तक्रारदार यांनी दि.०७.१०.२०१० रोजी विधी व न्याय विभाग यांचे जन माहिती अधिकारी यांचेकडे महाअधिवक्ता यांचे कार्यालयातील माहिती मागण्यासाठी अर्ज सादर केला.  परंतु जन माहिती अधिकारी, विधी व न्याय विभाग यांनी मात्र सदरचा अर्ज हा दि.२५.११.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, महाअधिवक्ता कार्यालय यांचेकडे हस्तांतर केला व त्यानंतर ही कोणताही पत्र व्यवहार न झाल्याने त्यांनी महाअधिवक्ता यांचे कार्यालयामध्ये दि.२७.१२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.  त्याप्रमाणे दि.१४.०१.२०११ रोजी अधिक्षक, महाअधिवक्ता कार्यालय यांचे कार्यालयातून दि.१८.०१.२०१० रोजी दुपारी ४.३० वाजता अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली असे पत्र मिळाले.  दि.१८.०१.२०१० रोजी जेव्हा जे प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर झाले तेव्हा त्यांना नियमाप्रमाणे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्तीच झालेली नाही असे आढळून आले.  सदर अपीलाची सुनावणी ही श्रीमती यु.पी.सामंत, अधिक्षक यांनी घेतली.  परंतु त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींची काही माहिती आहे असे दिसून आले नाही.  सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.  श्रीमती.सामंत यांनी माहिती संकलीत केली जात आहे व संपूर्ण कागदपत्रे ही सहजासहजी उपलब्ध होत नाही असे सांगितले.   तसेच कोणतेही अभिलेख्यांचे संलग्नीकरण केलेले नाही व संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द केलेले नाहीत व त्यामुळे काही दिवस थांबावे व तो पर्यंत सर्व कार्यवाही पूर्ण करण्यात येईल असे सांगितले.

त्यावरुनच महाअधिवक्ता यांनी सदरच्या अधिनियमाच्या अमंलबाजवणीस पाच वर्ष उलटून गेले तरी कोणत्याही प्रकारची कार्यवाही कलम ४ प्रमाणे व कलम ५ प्रमाणे केलेली नव्हती व अशा प्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या संसदेच्या कायदयाच्या संदर्भात महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांनी कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना अनास्था व उदासिनता दाखविली आहे व त्यामुळे अधिनियमाचे कलम १८(१) (a), (c) आणि (f) त्या तरतुदींप्रमाणे महाअधिवक्ता यांचे कार्यालयाने कार्यवाही केलेली नसल्याने अधिनियमाचे कलम २० प्रमाणे सदरच्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या विरुध्द शास्ती लादणेसाठी सदरची तक्रार केलेली आहे.

३. तक्रारींच्या संदर्भामध्ये महाअधिवक्ता यांचे कार्यालयातील अधिक्षक यांनी आयोगापुढे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे व त्या प्रतिज्ञापत्रांप्रमाणे व महाअधिवक्ता यांचे ॲडव्होकेट यांनी तोंडी युक्तीवादामध्ये तक्रारदार यांची तक्रार ही कोणत्याही प्रकारची आधार नसलेली तक्रार आहे. कलम ४ च्या संदर्भामध्ये जे आरोप करण्यात आलेले आहे हे कोणत्याही प्रकारची माहिती न घेता करण्यात आलेले आहेत. तसेच कलम ५ प्रमाणे व कलम १९(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे महाअधिवक्ता यांचे कार्यालयामध्ये नियुक्त करण्यात आलेले होते. त्या संदर्भात त्यांनी दि.१९.०६.२००६ रोजी महाअधिवक्ता यांनी कार्यालयीन आदेशा प्रमाणे श्रीमती.एम.व्ही.ठाकूर, लघुलेखक (उच्चश्रेणी) यांना जन माहिती अधिकारी म्हणुन नियुक्त केले होते व श्रीमती.यु.पी.सामंत, अधिक्षक यांना प्रथम अपिलीय प्राधिकारी म्हणून नियुक्त केलेले होते. परंतु त्यानंतर दि.१४.१०.२००८ रोजी महाअधिवक्ता यांनी अधिनियमाचे कलम २५(२) व (३) नुसार श्रीमती.यु.पी.सामंत यांना जन माहिती अधिकारी व महाअधिवक्ता यांना प्रथम अपिलीय प्राधिकारी नियुक्त केले होते. त्यानंतर पुन्हा दि.०१.१२.२०१० रोजी दि.१४.१०.२००८ च्या कार्यालयीन आदेशामध्ये बदल करुन श्रीयुत.एम.ए.गोसावी, वरिष्ठ लिपीक यांना माहिती अधिकारी नियुक्त केले व श्रीमती.यु.पी.सामंत यांना प्रथम अपिलीय प्राधिकारी नियुक्त केले होते. पुन्हा दि.०१.०२.२०११ रोजी श्रीमती.यु.पी.सामंत, अधिक्षक हया दि.३१.०१.२०११ रोजी सेवा निवृत्त झाल्याने श्री.एम.जे.सोनकर यांना अधिक्षक पदी नियुक्ती दिल्यानंतर त्यांना प्रथम अपिलीय प्राधिकारी म्हणुन नियुक्त केले होते व प्रत्येक वेळेस या सर्व आदेशांच्या प्रती विधी व

न्याय विभागास वेळोवेळी पाठविण्यात आल्या होत्या व त्यामुळे महाअधिवक्ता यांचे कार्यालयाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे तरतुदीप्रमाणे अमंलबजावणी केली नाही असे म्हणता येणार नाही.

४. महाअधिवक्ता यांचे कार्यालय हे भारताचे संविधान अनुच्छेद १६५ प्रमाणे निर्माण केलेले असून शासनास वेळोवेळी विधीवत अभिप्राय देणे व शासनांनी वेळोवेळी कायदेशीर बाबींच्या संदर्भामध्ये जे, जे कार्य सोपविले असेल त्याबाबत अभिप्राय देणे किंवा शासनाची बाजू मा.उच्च न्यायालयामध्ये मांडणे असे आहे. थोडक्यात कायदेशीर सल्ला देणे असे कार्यालयाचे कामकाजाचे स्वरुप आहे. महाअधिवक्ता यांच्या कामकाजाच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र लॉ ऑफीसर रुल्समध्ये स्पष्टपणे कार्यपध्दती नमूद केलेली आहे व ती प्रसिध्द केली असल्यामुळे सार्वजनिक क्षेत्रात आहे. सदरचे नियम हे विधी व न्याय विभागाचे संकेतस्थळावर सुध्दा आहे. महाअधिवक्ता यांना मदत करण्यासाठी फक्त लिपीक व प्रशासकीय कर्मचारी शासनाने उपलब्ध करुन दिलेले आहेत व ते मुख्यत: लिपीक म्हणुन काम करतात. महाअधिवक्ता यांचे कार्यालयास स्वत:चे कर्मचारी नाही किंवा कार्यालयीन असा कोणताही स्वतंत्र ढाच्या नाही. कार्यालयामध्ये अधिनियमाचे कलम ४ प्रमाणे ज्या पोट कलमाप्रमाणे आवश्यकता असेल त्याप्रमाणे अभिलेख्यांचे जतन केलेले आहेत. तसेच संलग्नीकरणांच्या संदर्भामध्ये कार्यालयातील संगणकामध्ये संपूर्ण कामकाजाचे जतन केलेले आहे. महाअधिवक्ता यांनी जे, जे आदेश पारित केलेले आहे ते सर्व आदेश हे कार्यालयातील संगणकावर आहे. महाअधिवक्ता यांचे कामकाजाचे स्वरुप बघतांना त्या अनुसारच त्यांना कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यातही शासनाकडून जो निधी मंजूर केला जातो, त्या निधीच्या मर्यादेतच कामकाज करावे लागते व आता पर्यंत महाअधिवक्ता यांचे कार्यालयामध्ये जे अभिलेख जतन करण्यात आले आहेत, त्या अभिलेख्यांचे संलग्नीकरण करणे हे सुध्दा जवळजवळ उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीच्या माध्यमातून अशक्य आहे व त्यामुळे ज्या मर्यादेपर्यंत शासनाने साधनसामग्री उपलब्ध केली आहे त्या मर्यादेपर्यत संलग्नीकरणाची प्रक्रिया होउ शकते व तसे अधिनियमाच्या प्रास्ताविकेमध्ये व कलम ४(४) मध्ये सुध्दा तरतूद आहे.

५. कलम ४ च्या संदर्भामध्ये तपशिलात महाअधिवक्ता यांनी विधी व न्याय विभागास दि.०३.०७.२००८ रोजी पत्र दिले होते व कलम ४ मधील जी पोट कलमे महाअधिवक्ता यांचे कार्यालयाच्या कामकाजाशी संबंधित नाही त्याबाबत स्वतंत्रपणे कळविलेले नव्हते व ही संपूर्ण माहिती विधी

व न्याय विभागाच्या संकेतस्थाळावर प्रसिध्द करावी असे कळविलेले होते. कारण विधी व न्याय विभाग हे महाअधिवक्ता यांचे कार्यालयाचे धोरणात्मक प्रशासकीय कार्यालय आहे. महाअधिवक्ता यांच्या कामकाजाच्या संदर्भामध्ये कलम ४ मधील ४(१) (b) (vii), (viii), (xi), (xii), (xv) हे लागू होत नाही. महाअधिवक्ता यांचे कार्यालय कोणतेही प्रकारचे कल्याणकारी योजना आखत नाही व कोणत्याही व्यक्तींना सोई सवलती देण्याचे धोरण सुध्दा आखत नाही. परंतु न्यायालयाच्या अवमानाच्या संदर्भामध्ये मात्र महाअधिवक्ता यांचे कार्यालयात अभिप्राय किंवा निर्णय घेतले जातात. तसेच कलम ४(१) (c) प्रमाणे धोरणात्मक निर्णय सुध्दा घेतले जात नाही. मात्र कलम ४(१) (d) प्रमाणे महाअधिवक्ता हे नेहमीच निर्णय देताना कारण मिमांसा देणारे निर्णयच पारित करतात. यापूर्वीच युक्तीवादात सांगितल्याप्रमाणे महाअधिवक्ता कार्यालयामध्ये मर्यादित म्हणजे दोन वरिष्ठ लिपीक व एक अधिक्षक एवढाच कर्मचारी वर्ग असल्यामुळे महाअधिवक्ता यांना स्वत: वेळोवेळी परिस्थितीनुरुप जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्तीमध्ये बदल करावे लागतात व हे बदल वेळोवेळी कार्यालयाचे बाहेर दर्शनीभागामध्ये ठळकपणे दिसतील असे लावण्यात आलेले आहे व त्यामुळे कलम ५ व १९(१) ची अमंलबजावणी महाअधिवक्ता यांचे कार्यालयाने केलेली नाही असे म्हणता येणार नाही व तक्रारदाराने केलेले आरोप हे निराधार असे आहेत. विधी व न्याय विभागाचे संकेतस्थळावर सर्व माहिती प्रसिध्द करावी असे त्यांनी असे विधि व न्याय विभागास वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

त्यावर पुन्हा तक्रारदाराने त्यांचे म्हणणे लेखी सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी कॅनेरा बँक विरुध्द केंद्रीय माहिती आयोग (AIR 2007 KERALA 225, AIR 2009 CALCUTTA 97 (खंडपीठ कोलकत्ता विरुध्द प्रितम रुज)) या निर्णयामधील मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णय आयोगाचे निदर्शनास आणले त्यामध्ये कलम ४ च्या संदर्भामध्ये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अमंलबाजवणी करणे हे बंधनकारक आहे असे नमूद केलेले आहे. त्यात पुढे यांनी पुन्हा युक्तीवाद केला की, श्री.एम.जे.सोनकर हे अधिक्षक असून प्रथम अपिलीय प्राधिकारी असल्याने त्यांना महाअधिवक्ता यांचेतर्फे आयोगापुढे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. तसेच महाअधिवक्ता यांचे कार्यालयामध्ये जरी अभिलेखे जतन केलेले असले तरी कलम ४ च्या तरतुदीप्रमाणे ते संकेतस्थळावर प्रसिध्द करणे हे बंधनकारक आहे. परंतु तसे महाअधिवक्ता यांचे कार्यालयाने केले नाही. त्यामुळे कलम

४ चे सार्वजनिक प्राधिकरण म्हणुन महाअधिवक्ता यांचे कार्यालय त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे व त्याकरिता त्यांनी केंद्रीय माहिती आयोगाचा निर्णय आयोगाच्या निदर्शनास आणला.

६. त्याबाबत पुन्हा एक वेळ महाअधिवक्ता यांचे वकील यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, कलम ४ (२), (३), (४) चे एकत्रित वाचन केल्यास प्रसारित याचा अर्थ सुचना फलक, वृत्तपत्रे, जाहिर घोषणा, प्रसारमाध्यमातून ध्वनीक्षेपण, इंटरनेट यांचेव्दारे कोणत्याही अन्य मार्गाने लोकांना माहिती करुन देणे किंवा कळविणे, तसेच कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयाची पाहणी करुन देणे असा दिलेला असल्यामुळे व तसे पोट कलम ४ मध्ये माहिती प्रसारित करताना प्रसारित करण्याच्या खर्चाचा विचार करुन केले पाहिजे असे नमूद केले आहे व त्यामुळे तक्रारदार यांनी जी तक्रार केली आहे त्या तक्रारींच्या संदर्भामध्ये केलेल्या आरोपाच्या संदर्भात महाअधिवक्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ व ५ अमंलबजावणी केली नाही असे म्हणता येणार नाही.

७. तक्रारदार यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये विचार केल्यास तो अर्ज त्यांनी विधी व न्याय विभाग यांचे माहिती अधिकारी यांचेकडे केला होता व तो अर्ज हा महाअधिवक्ता यांचे कार्यालयास दि.०३.१२.२०१० रोजी प्राप्त झाल्यानंतर ३० दिवस पूर्ण होण्यापूर्वीच प्रथम अपील दाखल केले होते व त्यामुळे त्यांच्या प्रथम अपील मेमोमध्ये माहिती मिळाली नाही असा उल्लेख दिसून येतो. मात्र त्यांच्या इतर अर्जाच्या संदर्भात त्या, त्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली आहे. तसेच प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये महाअधिवक्ता यांनी निर्णय हा दि.२६.०४.२०१० रोजी दिलेला असून त्यामध्ये महाअधिवक्ता यांच्या कार्यालयामध्ये किती तक्रारी आलेल्या आहेत व त्याबद्दलची कार्यवाहीचा तपशील सुध्दा दिलेला आहे व त्यामुळे तक्रारदार यांना माहिती नाकारली किंवा माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली असेही म्हणता येत नाही.

८. वरील दोन बाजुंचे युक्तीवाद ऐकल्यानंतर आयोग या निष्कर्षापत आले आहे की, महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य याचे कामकाजाचे स्वरुप पाहता व मर्यादित कर्मचारी याबद्दलचा विचार करता कलम ४ व कलम ५ व कलम १९(१) प्रमाणे अमंलबजावणी करणे हे मर्यादित उपलब्ध होणा-या निधीच्या संदर्भात सुध्दा विचार केल्यास महाअधिवक्ता यांचे कार्यालयाने अमंलबजावणी केलेली आहे. असे असले तरी महाअधिवक्ता यांचे कार्यालयाने विधी व न्याय विभागाचे संकेतस्थळावर जी माहिती

प्रसिध्द करण्यास दिली आहे, ती त्या विभागाने प्रसिध्द केली नसल्यास त्याबददलचा पाठपुरावा करणे आवश्यक राहील. किंवा महाअधिवक्ता या कार्यालयाचे स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण करणेकरिता शासनाकडे पाठपुरावा करण्याची कार्यवाही करणे संयुक्तीक राहील.

९. तक्रारदार यांनी महाअधिवक्ता यांचे विरुध्द किंवा जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादण्यात यावी याबददलची मागणी केलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० नुसार शास्ती ही माहिती अधिकारी यांचेविरुध्द लादण्याची तरतूद आहे व त्याशिवाय अन्य कोणत्याही अधिका-यावर शास्ती लादण्याची तरतूद नाही. त्यासंदर्भामध्ये मा.उच्च न्यायालय, दिल्ली यांचेपुढील WP (C) (12714)/2009 Delhi Development Authority विरुध्द केंद्रीय माहिती आयोग या याचिकेतील दि.२१.०५.२०१० मधील दिलेल्या निर्णयातील परिच्छेद १६ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण केलेले आढळून येतात.

"As we have seen. Section 4 merely sets out the obligations of the public authorities. It does not provide the machinery to enforce the implementation of these obligations".

१०. असे असले तरी वर नमूद केल्याप्रमाणे महाअधिवक्ता कार्यालयाने माहितीचा अधिंकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (२) (३) व (४) च्या तरतुदींचा वापर जनतेकरिता अधिकाअधिक सुलभपणे करता येईल याकरिता योग्य ती कार्यवाही तपशिलात करणे व त्याबाबत सतत प्रयत्नशिल राहावे. मात्र सदरची तक्रार ही निकाली काढण्यांस पात्र आहे.

<u>आदेश</u>

**१.तक्रारदार यांची तक्रार ही निकाली काढण्यांत येते.**
**२.तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १९.०७.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/४३३२८/तक्रार २०६/०१**
**क्र.मुमाआ.२०११/९३६/तक्रार २१३/०१**
**क्र.मुमाआ.२०११/९३७/तक्रार २१४/०१**
**क्र.मुमाआ.२०११/९३८/तक्रार २१५/०१**
**क्र.मुमाआ.२०११/९३९/तक्रार २१६/०१**
**क्र.मुमाआ.२०११/९४०/तक्रार २१७/०१**
**क्र.मुमाआ.२०११/८३१/तक्रार २१८/०१**
**क्र.मुमाआ.२०११/८३२/तक्रार २१९/०१**
**क्र.मुमाआ.२०११/८३३/तक्रार २२०/०१**
**क्र.मुमाआ.२०११/६१०/तक्रार २२१/०१**
**क्र.मुमाआ.२०११/४५९७७/तक्रार २२२/०१**

**श्री.फ्रेडी परेरा व श्रीमती मिशेल परेरा,**
**डी-२१, ओंम गुरुकुल को.ऑप.हौ.सो.लि.,**
**प्लॉट क्र.४७, सेक्टर-१९,**
**नेरुळ, नवी मुंबई ... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**सह निबंधक सहकारी संस्था सिडको यांचे कार्यालय,**
**रायगड भवन, ३ रा मजला, सी.बी.डी.बेलापुर,**
**नवी मुंबई ४०० ६१४. ... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक १८.०७.२०११**
**तक्रारदार - हजर**
**जन माहिती अधिकारी - हजर**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी - हजर**

तक्रारदार यांनी दि.१४.०८.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या दि.०८.०७.२००९ च्या माहितीच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे.

२. तक्रारदार यांनी दि.०८.०७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, सह निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात दि.०५.०४.२००९, दि.०५.०५.२००९, दि.१८.०५.२००९, दि.०८.०६.२००९ व

दि.३०.०६.२००९ रोजी केलेल्या तक्रारींच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही केली याबद्दलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार यांना दि.०४.०८.२००९ रोजी दि.१८.०५.२००९ व दि.०८.०६.२००९ रोजीच्या तक्रार अर्जावर सह निबंधक यांचेकडे सुनावणी ठेवण्यात आली होती. सुनावणीची कार्यवाही पुर्ण झाल्यावर योग्य तो निर्णय देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर ही कळविले नसल्यामुळे तक्रारदार यांनी पुन्हा दि.२२.११.२०१० रोजी सह निबंधक यांनी मॅनेजिंग कमिटीला दिलेल्या पत्राच्या प्रती मागितलेल्या दिसून येतात व त्याप्रमाणे सुध्दा दि.२४.१२.२०१० रोजी उत्तर दिलेले आहे. परंतु तक्रारदार यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी तक्रार दाखल केली.

३. त्यानंतर पुन्हा तक्रारदार यांनी दि.३०.११.२०१० रोजी Managing committee enquiry आदेश दिले आहे त्याची प्रत मागितलेली दिसून येते. त्यासंदर्भात दि.२४.१२.२०१० रोजी त्यांना उत्तर दिलेले आहे व सोबत कलम ८१ अन्वये केलेल्या आदेशाची प्रत सुध्दा देण्यात आली आहे.

४. त्यानंतर पुन्हा तक्रारदार यांनी दि.०५.१०.२०१० रोजी दि.०१.०४.२००९ ते दि.३०.०८.२०१० रोजी सह निबंधक यांचेकडे आलेल्या तक्रारींच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. त्याप्रमाणे तक्रारदार यांना माहिती मिळाली नाही म्हणुन प्रथम अपील सुध्दा दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.१५.०१.२०११ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. तत्पूर्वी दि.११.०१.२०११ रोजी तक्रारदार यांना माहिती दिलेली दिसून येते.

५. दि.३०.०६.२०१० रोजी जी.आर.गाईड लाईन्स ची माहिती मागितलेली दिसून येते. त्याप्रमाणे सुध्दा तक्रारदार यांना उत्तर दिलेले आहे.

६. दि.२३.१२.२०१० रोजी विभागात सुनावणीची नोटीस काढण्याच्या संदर्भात तसेच सुनावणीची नोटीस पाठविण्याच्या संदर्भात व पाठवल्याचा पुरावा मागितल्याची माहिती मागितलेली दिसून येते. त्याबाबत ही दि.२०.०१.२०११ रोजी माहिती उपलब्ध केली आहे.

७. दि.३०.१०.२०१० रोजी पुन्हा बंधपत्रच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे व त्याकरिता दि.१५.११.२०१० रोजी उत्तर देण्यात आले आहे.

८. दि.०५.१०.२०१० रोजी तक्रारीच्या संदर्भामध्ये व सुनावणीच्या संदर्भामध्ये (दि.१८.०५.२००९) श्री.डी.डी.रासकर, श्री.गवाने यांनी केलेल्या चौकशीचा व कार्यवाही माहिती मागितलेली आहे. त्यासंदर्भात दि.०३.११.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

९. त्यानंतर दि.०५.१०.२०१० रोजी श्री.तुपे, श्री.पवार यांनी केलेल्या चौकशीची व कार्यवाहीची माहिती मागितलेली आहे. त्यासंदर्भात दि.१८.१०.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

१०. त्यानंतर दि.११.०१.२०११ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० च्या अंतर्गत सह निबंधक (सिडको) यांनी कलम ८१ प्रमाणे दि.०१.०१.२०१० ते दि.३१.०१२.२०१० या कालावधीतील दिलेल्या आदेशाच्या प्रती मागितलेल्या आहे व त्याप्रमाणे दि.०२.०२.२०११ रोजी व दि.११.०२.२०११ रोजी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

११. त्यानंतर दि.०६.१०.२००९ रोजी सुध्दा माहिती मागितलेली दिसून येते व त्यासंदर्भात दि.०५.११.२००९ रोजी उत्तर दिले आहे. असे असून सुध्दा तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रारी केल्या आहेत.

१२. तक्रारदार यांनी ओम गुरुकुल, गृह निर्माण संस्था, प्लॉट नं.४७, सेक्टर १९, नेरुळ या संस्थेच्या संदर्भामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे वेळोवेळी ज्या तक्रारी केल्या होत्या त्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती या सर्व तक्रारीमधुन मागितलेली दिसून येते.

१३. तक्रारदार यांनी वरील प्रमाणे या सहकारी संस्थेच्या संदर्भात ज्या तक्रारी केलेल्या आहे. त्या सर्व तक्रारी या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या अंतर्गत आहेत. सदरच्या तक्रारींच्या संदर्भामध्ये सहकार खात्यामध्ये उपनिबंधक किंवा सह निबंधक यांना चौकशी करण्याचे अधिकार दिले असतात. त्याप्रमाणे चौकशी करुन निर्णय उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. परंतु आलेल्या तक्रारींच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची दखल घेतली नसल्यास किंवा तक्रारींच्या सुनावणीस विलंब झाल्यास किंवा सुनावणीच्या आदेशानंतर संस्थेच्या संदर्भात कार्यवाही न केल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे त्या कार्यालयास वेठीस धरण्याच्या दृष्टीने वेगवेगळया प्रकारची माहिती मागितली जाते व तसाच प्रकार या सर्व तक्रारींच्या संदर्भामध्ये दिसून येतो.

१४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या अंतर्गत तक्रारींची चौकशी करणे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे झाल्याने चौकशीच्या संदर्भातील माहिती मागणे या दोन भिन्न बाबी आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणास एखादया प्रकरणामध्ये तातडीने निर्णय घ्यावा किंवा निर्णय प्रक्रियेत हस्तक्षेप करावा अशा प्रकारे आदेश करता येत नाही. तर कोणत्याही झालेल्या निर्णय प्रक्रिये विषयीची कागदोपत्री व अभिलेख्यात असलेल्या माहितीची छायांकित प्रत मागता येते. वास्तविक तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारींच्या संदर्भामध्ये सुनावणी ठेवण्यात आली होती व सुनावणीची कार्यवाही पुर्ण झाल्यावर योग्य तो निर्णय देण्यात येईल असे कळविलेले असताना त्यांच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये जी, जी कार्यवाही झाली असेल ती सर्व कार्यवाहीची कागदपत्रे छायांकित प्रतीच्या स्वरुपात काळजी पूर्वक उपलब्ध करुन देणे संयुक्तीक झाले असते. परंतु कार्यालयाने किंवा जन माहिती अधिकारी यांनी याबाबत कोणत्याही प्रकारचा समंन्वये न ठेवता तसेच माहिती अर्जा संदर्भात दिलेल्या उत्तराप्रमाणे त्यांच्या तक्रारींवर झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना न दिल्याने या सर्व प्रकारच्या माहिती अर्ज दाखल केले व त्याबाबतच्या तक्रारी सुध्दा आयोगाकडे दाखल केल्या. कार्यवाहीची माहिती कळविली असती तर व प्रामाणिकपणे चौकश्या केल्या असत्या तर हे सर्व माहितीचे अर्ज व तक्रार अर्ज हे टाळता आले असते. या सर्व प्रकरणामध्ये जबाबदारीपेक्षा जबाबदारी टाळण्याकडे कल असल्यामुळे स्वत: हूनच काम वाढवून घेतले जाते असे दिसून येते व त्यामुळे तक्रारदार यांच्या तक्रारींच्या संदर्भामध्ये सुनावणी किंवा चौकशी करुन जे निर्णय घेतले असतील किंवा जे आदेश संस्थेस दिले असतील व त्या आदेशाप्रमाणे सर्व माहिती तक्रारदार यांना देणे संयुक्तीक राहील व त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार क्र.मुमाआ क्र.४३३२८/तक्रार क्र.२०६/०१ ही मंजूर करण्यात येत असून इतर तक्रारी या अनुषंगीक असल्यामुळे व त्यात काही व्यापक जनहित नसल्याने निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार क्र मुमाआ क्र.४३३२८/तक्रार क्र.२०६/०१ ही मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.०८.०७.२००९ च्या माहितीच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या तक्रार अर्जाच्या संदर्भामध्ये चौकशी होउन आदेश झाले असल्यास त्या आदेशान्वये झालेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती कागदपत्राच्या स्वरुपात विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करून द्यावी.**

२. उर्वरित सर्व तक्रारी निकाली काढण्यात येतात.
३.तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत द्यावी.

**Sd--**
(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १९.०७.२०११
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/नों.क्र.१२७३/तक्रार क्र.३२३/०१**

**श्री.बलवंत पि. चौधरी**
**अशोक नगर-४,**
**जुनी औ.वसाहत,**
**जळगांव. ... तक्रारदार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ,**
**एक्सलसियर सिनेमा इमारतीशेजारी,**
**९ वा मजला, ए.के.नाईक रोड,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१. ... गैरतक्रारदार**

**जन माहिती अधिकारी,**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक २१.०७.२०११**

**तक्रारदार - हजर**

**जन माहिती अधिकारी - हजर**

तक्रारदार यांनी दि.१३.०६.२०११ रोजी अधिनियमाचे कलम १८(१) प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या दि.०२.०५.२०११ रोजीच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन तक्रार दाखल केलेली आहे.

२. तक्रारदार यांनी दि.०२.०५.२०११ रोजी जन माहिती अधिकारी, उद्योग, उर्जा व कामगार विभाग व तसेच दि.०३.०५.२०१० रोजी मॅनेजिंग डॅरेक्टर महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळ, मुंबई यांचेकडे तसेच दि.२०.०५.२००६ रोजी मॅनेजिंग डॅरेक्टर महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळ, मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या तक्रारींच्या संदर्भामध्ये व त्यांचे दि.२८.०२.२००६ चे अर्जानुसार कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही व साधे उत्तरही दिले नाही असे आयोगापुढे सांगितले. तक्रारदार यांनी त्यांचे माहितीच्या अर्जामध्ये हिन्दुस्थान पेट्रोमर्स कंपनीचा मालक श्री.जानकीराम गणपत वारके याने म.रा.वित्त महामंडळ या संस्थेकडून वरील उद्योग समुहाचा कर्जमुक्तीचा ना हरकत दाखल मिळणे तसेच त्यावरील तारणमुक्त

करण्यासाठी तत्कालीन उद्योग मंत्री यांना दिलेल्या पत्रांवर कार्यवाही काय झाली तसेच उद्योग सचिव यांना दिलेल्या पत्रांवर कार्यवाही काय झाली व मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या पत्रावर काय कार्यवाही झाली अशी माहिती मागितली होती. तसेच मा.उच्च न्यायालयाने यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. तसेच आवश्यक ती प्रमाणपत्रे देण्यात यावीत असे आदेश दिलेले असताना कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दिलेली नाहीत. ती उपलब्ध करुन द्यावीत अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे आयोगापुढे सांगितले की, तक्रारदार यांना त्यांच्या दि.०२.०५.२०११ च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही कार्यासनात रुजु झाल्यानंतर दि.०१.०७.२०११ च्या पत्राव्दारे उत्तर पाठविले आहे. त्यांची त्या कार्यासनामध्ये नव्याने बदली झाली असल्याने व मे महिन्यामध्ये शासकीय कर्मचा-यांच्या बदल्या व रजा होत असल्याने व कार्यासनातील माहिती समजुन घेण्यामध्ये विलंब झाला आहे. श्री.चौधरी यांची पूर्वी जी तक्रार, निवेदने प्राप्त झाली आहे. ती निवेदने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाशी संबंधित असल्याने श्री.चौधरी यांना आवश्यकती माहिती पाठविण्यास महामंडळांना वेळोवेळी शासनामार्फत कळविण्यात आले आहे व त्यानुसार महामंडळाने त्या त्या वेळेस श्री.चौधरी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्या संदर्भातील प्रती जोडलेल्या आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन न देण्याचा कोणताही हेतू नव्हता असे त्यांनी आयोगापुढे मांडले.

४. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना आता पर्यंत वेळोवेळी दि.२१.०४.२००६, दि.१८.०९.२००६, दि.१५.०६.२००७, दि.१८.१०.२००७, दि.२४.१०.२००७, दि.०३.१२.२००७, दि.०१.०१.२००८, दि.२७.११.२००९ व आता दि.०४.०६.२०११ (०८.०६.२०११) रोजी वेळोवेळी त्यांच्या निवेदनांचे व पत्रांचे उत्तर दिलेले आहेत व त्या सर्व पत्रांच्या प्रती आयोगापुढे सादर केलेल्या आहेत. तक्रारदार यांनी मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही असे जे म्हटलेले आहे त्या संदर्भामध्ये महामंडळाच्या दि.०३.१२.२००७ च्या पत्रामध्ये मुद्दा क्र.४ मध्ये महामंडळाच्या व्याज आकारण्याच्या पध्दतीनुसार जळगांव येथील दिवाणी न्यायालयात २००१ साली दावा दाखल करण्यात आला होता. तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर दाखल केलेली याचिका ऑक्टोंबर २००५ मध्ये ना मंजूर करण्यात आलेली आहे असे

कळविलेले आयोगाचे निदर्शनास आणले. सर्व पत्रांचे वाचन एकत्रित वाचन केल्यावर संपूर्ण प्रकरणांची माहिती त्यात आढळून येते.

५. तक्रारदार यांनी मा.उच्च न्यायालयाचा जो निर्णय आयोगापुढे सादर केलेला आहे. त्यामध्ये ना हरकत पत्र द्यावे असा कोणताही निर्णय दिसून येत नाही. याचिकाकर्त्यांनी काय विनंती केली आहे ती त्या निर्णयाच्या सुरुवातीला मा.उच्च न्यायालयाने नमूद केलेली आहे व निर्णय हा खालीलप्रमाणे दिलेला आहे.

"The petitioner desires that the record be called from the respondent for the purpose of ascertaining the payment of loss etc. Thus it is a matter for settlement of the accounts with the respondent for that purpose, alternate remedy of civil suit is available to the petitioner. We are not inclined to entertain the petition. It is hereby rejected." असे असले तरी वित्तीय महामंडळाचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मा.उच्च न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे महामंडळातील अधिकारी हे केव्हाही अर्जदाराने योग्य प्रस्ताव सादर केल्यास व दोन ही बाजूकडून लेखापाल किंवा सनदीलेखापाल यांच्या उपस्थितीमध्ये जमा खर्चाचा हिशोबाचा ताळमेळ साधता येईल. तसे आज अर्जदाराकडे एकूण अंदाजे एक कोटी चौवीस लाखापर्यंत महामंडळाचे येणे निघते. त्यात खर्चाचा ताळमेळ करुन तडजोडीसाठी महामंडळाच्या समितीकडे निर्णयासाठी सादर करता येईल. असे मान्य असल्यास तक्रारदार यांनी वरील प्रमाणे प्रस्ताव महामंडळाकडे सादर करणे संयुक्तीक राहील. मात्र माहितीच्या अधिकारातील माहिती त्यांना उपलब्ध करून दिली असल्याने सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही निकाली काढण्यांत येते.**
**२.तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१.०७.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/११८२/तक्रार क्र. २७१/०१**

**श्री. चेतन कोठारी**
**५२, ओशियानीक अपार्टमेंट,**
**डॉ. राजाबाली पटेल लेन, बी. देसाई रोड,**
**मुंबई ४०००२६. ... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (इमारत व कारखाने),**
**के/पश्चिम वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**गुंदवली, आझाद रोड, मुंबई ४०००६९. ... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - १८/०७/२०११**
**तक्रारदार प्रतिनिधी - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि. २०/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.) यांनी मागितलेल्या माहितीच्या सदर्भात अवाजवी खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले असल्यामुळे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भात छायांकित प्रती तर उपलब्ध करुन दिलेल्या नाहीच परंतु रु २७/- प्रती पृष्ठ खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध प्राप्त करुन घ्यावी असे कळविले . प्रती पृष्ठ हे कशाच्या आधारे त्यांनी आकारले याबद्दलचा कोणताही खुलासा त्यांनी केलेला नाही.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रमाणित प्रतीच्या करुन देण्याचे त्यात अभिप्रेत आहे. परंतु राज्य माहिती आयोगाने दि. ०२/०२/२०११ रोजी सुनावणी घेऊन दि. ३१/०३/२०११ रोजी प्रमाणित प्रतीचा खर्च आकारण्यात येईल असा निर्णय दिलेला असून सूध्दा तक्रारदार यांना दि.११/०५/२०११ रोजी प्रमाणित प्रतींच्या खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले आहे. यावरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी व आयुक्त हे राज्य माहिती आयोगाच्या निर्णय संदर्भामध्ये गंभीर आहेत असे दिसून येत नाही. अन्यथा राज्य माहिती आयोगाच्या दि. ३१/०३/२०१० रोजीच्या निर्णयाच्या अनुषंगाने संपूर्ण बृहन्मुंबईमध्ये माहितीच्या अर्जाच्यासंदर्भात समान असा खर्चाची आकारणी करण्याची तसेच नियमांप्रमाणे कामकाज करण्याचे आदेश काढून सूसूत्रता आणली असती. त्यामुळे पुन्हा एकवेळ बृहन्मुंबई

महानगरपालिका यास सार्वजनिक प्राधिकरण म्हणून ओदश जरुरीचे झालेले आहेत. तसेच तक्रारदार यांनी मागितलेली माहिती ही विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व अवाजवी खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले असल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१. तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून आयुक्त महानगर पालिका यांनी हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत मूमाआ/नोंदणी क्रमांक २०११/७१/तक्रार क्र.२५/२०१० आणि मुमाआ/नोंदणी क्र.५०१४४/अपिल क्र.६३३६ मधील दि. ३१/०३/२०१० रोजी देण्यात आलेला निर्णयासंदर्भात सर्व महानगरपालिकेमध्ये सूसूत्रता आणण्याच्या दृष्टिने नियमोचे सूसूत्रिकरण करुन सर्व माहिती अधिकाऱ्यांना वितरित करण्याचे जे ओदश दिलेले होते त्या आदेशाप्रमाणे पुनहा नियमांचे सूसूत्रिकरण करुन सर्व जन माहिती अधिकारी यांना कळविण्यात यावे.**

**२. तक्रारदार यांनी त्याचे दि ०९/०४/२०११ च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**३. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १८-०७-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

१) निवडनस्ती
२) स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/४४३६०/तक्रार क्र. २६१/०१**

**श्री. राहूल शर्मा,**
**फ्लॅट नं. ५५३, नीलकांत अपार्टमेंट,**
**सेक्टर-१३, रोहिणी , दिल्ली -८५ ...तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी,**
**श्री. साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी,**
**पोष्टः शिर्डी-४२३१०९, ता. राहाता, जि.अहमदनगर. ...गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - १८/०७/२०११**
**तक्रारदार - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि. निरंक अर्जाप्रमाणे मागितलेली माहीती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगापुढे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, तक्रारदार यांनी दि.१२/०८/२०१० रोजी खर्चाचा भरणा केला परंतु त्यानंतर दि. २६/०९/२००९ रोजी ९११ पृष्ठ रजिस्टर पोस्टाने त्यांना पाठविण्यात आले होते. परंतु ती माहिती अपूर्ण आहे असे दि.०२/१०/२००९ रोजी कळविले. त्यानंतर पुन्हा त्यांनी दि. १७/११/२००९ रोजी रु.७०२/-चा खर्चाचा भरणा करावा असे कळविले त्याप्रमाणे त्यांनी रु. ७०२/- चा भरणा केला व त्यांना दि. १८/०१/२०१० रोजी एकूण ३०९ पृष्ठे पाठविण्यात आली. यावरुन तक्रारदार यांना आतापर्यंत सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात यावी. तसेच तक्रारदार यांच्या दि. २९/०६/२००९ रोजीच्या अर्जातील क्र. ८,९ अन्वये काही माहिती मागणी केलेली आहे. श्री. शर्मा यांना सन २००४ पासून विश्वस्तांसाठी केलेल्या वाहन तसेच इतर उपलब्ध खर्चाची माहीती दिलेली आहे. सन १९९२ पासूनची माहिती संगणकिकृत नसल्याने त्यासाठी खूप कालावधी व मनुष्यबळ लागणार आहे. तरी श्री. शर्मा यांनी त्यासाठी शिर्डी येथे येऊन व्हाऊचर तपासणी करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसे असल्यास तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (त्र) प्रमाणे माहितीचा अधिकार या व्याख्येच्या संज्ञेप्रमाणे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आदेशानुसार तपासणी/निरिक्षण करुन आवश्यक ती माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.
२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्या यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १८-०७-२०११.
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती
२) स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.४९/अपील क्र.६८५१/०२**

**श्री. दिवाकर आर. कोटियन व श्री. क्रिस बी. अमन्ना,**
**दुकान क्र. ४/१०, महम्मद जान मुनिर चाळ,**
**साईवाडा, राजर्षी शाहु महाराज मार्ग,**
**अंधेरी (पू.), मुंबई ४०० ०६९.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी**
**मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय,**
**मुंबई ४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय,**
**मुंबई ४०००३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ४०००३२.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - १०/१२/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ११/०७/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी**
**(मुख्यमंत्री सचिवालय) - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी**
**गृह निर्माण विभाग - अनुपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०७/०७/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव मुख्यमंत्री कार्यालय यांचेकडे दिनांक. १८/०५/२०१० रोजी जे तक्रारपत्र दिलेले होते त्या अनुषंगाने

झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती सर्व साधारण टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सोबत दि. १८/०५/२०१० रोजीच्या अर्जाची प्रत जोडलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. १५/०७/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव मुख्यमंत्री सचिवालय यांनी अपिलकर्ता यांना त्यांचा माहितीचा अर्ज सचिव गृहनिर्माण विभाग यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (३) अन्वये हस्तांतर केलेला असून या पूर्वीचा दि.१८/०५/२०१० रोजीचा अर्ज दि. १०/०६/२०१० अन्वये गृहनिर्माण विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे व संबधित जन माहिती अधिकारी गृहनिर्माण विभाग मंत्रालय मुंबई ४०००३२, यांचेकडे संपर्क करण्याचे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झ ााल्यामुळे त्यांनी पुन्हा अपिलीय अधिकारी तथा प्रधान सचिव मुख्यमंत्री सचिवालय यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भात दि. ०८/०९/२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जासंदर्भात कळविण्यात आलेले होते. परंतु अपिलकर्ता यांना मात्र माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगपुढे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांनी युक्तिवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी एस.आर.ए. संदर्भात तक्रार केलेली होती सदरच्या तक्रारी संदर्भात चौकशी व्हावी अशी त्यांची अपेक्षा होती व म्हणून त्यांनी अर्ज हा माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे केलेला होता. परंतु त्यांना माहिती मिळाली नाही व त्यांचा माहितीचा अर्ज हा गृहनिर्माण विभाग व गृहनिर्माण विभागाने तो झोपडपट्टी पुर्नवसन प्रधिकरण यांच्याकडे पाठविला. परंतु त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, मुख्यमंत्री कार्यालयामध्ये अनेक तक्रार अर्ज येत असतात ते वेगवेगळया विभागाशी संबधित असतात मुख्यमंत्री कार्यालय हे प्रत्यक्ष कोणत्याही तक्रार अर्जावर कारवाई करत नाही किंवा कारवाई करणे सुध्दा अशक्य आहे व शासनाच्या कामकाजाच्या नियमानुसार ज्या विभागाचा विषय असेल त्या विभागाकडे सबंधित तक्रार किंवा अर्ज हस्तांतर करावा लागतो. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांचा अर्ज हा गृहनिर्माण विभागाकडे हस्तांतर केलेला आहे. अपिलकर्ता यांनीच आयोगाच्या निदर्शनास असे आणले की, गृहनिर्माण विभागाने सुध्दा माहिती अधिकारी
झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकारण, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू.), मुंबइ- ४०००५१ यांच्याकडे अर्ज हस्तांतर करण्यात आलेला होता असे दि. २३/०८/१० रोजी कळविण्यात आलेले आहे मात्र माहिती मिळाली नाही.

अपिलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जात मा. मुख्यमंत्री कार्यालयातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या विरुध्दच अपील दाखल केलेले असल्यामुळे राज्य माहिती आयोगाचे कार्यालयाने नोटीस या मा. मुख्यमंत्री कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या संदर्भातच काढण्यात आलेल्या आहेत. त्यामुळेच ज्या माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती आहे त्या झ ाोपडपट्टी पूर्नविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे या कार्यालयातील माहिती अधिकारी यांना नोटीस काढता आलेली नाही व त्यामुळे ते हजर सुध्दा नाही. परिणामी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. त्याबद्दल मा. मुख्यमंत्री कार्यालयातील उपस्थित असलेले जन माहिती

अधिकारी हे कोणत्याही प्रकारे अर्जाच्या संदर्भातील कार्यवाहीची माहिती देऊ शकत नाहीत. त्यांच्याकडील कारवाईची माहिती त्यांनी दिलेली आहे. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी झ ोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, यांच्या विरुध्द प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केले असते तर त्या अधिकाऱ्यांना आयोगाच्या कार्यालयातून नोटीस काढण्यात आली असती. असे असले तरी त्यांच्या दि. १८/०५/२०१० च्या तक्रार अर्जासंदर्भात काय कारवाई झाली याबद्दलची माहिती, जन माहिती अधिकारी, झोपडपट्टी पुर्नवसन प्रधिकारण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१ यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे त्यांच्या संदर्भात आदेश करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करणे आवश्यक आहे.

**--- आदेश---**

**१. अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत जन माहिती अधिकारी, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू.), मुंबई ४०००५१ यांनी अपिलकर्ता यांना दि. ०७/०७/२०१० रोजीच्या माहितीच्या अर्जात विचारलेल्या दि. १८/०५/२०१० रोजीच्या तक्रार अर्जाच्या सदंर्भात झालेल्या कारवाईची माहिती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२. सदरच्या निर्णयाची एक प्रत जन माहिती अधिकारी, झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण यांचे कडे स्वतंत्रमणे पाठविण्यात यावी.**

**३. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ११-०७-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१. जन माहिती अधिकारी, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू.)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.४४/अपील क्र.६८५०/०२**

**श्री. गोपीनाथ रामा साळवी,**
**१९२/१५३४, मोतीलाल नगर १,**
**गोरेगाव (प.), मुंबई ४००१०४. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी**
**जिल्हा परिषद, ठाणे (अर्थ विभाग),**
**ठाणे.**

**जन माहिती अधिकारी**
**जिल्हा परिषद, ठाणे (अर्थ विभाग),**
**ठाणे. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - ०९/१२/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ११/०७/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. २५/०८/२०१० रोजी जन माहिती अधिकारी (अर्थ विभाग) जिल्हा परिषद ठाणे, जिल्हा परिषद अध्यक्ष, सदस्य, पंचायत समिती अध्यक्ष व सदस्य पंचायत समिती यांचेकडे सरकारी निधी कोणकोणत्या कामासाठी वापरले जातात त्या संदर्भात एकूण १४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२३/०१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अलिपकर्ता यांनी युक्तिवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, ज्याप्रमाणे आमदार व खासदार यांना विकास निधी मिळतो त्याप्रमाणे जिल्हा परिषद पदाधिकारी पंचायत समिती, पदाधिकारी व सदस्य यांना सरकारी निधी मिळतो किंवा नाही व मिळत असल्यास त्याबद्दलची माहिती मागविली असल्याचे दिसून येते. परंतु, अद्यापपर्यंत कोणतीही माहिती त्यांना मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती माहिती अर्थ विभागात उपलब्ध नसल्यामुळे अपिलकर्ता यांना दि. ३१/०८/२०१० रोजीच सदर माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद ठाणे, यांच्याकडून घेणेबाबत कळविलेले होते. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल झालेली नाहीत. तसेच त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारची सुनावणी किंवा निर्णय झालेला नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा असे सांगितले की, अपिलकर्ता यांना मुद्देनिहाय माहिती रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु जी माहिती आता उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपिलकर्ता यांना दि.२५/०८/२०१० रोजीच्या अर्जानुसार हस्तांतर न करता उपलब्ध करुन देता आली असती व तेव्हाच अपिलकर्ता यांना अशाप्रकारे कोणताही फंड किंवा निधी जिल्हा परिषद पदाधिकारी यांना उपलब्ध नसतो हे कळविता आले असते. मात्र संबधित जन माहिती अधिकारी तसेच उपमुख्य अधिकारी ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे अर्ज हस्तांतर केला. त्यांनी सुध्दा सदरच्या अर्जाची दखल घेतलेली नसल्यामुळे संबधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची दखल घेतलेली नाही. प्रथम अपिलाची दखल घेतली असती तर एकाच जिल्हा परिषदेमध्ये मागितलेली माहिती ही ज्या माहिती अधिकाऱ्याकडे असेल त्या माहिती अधिकाऱ्याला माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात आले असते परंतु, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तसे न केल्यामुळे त्यांचे विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम १९(१) तसेच शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे. जेणेकरुन माहिती अधिकाऱ्यांची अर्जाच्या संदर्भात जी प्रवृत्ती दिसून येते त्याबद्दल काळजी घेतली जाईल. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१. अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असलीतरी ती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे व ती अद्यापही त्यांना प्राप्त झालेली नाही त्यामुळे संबधित जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी सक्षम अधिकारी यांना द्यावे.**

२. प्रथम अपिलीय अधिकारी जिल्हा परिषद, ठाणे यांनी प्रथम अपिलाची दखलच घेतलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांनी प्रशासकिय कारवाई करावी.
३. सदरच्या निणर्याची एक प्रत मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद यांचेकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात येईल.
४. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ११-०७-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद-ठाणे, ठाणे यांचेकडे उचित कार्यवाहीसाठी अग्रषित.
२. निवडनस्ती (शास्ती)
३. निवडनस्ती.
४. स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.४३/अपील क्र.६८४९/०२**

**श्री. राजेश रमेश रुमडे,**
**ए- १०६९, भांडूप इंडस्ट्रियल इस्टेट,**
**पन्नालाल कंपाऊंड, एल बी. एस. मार्ग,**
**भांडूप (प.), मुंबई ४०००७८.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव**
**महसूल व वन विभाग /(म-१),**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यासन अधिकारी,**
**महसूल व वन विभाग/(म-१),**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - २७/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ११/०७/२०११.**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी दि. २८/१०/१० रोजी I have received satisfactory reply, No further hearing is required असे लिहून दिले हाते. तसेच त्यांना दि. १२/०७/२०१० रोजीच्या अधिसुचनेची प्रत देण्यात आली असे लेखी दिलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांना द्वितीय अपील दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. तसेच मागितलेली माहितीही अभिलेखाच्या स्वरुपात मागितलेली नसल्याने, त्यांना तसे कळविण्यात आलेले होते. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळस अपिलकर्ता व्यक्तीशः हजर होते, मागितलेल्या माहितीबाबत संपूर्ण खुलासा करण्यात आलेला होता. त्याप्रमाणे अर्जदारास भारतीय राजस्व तिकीटांची विक्री पोस्ट विभागामार्फत करणेबाबत दि.१२/०७/१० रोजीची अधिसूचना त्यांना देण्यात आली होती. अपिलकर्ता यांच्या द्वितीय अपील मेमोचे अवलोकन केले असता त्यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच दिलेले नाही वगैरे अशी तक्रार केलेली आहे. परंतु माहिती अधिकारी यांनी दाखल

केलेल्या कागदपत्रांवरुन अपिलकर्ता यांनी वर नमूद केल्याप्रमाणे स्वतः लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१. अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**

**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ११-०७-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१. निवडनस्ती**

**२. स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.४१/अपील क्र.६८४८/०२**

**श्री.मौलाना मोहम्मद फैजुद हक्क,**
**मस्जीद चाळ, वडार पाडा रोड नं.२,**
**कांदीवली (पू.), मुंबई ४००१०१. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ-१२),**
**शैलेंद्र नगर, दहिसर (पू.), मुंबई ४०००६८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,**
**कांदिवली (पू.), मुंबई ४००१०१. ...उत्तरवादी**

अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २७/०६/२०११ रोजी अपील मागे घेत आहे असा अर्ज दिलेला असल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**--- आदेश---**

**१. अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.८३४/अपील क्र.६८६७/०२**

**सौ. लता कुंदन भालेराव,**
**१४८/४१३ 'बी, चौथा मजला, टागोर नगर,**
**विक्रोळी, मुंबई ४०००८३. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधिश-१,**
**जिल्हा न्यायाधिश-१ यांचे कार्यालय,**
**जिल्हा- अकोला.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**जिल्हा सत्र न्यायालय, अकोला**
**जिल्हा. अकोला. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - २०/१२/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १३/०७/२०११.**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१६/०९/२०१० रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा सत्र न्यायालय अकोला यांचेकडे H.M.P. no 97/2005 दि. २१/०६/२००५ रोजी विनोद विरुध्द विद्या, निर्णय दि२२/०३/१० रोजीच्या निर्णयाच्या प्रती व संपूर्ण माहिती सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे व (एकूण १२ मुद्दे उपस्थित) मागितली. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि. २४/०९/१० रोजी The information sought by you pertains to judicial proceedings which can be obtained under existing Bombay High Court Rules असे कळविलेले असून इतर मुद्यांच्या माहितीच्या संदर्भात मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक असल्यामुळे त्यांची माहिती देणे माहितीच्या अधिकारात अभिप्रेत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम ,२००५ चे कलम २ (त्र) प्रमाणे सदर माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि. १८/१०/१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. २२/११/११ रोजी दिलेली असून अपिलकर्ता यांनी प्रमाणित प्रती घेऊन अर्ज घेणार असे मान्य केल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे त्यांचे समाधान न झ ाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता हे गैरहजर आहेत. त्यांच्या द्वितीय अपील मेमो मध्ये H.M.P. no 97/2005 दि. २१/०६/२००५ रोजी दाखल फॅमेली कोर्टात केस चालेल या कारणावरुन २००८ ते २०१० पर्यंत काहीही न कळविता प्रलंबित ठेऊन दि. २२/०३/२०१० रोजी केस डिसमिस करण्यात आली, इत्यादी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातच वर्णन केलेले आहे. परंतु द्वितीय अपील का केले याबद्दल कोणताही प्रकारचे कारण त्यामध्ये दिलेले नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे प्रतिनिधी हजर झालेले आहेत, त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २८ प्रमाणे सक्षम प्राधिकारी म्हणून मा. उच्च न्यायालयाने न्यायपालिकेच्या व सत्र न्यायालयाच्या संदर्भात जे नियम कळविलेले आहेत त्या नियमांप्रमाणे न्यायालयीन प्रकरणातील माहिती जरी मागितलेली असेल तरी ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे उपलब्ध होणार नाही, ती Bombay High Court Rules प्रमाणे अर्ज करुन प्रमाणित प्रती उपलब्ध करुन घेता येईल असे कळविले होते. अधिनियमाचे कलम २८ प्रमाणे सक्षम प्राधिकारी यांनी केलेले नियम हे अधिनियमाचाच भाग असल्यामुळे तसेच त्याप्रमाणेच अर्जदाराने माहिती मागितल्याने Bombay High Court Rules प्रमाणेच माहिती मिळालेली आहे. तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस अपिलकर्ता यांच्या निदर्शनास आणल्यावरुन Bombay High Court Rules प्रमाणे प्रमाणित प्रती घेणार असे मान्य केल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा ती माहिती नाकारलेली आहे ती योग्य आहे या कारणास्तव प्रथम अपील हे निकाली काढण्यात आले होते असे असून सुध्दा त्यांनी द्वितीय अपील का दाखल केले याबद्दल त्यांनी कोणतेही कारण दिलेले नाही. तसेच अपिलकर्ता यांनी माहितीच्या अर्जात कोर्टातील सुनावणी प्रक्रियेच्या व नियमप्रक्रियेच्या संदर्भामध्ये जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्या प्रश्नांच्या संदर्भात कोणतीही माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध नसल्यामुळे ती नाकारण्यात आली आहे.

अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय या सर्वांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी नियम प्रक्रियेच्या संदर्भात माहिती मागितली होती, तसेच सुनावणीच्या दरम्यान नियमप्रक्रियेच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अभिप्राय मागितले त्या संदर्भात विचार केला असता मा. मुख्य न्यायाधिश, उच्च न्यायालय यांच्या समक्ष प्राधिकारी म्हणून कलम २८ प्रमाणे जे नियम लागतात त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या अर्जातील माहिती नाकारलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे माहीती ही सार्वजनिक प्रधिकरणामध्ये कागदपत्रांच्या, दस्तऐवजांच्या, अभिलेखाच्या स्वरुपात उपलब्ध असल्यास त्यांच्या प्रमाणित प्रती पुरविणे अपेक्षित असते. अपिलकर्ता यांनी त्यांच्या अर्जातील इतर मुद्यांमध्ये मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितल्यासारखी आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे जन माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देणार, जन माहिती अधिकारी यांच्या प्रकारणातील नियमप्रक्रियेच्या संदर्भात अभिप्राय अपेक्षित नाही व त्यामुळे त्याबाबत सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे. त्यामुळे

अपिलकर्ता यांना नियमप्रकरणातील कागदपत्रांची माहिती हवी असल्यास Bombay High Court Rules च्या तरतूदी प्रमाणे अर्ज करुनच प्रमाणित प्रती मिळू शकतील. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१. अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.**
**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १३-०७-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.५०७९६/अपील क्र.६८७०/०२**

**श्री. मोहम्मद शरीफ शब्बीर अहमद,**
**यु.टी.नं- ११३२, २/४ (MCP),**
**मुंबई मध्यवर्ती कारागृह,**
**आर्थर रोड, मुंबई ४०००११.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी**
**औरंगाबाद महानगरपालिका कार्यालय,**
**औरंगाबाद ४३१००१.**

**जन माहिती अधिकारी**
**औरंगाबाद महानगरपालिका कार्यालय,**
**औरंगाबाद ४३१००१.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - २४/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १३/०७/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ०८/११/१० रोजी जन माहिती अधिकारी औरंगाबाद महानगरपालिका यांच्या कडे रेल्वे स्टेशन ग्राऊंडवर सन २००५ मध्ये मुस्लीम धार्मिक मेळावा अर्थात इजतेमा हा एखाद्या मुस्लीम समाजाने किंवा संस्थेने आयोजित केला होता का? व त्या मेळाव्यास परवानगी घेतली होती का? याबाबत पाच मुद्यामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. परंतु, अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे थेट द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता हजर आहेत, त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी रजिस्टर पोस्टाने जन माहिती अधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे माहितीचा अर्ज पाठविला होता. परंतु, सदरचे पाकिट हे न स्वीकारताच परत आलेले आहे. यावरुन माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे, व पत्रावर RTI असे सुध्दा त्यांनी दिलेले आहे. यावरुन औरंगाबाद महानगरपालिकाकडे माहितीचा अर्ज पाठविल्यास तो स्वीकारला जात नाही व त्याबाबत योग्य ती कारवाई आयोगाने करावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे. सहाय्यक संचालक नगररचना तथा प्रथम अपिलीय

अधिकारी महानगरपालिका यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झालेला नाही व प्रथम अपील सुध्दा त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले नाही व त्याबबत कोणतीही माहिती नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याची किंवा टाळाटाळ करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. परंतु, आता माहितीचा अर्ज हा आयोगाचे कार्यालयातून प्राप्त झालेला असल्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देता येईल असे असले तरी औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयातील आवक कक्षेमध्ये जिथे पोस्टाचे टपाल घेतले जाते त्या कर्मचारी किंवा अधिकाऱ्याविरुध्द योग्य ती प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक होते. परंतु अशा प्रकारची कारवाई न करताच आयोगापुढे सुनावणीस हजर राहणे हे सुध्दा तितके योग्य नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१. अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांच्या दि. ०८/११/१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत माहिती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२. औरंगाबाद महानगरपालिका आवक कक्षेमध्ये/ नोंद कक्षेमध्ये जे कर्मचारी टपाल स्वीकारत नाहीत व दि.०८/११/१० रोजी जे कर्मचारी त्या कक्षेमध्ये कार्यरत होते त्या कर्मचाऱ्याविरुध्द चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन प्रशासकिय कारवाई करावी.**

**३. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १३-०७-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**३) निवडनस्ती**
**४) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.५०७९५/अपील क्र.६८६९/०२**

**श्री. मोहम्मद शरीफ शब्बीर अहमद,**
**यु.टी.नं- ११३२, २/४ (MCP),**
**मुंबई मध्यवर्ती कारागृह,**
**आर्थर रोड, मुंबई ४०००११.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी**
**पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद,**
**मिल कॉर्नर, औरंगाबाद- ४३१००१.**

**जन माहिती अधिकारी**
**पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद,**
**मिल कॉर्नर, औरंगाबाद- ४३१००१.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - २२/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १३/०७/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ०२/०८/२०१० रोजी जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय यांच्याकडे सन२००५ मध्ये मुस्लीम संस्थेने औरंगाबाद येथील रेल्वे स्टेशन ग्राऊंडवर आयोजित केलेल्या इजतेमा संदर्भात ५ मुद्यामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि. १३/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपिलकर्ता यांनी युक्तिवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी इजतेमा आयोजित करण्याच्या संदर्भात पोलीस परवानगी घेतलेली होती का व घेतली असल्यास त्या संदर्भातील कागदपत्रे वगैरे मागितली आहेत. परंतु त्यांच्या अर्जाची दखलच घेतली गेली नाही. तसेच प्रथम अपीलाची सुध्दा दखल घेतली गेली नाही, त्यामुळे त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. तसेच उत्तरवादी गैरहजर आहेत व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत किंवा सुनावणीच्या संदर्भात कोणतेही पत्र सुध्दा दिलेले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय,

औरंगाबाद यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे. जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी हे स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी सुध्दा आयोगापुढे हजर झालेले नसल्यामुळे त्यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे. तसेच माहिती देण्याची सुध्दा टाळाटाळच केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागेल व त्यामुळे जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त (कार्यालय), औरंगाबाद हे शास्तीस पात्र आहेत. त्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत अलिपकर्ता यांना त्यांच्या दि. ०२/०८/२०१० रोजीच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२. तत्कालीन जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कारवाई सक्षम अधिकारी यांनी करावयाची असल्याने सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**३. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १३-०७-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१. पोलीस आयुक्त, औरंगाबाद, जिल्हा-औरंगाबाद यांचेकडे योग्य तया कार्यवाहीसाठी अग्रेषित.**
**२. निवडनस्ती**
**३. निवडनस्ती (शास्ती)**
**४. स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र. ५०२६५/अपील क्र.६८६८/०२**

**श्री. गिरीश के. मिश्रा**
**सी-१०३, गॉड्स गिफ्ट को. ऑ. हौ. सो. लि.सी.विंग,**
**एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल (प.),**
**मुंबई ४०००१३.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी**
**सह-आयुक्त विक्रिकर विभाग (P.T),**
**'बी' विंग, तिसरा मजला, सबर्बन विक्रिकर भवन,**
**बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी**
**सह-आयुक्त विक्रिकर विभाग (P.T),**
**'बी' विंग, तिसरा मजला, सबर्बन विक्रिकर भवन,**
**बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.),**
**मुंबई ४०० ०५१.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - २५/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १३/०७/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. १५/०५/२०१० रोजी जन माहिती अधिकारी विक्रिकर भवन, माझगाव यांचेकडे Profession Tax Division matter संदर्भात एकूण सहा मुद्यामंध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि. १२/०६/२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. ०६/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. ३१/०७/२०१० रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती माहिती दिलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले होते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांना राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती ही चूकीची व दिशाभूल करणारी आहे तसेच त्यांना नस्तीचे निरिक्षण देण्यात आलेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता हे त्यांच्या कार्यालयात विक्रिकर संदर्भात एजन्ट म्हणून काम करतात व अनेक अर्जांमधून माहिती मागत असतात. अपिलकर्ता हे नेहमी मोघम स्वरुपात माहिती मागतात, ते कोणत्याही विशिष्ट प्रकरणातील माहिती मागत नाहीत. ते एजन्ट म्हणून काम करतात त्या करिता ते माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या तरतूदींचा वापर करतात. परंतु शेकडो प्रकरणांची मोघम माहिती मागितल्यास कार्यालयास सुध्दा सदरची माहिती पुरविणे शक्य होत नाही. व या बाबत अपिल क्र. मुमाआ/५०२४९/अपील क्रमांक ६२०२/२०१०, गिरिश मिश्रा विरुध्द जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयफकत विक्रिकर (पी.टी.) मुंबई या अपीलामध्ये त्यांनी ६५ केसचे निरिक्षण मागितले होते, त्यातील २३ केसचे निरिक्षण देण्या संदर्भात निर्णय दिलेला आहे. सदरचा निर्णय सुध्दा स्वयंस्पष्ट असून अपीलकता यांनी सार्वजनिक हिताकहरता माहिती मागितलेली नसल्याने याकारणास्तव अपील निकाली काढण्यात आलेले होते. सदरचे निर्णयामध्ये अपिलकर्ता यांनी त्यासंदर्भात स्पष्ट असे अभिप्राय व्यक्त केलेले आहेत. अपील क्रमांक २०१०/४३३७/०२ अपिलकर्ता विरध्द माहिती अधिकारी सहआयुक्त विक्रिकर आयुक्त, बांद्रा यामध्ये सुध्दा राज्य माहिती आयुक्त रामानंद तिवारी यांनी अपील हे निकाली काढले, अशा तऱ्हेने अपिलकर्ता यांनी माहिती दिलेली नाही तरी ते त्या त्या अधिकाऱ्यांची वैयक्तिक माहिती सुध्दा मागत असतात व अशा प्रकारे कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित नसताना माहिती मागण्यात येत असते हे स्पष्ट असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १३-०७-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०१५४/अपील क्र.६३२२/०२**

**श्री. धीरज एम. वाला,**
**ए/१०३, वर्धमान नगर, डॉ. आर. पी. रोड,**
**मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव),**
**बृहन्मुंबई महानरपालिका, पूर्व उपनगरे, पेपर मिल कंपाऊड,**
**एल बी एस मार्ग, विक्रोळी (प.), मुंबई ४०० ०८३.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक (आयुक्त),**
**महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,**
**खोली क्र. ४६, १ माळा जुनी इमारत,**
**महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कायकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) ,**
**पूर्व उपनगरे - II, बृहन्मुंबई महानरपालिका, पूर्व उपनगरे,**
**पेपर मिल कंपाऊड, एल बी एस मार्ग,**
**विक्रोळी (प.), मुंबई ४०० ०८३.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक १८/१०/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ०२/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. १७/०५/२०१० रोजी जन माहिती अधिकारी महानगरपालिका मुंबई यांचेकडे माननीय न्यायालयामध्ये दाखल केलेल्या ॲफिडेविटमध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उदा. Shopping line is saprate building not attached or connected with the building in which I own a flat. तसेच फ्लॅट नं १०३ ला एकच बाल्कनी आहे व त्यास जाण्यासाठी बांधकाम अपिलकर्ता यांनी केलेले आहे असे अशाप्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि. ०१/०६/२०१० रोजी उप विधी अधिकारी तथा माहिती

अधिकारी (City Civil Court and E.S) यांनी मागितलेली माहिती या कार्यालयामध्ये उपलब्ध नाही. ती उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) (पूर्व उपनगरे) यांच्या कार्यालयामध्ये मिळू शकेल, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे सदरचा अर्ज हा उपप्रमुख अभियंता (इमारत व प्रस्ताव) (पूर्व उपनगरे) यांच्या कार्यालयाकडे हस्तांतरित केलेला आहे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) E.S.-2यांनी दि. २४/०६/२०१० रोजी प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात उत्तरे देता येणार नाहीत. मात्र कार्यालयात उपलब्ध असलेल्या नस्तीचे निरिक्षण घेऊन आवश्यक सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेता येतील. परंतु ही बाब दि. २४/०६/२०१० रोजी प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळेसच कळविण्यात आलेली आहे, असे असून सुध्दा अपिलकर्ता यांनी दि. ३०/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. पुन्हा अपिलकर्ता यांना कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) यांनी दि. ०२/०७/२०१० रोजी उपप्रमुख अभियंता यांनी सुनावणीमध्ये सांगितल्याप्रमाणे नस्तीचे निरिक्षण करुन उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती घ्याव्यात असे कळविले. दि. २९/०७/२०१० रोजी प्रथम अपीलाच्या संदर्भात अपिलकर्ता यांनी दहा दिवसाच्या आत नस्तीचे निरिक्षण करुन आवश्यक त्या छायांकित प्रती योग्य ते शुल्क भरुन मिळव्याव्यात असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, ते ज्या सदनिकेत राहत आहेत त्या सदनिकेस एकच बाल्कनी आहे व ती ते वर्षानुवर्षे वापरत आहेत व मूळ प्लॅन मध्ये बाल्कनी ही इमारतीला जोडलेली आहे. त्या संदर्भात त्यांनी आयोगापुढे काही फोटो दाखविले आहेत. असे असून सुध्दा त्यांनी अनधिकृतरित्या ती बाल्कनी जोडलेली आहे असे न्यायालयातील ॲफिडेविटमध्ये सांगितले आहे. न्यायालयामध्ये पुन्हा त्यांच्या विरुध्द बृहनमुंबई महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे कलम ३५१ प्रमाणे अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये नोटीस दिलेली असून अनधिकृत बांधकाम तोडलेले आहे. तसेच बाल्कनी ही इमारतीचा भाग नाही वगैरे असे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी ज्या ॲफिडेविट आधार घेतलेला आहे ते ॲफिडेविट L.C. suit no 5925 of 1993 अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या दाव्याच्या संदर्भातील आहे. त्या ॲफिडेविटमध्ये ज्या वस्तुस्थितीचा उल्लेख केलेला आहे त्या संदर्भामध्ये आज काहीही सांगता येणार नाही. परंतु सदरच्या इमारतीच्या संदर्भामध्ये ज्या नस्त्या उपलब्ध आहेत त्या नस्त्यामधील जी कागदपत्रे अपिलकर्ता यांना आवश्यक वाटत असतील ती कागदपत्रे त्यांनी निरिक्षण करुन घेतल्यास छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येतील. अपिलकर्ता यांना मूळ मंजूर आराखडा अपेक्षित आहे असे दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्याकडील नस्तीमधील मंजूर आराखडा व कागदपत्रे अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येतील, जी कागदपत्रे नस्तीमध्ये नाहीत तशी कागदपत्रे उपलब्ध करुन देता येणार नाहीत. त्यामुळे त्यांनी निरिक्षण करुन घेऊन कागदपत्रे उपलब्ध करुन घ्यावीत, असे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मुदतीत कळविलेले

आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करता  येणार नाही मात्र संबधित इमारतीच्या संदर्भामध्ये जो मंजूर आराखडा उपलब्ध असेल तसाच मंजूर आराखडा व इतर आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे अपिलकर्ता यांना योग्य त्या सक्षम प्रधिकरणात तक्रार करता येईल. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेले उत्तर व निर्णय हे योग्य असल्यामुळे अपिलकर्ता यांनी सदरच्या नस्तीचे निरिक्षण करुन त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती योग्य तो खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घेणे संयुक्तीक राहील.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५चे कलम २ (ञ) प्रमाणे 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली माहिती (कागदपत्रांच्या स्वरुपात) त्यामध्ये एखादे काम, कागदपत्रे ,दस्तऐवज यांचे निरिक्षण करणे व छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१. अपिल निकाली काढण्यात येते.**
**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०२-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**५) निवडनस्ती**
**६) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०१५५/अपील क्र.६३४४/०२**

**श्री. धीरज एम. वाला,**
**ए/१०३, वर्धमान नगर,**
**डॉ. आर. पी. रोड,**
**मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,'टी' विभाग कार्यालय,**
**लाला देविदयाळ मार्ग, पाच रस्ता जवळ,**
**मुलुंड (प.) मुंबई ४०००८०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ. व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,'टी' विभाग कार्यालय,**
**लाला देविदयाळ मार्ग, पाच रस्ता जवळ,**
**मुलुंड (प.) मुंबई ४०००८०. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक १८/१०/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ०२/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२६/०४/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ. व का.) टी वॉर्ड यांचेकडे त्यांचेविरुध्द मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३५१ प्रमाणे अनधिकृत बांधकामाची नोटीस दिलेली आहे, अशी माननीय न्यायालयातील निर्णयामध्ये नोंद असलेल्या नोटीसीची प्रत मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. १६/०६/२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. १४/०७/२०१० रोजी देण्यात आलेला असून अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध असली तर द्यावी, असे आदेश दिलेले आहेत. परंतु त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जो दावा दाखल केलेला आहे त्या दाव्यामध्ये त्यांच्या विरुध्द कलम ३५१ प्रमाणे अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये नोटीस दिलेली होती, असे माननीय न्यायालयाच्या निर्णयामध्ये आहे व त्यांनी कलम ३५१ च्या नोटीसची प्रत मागितलेली आहे. तसेच अपिलकर्ता यांनी स्वतःच युक्तीवाद करताना असे सांगितले की, अशा प्रकारची कोणतीही नोटीस अद्यापपर्यंत त्यांना महानगरपालिकेने दिलेली नाही, त्यामुळे ती कागदपत्रे असणे सुध्दा शक्य नाही. परंतु माननीय न्यायालयाच्या निर्णयात उल्लेख असल्यामुळे त्यांनी त्या बाबतची प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रामध्ये अपिलकर्ता यांनी कलम ३५१ प्रमाणे दिलेल्या नोटीसची प्रत नाही. व तसेच अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सुध्दा मान्य केलेले आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेले उत्तर हे योग्य आहे, असे असून सुध्दा अपिलकर्ता हे पुन्हा या प्रकरणातील गुणवत्ते संदर्भात युक्तीवाद करीत आहेत. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी प्रमाणे अर्जदार ज्या वेळेस अर्ज करतात त्या वेळेसच कागदपत्रे उपलब्ण असतील तर त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. व या प्रकरणात अपिलकर्ता हे स्वतःच कलम ३५१ प्रमाणे नोटीस त्यांना दिलेली आहे हे आयोगापुढे सांगतात. माननीय न्यायालयापुढे जी कागदपत्रे दाखल झालेली असली तरी त्या आधारे माननीय न्यायालयाने निर्णय दिलेल्य असल्यास व तो अपिलकर्ता यांना मान्य नसल्यास त्यांनी न्यायप्रक्रियेप्रमाणे वरिष्ठ न्यायालयामध्ये अपील दाखल करणे संयुक्तीक राहील, त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१. अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**
**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०२-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०४३६ /अपील क्र.६५७९/०२**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०४४०/अपील क्र.६५८०/०२**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०४३५/अपील क्र.६५८१/०२**

**श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले,**
**सिध्दिविनायक प्रसाद, डॉ. शामा प्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली (पू.), जिल्हा ठाणे ४२१ २०१. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसचिव/उपसचिव,**
**कक्ष न.वि. २६, न.वि. १४,न.वि. २५,**
**नगरविकास विभाग,**
**मंत्रालय ,मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**कक्ष अधिकारी/ अवरसचिव, ...उत्तरवादी**
**कक्ष न.वि. २६, न.वि. १४,न.वि. २५,**
**नगरविकास विभाग,**
**मंत्रालय ,मुंबई ४०० ०३२.**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक १५/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ०२/०६/२०११.**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**कक्ष न.वि. २१,२८,१०,१४,७- उपस्थित.**
**कक्ष न.वि. २४, २६ - अनुपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नगरविकास कक्ष क्र. २८ यांच्याकडे अनुक्रमे दि. १९/०८/२०१० , दि.२१/०८/२०१०, व दि. २४/०८/२०१० रोजी तीन स्वतंत्र अर्ज श्री. रामनाथ सोनावणे यांच्या संदर्भामध्ये उल्हासनगर महानगरपालिका येथे अतिरिक्त आयुक्त व नंतर आयुक्त सिडकोमध्ये प्रतिनियुक्ती वर असून तसेच जळगाव महानगरपालिका येथे प्रतिनियुक्तीवर असताना त्यांच्या विरुध्द एकूण किती तक्रार दाखल झालेल्या , तसेच कल्याण -डोंबिवली महानगरपालिका आस्थापनेवरील उपयुक्त असताना उल्हासनगर महानगरपालिका M.M.R.D.A. व जळगाव महानगरपालिका येथे प्रतिनियुक्तीवर पाठवित, उपयुक्त पदावरील

वेतनअपेक्षा , जास्त वेतन देण्यात येत असल्यास त्यांच्या या वेतन निश्चितीबाबत शासनाने त्यांच्या सामान्य प्रशासन, अर्थ विभागाचे अभिप्राय घेतले असल्यास त्यांच्या व 'ड' महानगरपालिका आयुक्त व उपायुक्त यांच्या वेतनश्रेणीची माहिती मिळावी तसेच अतिरिक्त वा प्रभारी कार्यभार म्हणून कार्यरत असताांना संबधित पदी वेतन श्रेणी निश्चितीची माहीती मिळावी, तसेच महाराष्ट्र राज्यातील एकूण महापालिकेत सद्य स्थितीत कार्यरत असलेल्या आयोगाच्या नियुक्ती व प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्थीची माहिती महापालिकानिहाय मिळावी. तसेच कल्याण डोंबिवली महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने सभा क्र. दि. ०६/०४/२०१० रोजी विषय क्र. ९ , ठराव क्र. ४, सदर ठराव शासनाने विखंडित केला किंवा कसे, तसेच जळगाव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव ५०८ अन्वये, पारित केलेले सदर ठराव शासनाने विखंडित केला किंवा कसे व सद्य स्थितीत कोणत्या आस्थापनेवरील उपायुक्त कर्मचारी आहेत, इत्यादी माहिती तसेच त्यांची नियुक्ती करताना माननीय सर्वोच न्यायालयाने उमादेवी कर्नाटक सरकार या यचिकेत दिलेल्या आदेशाची व त्यातील मुद्यांचे निकष सदर नियुक्ती करताना लागू होतात किंवा कसे, याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती संदर्भात विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. १५/११/१० रोजी एक प्रथम अपील व दि. २८/०९/१० रोजी दोन प्रथम अपील अशी एकूण तीन प्रथम अपील दाखल केलेली दिसून येतात. प्रथम अपिलांचा निणर्य दिल्यानंतर सुध्दा अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहितीआयोगाकडे तीन द्वितीय अपीले दि. १५/११/२०१० रोजी दाखल केली.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. परंतु त्यांनी लेखी जबाब व युक्तीवाद आयोगापुढे सादर केलेला आहे. त्यामध्ये श्री. रामनाथ सोनावणे हे उल्हासनर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर असताना त्यांच्या कामकाजा संबधी केलेली तक्रार/ गैरतक्रार बाबतची कागदपत्रे या कार्यासनातील अभिलेखात आढळून आलेली नाहीत. त्यामुळे सिडको व जळगाव महानगरपलिका येथील प्रतिनियुक्ती संदर्भामध्ये न.वि. १० व न.वि. १५ या कार्यासनाकडे पाठविण्यात येत आहे, असे त्यांना कळविण्यात आलेले असून सुध्दा त्या कार्यासनाला अर्ज वर्ग करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. परंतु माहिती अधिकारी यांनी तसे केले नाही. प्रथम अपिलीय अधिकरी यांनी सुध्दा योग्य तो निर्णय दिलेला आहे. तसेच कार्यासनामध्ये अर्ज प्राप्त झाला किंवा नाही , याबाबत अर्जदाराचा काहीही संबध नाही. मात्र माहिती उपलब्ध नसल्यास तो अर्ज पाच दिवसाचे आत संबधित माहिती अधिकाऱ्याकडे अर्जवर्ग करणे अपेक्षित होते. माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी न.वि. १०, न.वि.२५ यांनी आज तारखपर्यंत अर्जदाराला कोणतीही माहीती उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांनी त्यांच्या लेखी युक्तीवादात म्हटले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी श्री. रामनाथ सोनावणे यांच्या प्रतिनियुक्ती संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे. परंतु नगरविकाय विभागामध्ये प्रत्येक महानगरपालिकेच्या सदंर्भामध्ये वेगवेगळी कार्यासने आहेत. त्यामुळे आयुक्त जरी एकच असले तरी इतर महानगरपालिकेच्या किंवा संस्थेच्या संदर्भात माहिती मागितली असलयास ती त्या त्या कार्यासनाकडूनच उपलब्ध होऊ शकेल. कार्यासन २८ ने न.वि १० व न.वि. २५ कडे अर्ज हस्तांतर

केले असले तरी तसेच जावक नोंद वही मध्ये त्याची नोंद असली तरी संबधित जनमाहिती अधिकाऱ्याकडे तो अर्ज प्राप्तच झालेला नाही, असे असले तरी अपिलकर्ता यांनीच दाखल केलेल्या कागदपत्रावरुन त्यांना दि. २५/१०/२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. तसेच दि. २९/०९/१० रोजी त्यांनी उत्तरे दिलेली आहेत. अपिलकर्ता यांनी केलेल्या तक्रारी व गैरप्रकारबाबतची कागदपत्रे या कार्यासनातील अभिलेख तपासता आढळून आलेले नाहीत हे सांगण्याकरिता एवढा वेळ का घेतला, असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, मागितलली माहिती उपलब्ध आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी सुध्दा वेळ लागतोच, व तपासल्यानंतरच ती माहिती त्या कार्यासनाकडे उपलब्ध नाही म्हणून न.वि. १० व न.वि. २५ कडे पाठविण्यात येत आहे, असे त्यांनी विहीत मुदतीत कळविलेले आहे. न तपासता माहिती पाठविली असती तर अपिलकर्ता यांनी दुसऱ्या प्रकारची तक्रार केली असती. तसेच प्रत्येक कार्यासन संदर्भामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी सुध्दा स्वतंत्र असल्यामुळे व अपिलकर्ता यांनी कार्यासन २१ च्या प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे अर्ज केलेला असल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. संबधीत कार्यासनातील जवक नांदवहीतील स्वाक्षरी या कार्यासनातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची नाही. तसेच श्री. रामनाथ सोनावणे हे सिडको आस्थापनेवर कधीही प्रतिनियुक्तीने कार्यरत नव्हते. ही बाब तपासण्याकरिता सुध्दा वेळ लागतोच त्यामुळे अपिलकर्ता यांनी सुध्दा माहिती मागताना निश्चित माहिती मागणे अपेक्षित आहे.

अपिलकर्ता यांच्या दि. २४/०८/२०१० रोजीच्या अर्जाच्या संदर्भात अपिलकर्ता यांना दि. ०८/०९/२०१० रोजी मुद्देनिहाय उत्तर तसेच प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपिलाच्या संदर्भात मुद्दा क्र. ब बाबत ठराव क्र. ४ विखंडित करण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही. याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे पत्रान्वये पाठविण्यात आलेला आहे. व मुद्दा क्र. ड च्या संबधीत टिपणीची प्रत दि. ३०/०८/१० रोजीच्या अर्जासोबत त्यांना दिलेली आहे. अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, दि.०८/१०/१०, दि.१२/१०/१०, दि.१६/१०/१०, दि.२३/०९/१०, दि. ११/१०/१०, दि. ११/१०/१० रोजी उत्तरे व माहिती सुध्दा दिलेली दिसून येते. परंतु त्याबाबत जो लेखी युक्तीवाद त्यांनी आयोगापुढे सादर केलेला आहे, त्यामध्ये गुणवत्तेच्या बाबत त्यांनी युक्तीवाद केलेला दिसून येतो. त्यातही पारित केल्या ठरावाची प्रत मागवून ठराव शासनाने विखंडीत केला किंवा कसे याची माहिती देणे आवयश्क आहे, असे नमूद केलेले आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी प्रमाणे ज्या अधिकाऱ्याकडे माहिती मागितलेली त्या संदर्भामध्ये माहितीचा अधिकार या व्याख्येप्रमाणे माहिती अधिकारी किंवा सार्वजनिक प्राधिकरण नियंत्रणात असेल तर माहिती उपलब्ध करुन देता येते. दुसऱ्या कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणातून माहिती मागवून ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. तसेच अपिलकर्ता यांनी दि. २१/०८/२०१० रोजी संदर्भात दि.०८/०९/२०१० रोजी न.वि. २१, न.वि. ७ व न.वि. २५, या कार्यासनाकडून मागितलेल्या माहितीच्या संदर्भातध्ये हाताळले जात असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती परस्पर घेण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. तसेच ड महानगरपालिकेतील आयुक्त व उपायुक्त पदावरील नियुक्ती

या विभागातील न.वि.१४ कार्यासनाशी निगडीत असल्यामुळे त्यांचेकडे पाठविण्यात आलेले आहे असे दिसून येते. त्या संदर्भात सुध्दा अपिलकर्ता यांनी लेखी युक्तीवाद करताना असे म्हटले आहे की, त्यांना या संदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

आज आयोगापुढे अपिलकर्ता यांच्या तीनही अपीलांमध्ये मागितलेली माहितीच्या संदर्भात सर्व संबधित कार्यासनातील अधिकारी उपस्थित आहेत. अपिलकर्ता यांना अर्ज हस्तांतरित केला असला तरी त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असे जे त्यांचे म्हणणे आहे, त्या संदर्भात कार्यासन अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, नगरविकास विभागतील संबधित कार्यासनाकडे असलेली माहिती उपलब्ध करुन घेता येईल, जी माहिती इतर महानरपालिका किंवा एम.एम.आर.डी.ए. यांच्याकडे उपलब्ध आहे ती त्यांच्याकडूनच प्राप्त होऊ शकते, असे असल्यामुळे श्री. रामनाळा सोनावणे यांच्या संदर्भामध्ये उपस्थित असलेल्या सर्व कार्यासनांच्या अधिकाऱ्यांनी तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी एकत्रितरित्या अपिलकर्ता यांनी मागितलेल्या तीनही अर्जाच्या संदर्भात माहिती एकत्रितरित्या उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जी माहिती उपलब्ध नसेल त्याबाबतीत स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील. व त्यामुळे कार्यासन १०, कार्यासन २१, कार्यासन २५, कार्यासन २८ यांनी अपिलकर्ता यांना अर्ज दि. १९/०८/१०, दि.२४/०८/१०, दि.२१/०८/१० या अर्जामध्ये मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्या करिता तीनही प्रथम अपिलीय अधिकारी यांनी एकत्रित रित्या माहिती संकलित करुन अपिलकर्ता यांना पुरविण्याची जबाबदारी पार पाडणे संयुक्तीक राहील. अपिलकर्ता यांची तीनही अपीले अंशत: मंजूर करण्यास पात्र आहेत.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांची तीनही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून, हा निर्णय मिळाल्यापासून संअधित कार्यासनांच्या सर्व जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी एकत्रित रित्या तीनही अर्जाच्या संदर्भातमध्ये मुद्देनिहाय माहिती उपलब्ध असल्यास अपिलकर्ता यांना कागदपत्रांच्या छांयाकित प्रतींच्या स्वरुपात पुरविण्यास यावी व तशाप्रकारची माहिती उपलब्ध नसल्यास तसे त्यांना स्पष्ट कळविण्यात यावे. मात्र अनेक कार्यासनांच्या संबधात माहिती असल्यामुळे त्यास विलंब करता काता नये. तसे न केल्यास सर्व जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची नोद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०३५७/अपील क्र.६७०९/०२**

**डॉ. नरेंद्र मंगेश देशपांडे,**
**८ दिपदर्शनी स.गृ.स.**
**मामलेतदारवाडी विस्तारित मार्ग,**
**लिबर्टी गार्डन, मालाड (प.), मुंबई ४०० ०६४. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी**
**तथा पोलीस उपआयुक्त,**
**परिमंडळ १२, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक पोलीस आयुक्त,उत्तर नियंत्रण कक्ष,**
**ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पू.), मुंबई ४०० १०१. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक ८/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ०३/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. १२/०५/२०१० रोजी (दि. १०/०५/२०१० रोजी) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याकडे मालाड (प.) या पोलीस ठाण्याचे लोकसेवक अधिकारी वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. मारुती धावजी राठोड हे सुमारे तीन वर्षे कार्यरत आहेत. त्यांच्या संदर्भात मालाड (प.) पोलीस ठाण्याचा कार्यभाग स्विकारल्यापासून त्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या ( पत्नी, मुले-मुली,सुना, जावई) स्थावर व जंगम मालमत्तेत काही वाढ झाली असल्यास ती किती व कधी झाली, तसेच त्यांनी व त्यांच्या नातेवाईकांनी केलेल्या सर्व गुंतवणुकी, त्यांनी काढलेली विविध कर्जे ,शिक्षण तसेच इतर समारंभासाठी केलेला खर्च, इतर व्यवसायात केलेल्या गुंतवणूकीची संपूर्ण माहिती, त्यांनी स्विकारलेल्या भेटवस्तू संदर्भात एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरचे अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०५/०६/२०१० रोजी सहाय्यक माहिती अधिकारी व सहाय्यक पोलीस आयुक्त, गोरेगाव विभाग, मुंबई यांच्याकडून मागविण्यात आलेल्या माहिती पैकी अर्ज क्र. २ व ३ ची माहिती त्यांच्या मार्फत वरिष्ठ पोलीस निरीक्षक,

मालाड पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेली असून अर्ज क्र. १ ची माहिती नंतर सादर करण्यात आलेली येत असल्याचे कळविले आहे. प्राप्त झालेली माहिती सोबत जोडलेली आहे. परंतु, अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. ०२/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केला. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ३१/०७/२०१० रोजी देण्यात आलेला असून, शासकीय माहिती अधिकारी यांनी जी माहिती नियमाने देण्यासारखी आहे, अशी अर्जदाराने मागणी केलेली सर्व माहिती अपिलार्थी अर्जदार यांना पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. सदरचे आदेशान्वये दि. ०७/१०/२०१० रोजी शासकीय माहिती अधिकारी व सहाय्यक पोलीस आयुक्त, उत्तर नियंत्रण कक्ष, मुंबई, यांनी कार्यालय अधिक्षक कक्ष ३, पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालयातून आलेल्या पत्राची प्रत अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हे पद अत्यंत महत्त्वाचे व जबाबदारीचे असल्यामुळे त्यांच्या संदर्भात पारदर्शकता असणे आवश्यक आहे, त्यामुळेच त्याबाबतीतील माहिती त्यांनी मागितलेली होती. परंतु, त्याबाबतीत अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही, तसेच पोलीस आयुक्त कार्यालयात सुध्दा अभिलेख आढळून येत नाही, असे कळविलेले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, शासकीय अधिकारींनी मालमत्ता विवरण जरी दाखल केलले असले तरी पोलीस ठाणे किंवा उपआयुक्त यांच्या स्तरावर ती माहीती उपलब्ध नसते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कक्ष ३ पोलीस आयुक्त कार्यालय यांच्याकडे ती माहिती उपलब्ध होऊ शकेल असे प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये नमूद केलेले आहे. त्यामुळे कक्ष ३ पोलीस आयुक्त कार्यालय यांच्याकडे विवरण केलेले असून त्यांनी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अभिलेखावर काहीही आढळून आलेले नाही, असे कळविलेले आहे. याचा अर्थ श्री. राठोड यांच्या संदर्भात मालमत्ता विवरण दाखल केलेला नाही, असा निष्कर्ष काढावा लागतो. व तसेच अपिलकर्ता यांनी स्पष्ट केलेले असल्यामुळे त्यांनी स्वतंत्रपणे पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांच्याकडे मिळालेल्या माहितीच्या आधारावर तक्रार करणे संयुक्तीक राहील. जेणे करुन शासकिय अधिकाऱ्यांच्या मालमत्तेच्या संदर्भात विविरण पत्रे दाखल करण्याच्या तरतूदीची अमलबजावणी होऊ शकेल. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१. अपिल निकाली काढण्यात येते.**

**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०३२९ /अपील क्र.६७०६/०२**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०३३०/अपील क्र.६७०७/०२**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०३३१/अपील क्र.६७०८/०२**

**श्री. भरत मनसुखलाल भगत,**
**११, तपस्या, पंडीत एम.के मार्ग,**
**वझिरानाका, बोरिवली (प.)**
**मुंबई ४०० ०९१. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनबिंधक,**
**सहकारी संस्था (३) मुंबई, गृहनिर्माण भवन,**
**कक्ष क्र. ६०, तळ मजला, बांद्रा (पू.) मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा, उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, आर विभाग , मुंबई ,**
**३१६, अे/१ इमारत ३रा मजला, ट्रक टर्मिनल,**
**आर.टी.ओ जवळ, वडाळा, (पू.) मुंबई ४०० ०३७. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक ०९/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ०३/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी अपील क्रमांक ६७०६/०२ मध्ये दि. १४/०७/२०१० रोजी जन माहिती अधिकारी उपनिबंधक यांच्या कार्यालयामध्ये मधु शिवलीला अमृत को.हौ.सोसायटी मधील तपस्या इमारतीच्या संदर्भात भगवती एंटरप्रायझेसना नूतनीकरणाकरिता जी निविदा दिली होती त्या संदर्भात संस्थेच्या समितीने केलेल्या संपूर्ण कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तसेच अपिल क्र. ६७०७ मध्ये कोणत्या सभासदाने बाल्कनी ही अनधिकृतपणे हॉल पाडून घेतलेली आहे, याबद्दल माहिती मागितलेली दिसून येते. तसेच अपिल क्र. ३७०८/०२ मध्ये श्री. ए. एन देसाई , फ्लॅट नं. १९, पाण्याची देयके ,मालमत्ता कर हे व्यापारी तत्वावर व रहिवासी तत्वावर देतात किंवा नाही याबद्दलची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२/०८/२०१०, दि. ११/०८/२०१०, दि.१२/०८/२०१० रोजी मागिलेली माहिती ही संस्थास्तरावरची असल्यामुळे, ती कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून

येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. ३०/०८/२०१० रोजी तीन प्रथम अपीले दाखल केली. तीनही प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.११/१०/२०१० रोजी देण्यात आलेला असून अपिलकर्ता यांची तीनही अपिले मान्य करण्यात आलेली असून अर्जदार श्री. भरत भगत यांनी मागितलेली माहिती संस्थांकडून प्राप्त करुन उपलब्ध करावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे दि. १८/१०/२०१० रोजी उपनिबंधक , सहकारी संस्था, आर विभाग, मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (१) अन्वये संस्थेची माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश पारित केलेले दिसून येतात. परंतु त्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सागितले की, त्यांना प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण आहे व जन माहिती अधिकारी तथा उपपिबंधक हे संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देत नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सागितले की, अपिलकर्ता यांना संस्थेने दि. २९/०१/२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. वास्तविक अपिलकर्ता हे संस्थेचे सभासद असल्यामुळे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३२ प्रमाणे त्यांनी संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी. त्या संस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर उपनिबंधक कार्यालयाकडे अपील तक्रार दाखल करुन ,उपनिबंधक यांच्या विरुध्द कार्यवाही करावी. या तीनही प्रकरणात मात्र अपिलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या माध्यमातून माहिती उपलब्ध करुन देण्याचा आग्रह करीत आहेत. कोणत्याही सहकारी संस्थेला शासनाचे अनुदान मिळत नसेल तर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी लागू होत नाही, असा निर्णय माननीय उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र. ५६६६,२००७ मध्ये पंजाबराव नागरिक सहकारी बॅंक अमरावती संदर्भात दिलेला आहे. माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यानी सुध्दा उपनिबंधक यांना जी माहिती अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे सहकारी संस्थेने सादर करणे बंधनकारक असते तीच माहिती उपलब्ध करुन देता येते. त्यामुळे Balance sheet आणि P/L acc. च्या शिवाय कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही याबद्दल त्या संदर्भात याचिका क्र. १८७/२००८ मध्ये अंतरित आदेश दि. ०७/०३/२००९ रोजी देऊन स्थगिती दिलेली आहे. तसेच सदरच्या निर्णयात ज्या सहकारी संस्थांना या शासकिय अनुदान मिळत नाही त्या सहकारी संस्था या अधिनियमाचे कलम २ मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत नाहीत असा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे सदर सहकारी संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. मात्र सहकारी संस्थेच्या सभासद अर्जदारास माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (१) प्रमाणे आदेश पारित केलेले आहेत. त्याप्रमाणे दि. २९/०१/२०११ रोजी संस्थेने त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी तथा सहकारी संस्थेने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे मुदतीत प्रक्रिया केलेली आहे. त्यामुळे सदरची तीनही अपीले निकाली काढण्यास पात्र आहेत.

अपिलकर्ता यांना अपूर्ण माहिती प्राप्त झालेली असल्यास त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमांच्या तरतूदीनुसार उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे तक्रार किंवा अपील दाखल करुन माहिती उपलब्ध करुन घेणे योग्य राहील.

**---आदेश---**

**१. अपिलकर्ता यांची तीनही अपीले निकाली काढण्यात येतात.**
**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०३६५/अपील क्र.६७१०/०२**

**श्री. रंजित जे. सिंग,**
**फ्लॅट नं. ९, किग्जवे बेस्ट ऑफिसर्स वसाहत,**
**जेम जमशेद रोड, दादर (पू.),**
**मुंबई ४०००१४. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी,**
**बी. इ. एस.टी, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग,**
**पोस्ट बॉक्स नं. १९२, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपमुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी,**
**बी. इ. एस.टी, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग,**
**पोस्ट बॉक्स नं. १९२, मुंबई ४०० ००१. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक १०/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ०३/०६/२०११.**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. १०/११/१० रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरचे द्वितीय अपील हे त्यांच्या दि. ०६/०७/१० रोजीच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात आहे. अपिलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये जी माहिती मागितलेली होती त्या माहितीच्या संदर्भात त्यांचे द्वितीय अपील क्र. ५९९७/२०१०, ५९९८/२०१० आहेत. या द्वितीय अपीलामध्ये दि. ११/११/१० रोजी राज्य माहिती आयोगाने निर्णय दिलेला असून दोन्ही अपीले फेटाळण्यात आलेली आहेत. व त्यामुळे सदरच्या अपील संदर्भात पुन्हा निर्णय देणे शक्य होणार नाही, असे जन माहिती अधिकारीनी आयोगाच्या निदर्शनास आणले .

अपिलकर्ता गैरहजर आहेत, तसेच पूर्वीच्या दोन अपीलाच्या संदर्भात त्यांना माहिती मिळालेली आहे हे सुध्दा त्यांनी मान्य केलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०२-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१. निवडनस्ती**
**२. स्वीय सहाय्यक**

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०३८४/अपील क्र.६७१२/०२

श्रीमती. इंदिरा जा. गाला,
मनसुख भिखा पटेल चाळ, संत तुकाराम मार्ग,
काजुपाडा, बोरिवली (पू.), मुंबई ४०० ०६६. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मनपा आयुक्तांचे स्वीय सरचिटणीस,
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
खोली क्र. ४६, १ मजला जुनी इमारत,
महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक,
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
खोली क्र. ४६, १ मजला जुनी इमारत,
महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय कार्यकारी अभियंता,
आर-मध्य, पालिका मंडई इमारत,
स्वामी विवेकानंद मार्ग,
रेल्वे स्टेशनजवळ, बोरिवली (प.),
मुंबई ४०० ०९२.

४. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.),
आर-मध्य, पालिका मंडई इमारत,
स्वामी विवेकानंद मार्ग,
रेल्वे स्टेशनजवळ, बोरिवली (प.),
मुंबई ४०० ०९२. ...उत्तरवादी

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक १५/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ०३/०६/२०११.**
**अपिलकर्ता (प्रतिनिधी) - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अलिपकर्ता यांनी दि. ०२/०८/२०१० रोजी जन माहिती अधिकारी कार्यालय अधिक्षक मनपा आयुक्तांचे कार्यालय, जुनी इमारत, खोली नं. ४६ यांच्याकडे दि. ०४/०२/२०१० व दि. १५/०४/१० रोजी अनधिकृत बांधकामाबद्दल केलेल्या तक्रारीच्या संदर्भात काय कार्यवाही केली अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरचा अर्ज महापालिका आयुक्तांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक (आयुक्त) यांनी त्यांच्या दि. ०९/०८/२०१० च्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त, आर/मध्य यांच्याकडे अग्रेषित करण्यात आला होता. सदरच्या अर्जाच्या अनुषगांने उत्तरवादी क्र. ४ककडून अपिलकर्ता यांनी दि. ३१/०८/१० रोजी खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले होते. त्यानंतर अपिलकर्ता यांना दि. १५/१०/१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी तत्पूर्वीच दि. १८/०९/१० रोजी उत्तरवादी १ यांना संबोधून प्रथम अपील दाखल केले. अपिलाचा थेट संबध सहाय्यक आयुक्त (आर/मध्य) विभागाशी असल्याने दि. ०१/१०/२०१० रोजी ते त्या कार्यालयाच्या अपिलीय अधिकाऱ्यांकडे हस्तांतर केले व तसे अपिलार्थीस कळविले, असे कळवूनही अपिलार्थीने उत्तरवादी क्र. ३ यांच्याकडे नव्याने दि. १९/११/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसते. प्रथम अपिलाचा निर्णय दि. १४/१२/१० रोजी दिलेला असून झालेल्या कार्यवाहीबाबत सद्यस्थिती व सादर केलेल्या कागदपत्राबाबत अवगत करावे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे रु. ३२/- खर्चाचा भरणा करुन दि. २२/०२/११ रोजी कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती सादर करण्यात आली परंतु तत्पूर्वीच अपिलकर्ता यांनी दि. १५/११/१० रोजी द्वितीय अपील दाखल केलेले होते.

अपिलार्थी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांच्या अर्जावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही व त्याबाबतची माहितीसुध्दा देण्यात आलेली नाही. परंतु, वर नमूद केल्याप्रमाणे व कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अर्जाच्या संदर्भात कारवाई केलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर खर्चाचा भरणा करुन माहिती दिलेला आहे. माहिती उपलब्ध होऊन सुध्दा अपिलकर्ता कारवाई होत नाही अशा प्रकारचा युक्तीवाद आयोगापुढे करतात. परंतु, त्यांच्या तक्रारीप्रमाणे झ ालेल्या कारवाईची माहिती दिलेली असल्यामुळे, पुढील कारवाई संदर्भात कोणत्याही प्रकारचा आदेश काढता येणार नाही. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०३-०६-२०११
मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती
२) स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०३७८ /अपील क्र. ६७११/०२.**

**श्री. सुदीन रमेश प्रधान,**
**बिल्डिंग नं. ३४/१२३६,सुभाषनगर,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इ. प्र.)**
**इमारत प्रस्ताव पूर्व उपनगरे, राज लेगसी जवळ,**
**पेपर मिल, कंपाऊंड, लाल बहादूर शास्त्री मार्ग,**
**विक्रोळी, मुंबई ४०० ०८३.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. प्र.),**
**इमारत प्रस्ताव पूर्व उपनगरे,राज लेगसी जवळ,**
**पेपर मिल, कंपाऊंड, लाल बहादूर शास्त्री मार्ग,**
**विक्रोळी, मुंबई ४०० ०८३.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक ११/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ०३/०६/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी (प्रतिनिधी) -उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१६/०६/१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे सुभाषनगर लेआउटच्या पुर्नविकास कामावर लक्ष ठेवण्यासाठी आतापर्यंत १, ६,१३,१४,१५,२२,३० या इमारतीमध्ये जे अतिरिक्त बांधकाम झाले, त्याबद्दल दिलेले रिपोर्ट व नगर नियोजन विभागाच्या सेक्शन ४५ नुसार बजावलेल्या नोटीसा, तसेच रहिवासांच्या परवानगीच्या संदर्भात व कमेन्समेंटच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषांगाने अपिलकर्ता यांनी दि. ०३/०७/१० रोजी खर्चाचा भरणा करावा, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दि. २८/०७/१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. २७/०८/१० रोजी दिलेला दिसून येतो. परंतु त्या अधिच अपिलकर्त्यास निरिक्षणानंतर अपेक्षित कागदपत्राची फी रुपये ८४६/- भरण्याविषयी कळविले, त्याप्रमाणे अर्जदाराने दि. २८/०७/१० रोजी फी चा भरणा म.न.पा. मध्ये करुन दि. ०७/०८/१० रोजी कागदपत्रांच्या प्रती प्राप्त झाल्याची पोच दिली व अपिलकर्त्यास प्रथम अपील करण्यापूर्वीच

अपेक्षित माहिती देण्यात आलेली होती. तरी सुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपिलामध्ये अर्जदाराने २४३ पृष्ठांकरिता प्रति पृष्ठ रुपये २/- आकारले असून छायांकित प्रतीचा खर्च सुध्दा अर्जदाराने केला असे निदर्शनास आले. सदर छायांकित प्रतीच्या खर्चाचा परतावा करणे आवश्यक आहे व त्याकरिता अपिलकर्त्यांना २४३ पृष्ठांच्या छायांकित प्रतीसाठी आलेले बील जन माहिती अधिकारी यांच्याकडे १५ दिवसाचे आत सादर करावे. तद्नंतर त्याचा परतावा १० दिवसाचे आत करावा, असे आदेश दिलेले दिसून येतात. त्या करिता अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये माहिती उपलब्ध करून घेण्यासाठीचा खर्च, चलनाद्वारे भरलेला असला तरी प्रत्यक्ष छायांकित प्रती काढण्याचा खर्च सुध्दा त्यांच्याकडून घेण्यात आलेला होता. म्हणजे एकाच प्रतीसाठी त्यांना दुप्पट खर्च करावा लागलेला आहे. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी चलनाद्वारे भरलेल्या खर्चाचा परतावा मिळावा असा आदेश केलेला असून सुध्दा अद्यापपर्यंत त्यांना खर्चाचा परतावा मिळालेला नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे RTI च्या बिलाची छायांकित प्रत व अर्ज दि. २६/०८/२०१० रोजी दिला. मात्र आज नऊ महिने झाले तरीही इमारत व प्रस्ताव व पुर्न उपनगरे यांच्याकडून कोणताही चेक आला नाही. तो परतावा त्यांना मिळावा. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि. २३/०६/१० रोजी केलेल्या अर्जाच्या संदर्भात आकारणी केलेला व चलनाद्वारे भरलेला खर्चाचा परतावा देण्यात येईल, त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१. अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आत अपिलकर्ता यांना पृष्ठ २४३ करिता जो खर्चाचा भरणा केला आहे, तो प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे परत करण्यात यावा.**

**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निणर्याची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:रामाआ/नोंदणी क्र./४८७७४/अपील क्र.६०७४/०२**

**श्री. संजय सिंह,**
**सिंह हाऊस, राम मंदीर च्या मागे,**
**मालवणी चर्च,कैलाश कुंज बंगल्याच्या बाजूला,**
**मलाड (प.), मुंबई ४०० ०९५.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-प्रमुख अभियंता (इ.प्र.) (प.उ.) II,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, उप-प्रमुख अभियंता (इ.प्र.) (प.उ.),**
**महानगरपालिका इमारत सी. विंग, संस्कृत काम्प्लेक्स ,**
**९० फुट डी.पी.रोड, सेंट लॉरेन्स शाळेजवळ,**
**कांदिवली (पू.),मुंबई ४०० १०१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इ.प्र.) (प.उ.) पी वॉर्ड,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, उप-प्रमुख अभियंता (इ.प्र.) (प.उ.),**
**महानगरपालिका इमारत सी. विंग, संस्कृत काम्प्लेक्स ,**
**९० फुट डी.पी.रोड, सेंट लॉरेन्स शाळेजवळ,**
**कांदिवली (पू.),मुंबई ४०० १०१.**

**M/S . Ivory Prpoperties And Hotels Pvt. Ltd.**
**Plot No. C 30, Block G, Opp. SIDBI,**
**Bandra Kurla Complex,**
**Bandra (E), Mumbai 400 051.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक २४/०६/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ०४/०५/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी -उपस्थित.**
**M/S . Ivory Prpoperties And Hotels चे प्रतिनिधी -उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी -अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. १८/०१/१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी (w.s.)- II इमारत व प्रस्ताव कांदीवली (पू.) यांचेकडे Information related to buld. No.1406 A/18 , of village Malad (S.) Raheja Metroplex Link road,Malad (w.), Mumbai 400 064. Architect श्री. बिहारीलुंड File no.CE/7173/BP (WS) /AP. Dated 20/12/1999 owner messers Ivory properties and Hotels Pvt. .Ltd. च्या संदर्भामध्ये नमूद आणि सुधारित इमारतीचा आराखडा, तसेच व IOD व Complition Certificate, ही माहिती पोस्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि. २४/०२/१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. ०४/०६/१० रोजी देण्यात आला असून, अपील अंशत: मंजूर करण्यात आले असून, त्रयस्त पक्षाची माहिती मागितलेली असेल तर त्या त्रयस्थ पक्षाकडून नवीन हरकती मागवून घ्याव्यात आणि प्रत्येक वेळेस त्रयस्थ पक्षास विचारणा करण्यात यावी. तसेच त्रयस्थ पक्षाच्या सदंर्भात त्यांचे म्हणणे दाखल झ ााल्यावर विधी विभागाकडे सदरची माहिती सादर करावी आणि त्यानंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी. परंतु त्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाक डे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना सुरुवातीला त्यांच्या दि. १६/०३/२००९ च्या अर्जाप्रमाणे मुदतीत मागितलेली माहिती दि. ०९/०४/०९ च्या उत्तराप्रमाणे खर्चाचा भराणा करुन उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले होते. म्हणजे त्यावेळेस जन माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार होते. परंतु त्यानंतर माहिती मिळाली नाही म्हणून पुन्हा दि.१८/०१/१० रोजी अर्ज केला. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने मात्र Developers Ivory Properties and Hotels Pvt. Ltd. यांचे कडून दि. ०८/०२/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी हरकत घेण्यात आली व त्यामध्ये अपिलकर्ता हे मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये सदरच्या माहितीचा वापर करतील या कारणास्तव ती सार्वजनिक क्षेत्रात येत नाही म्हणून नाकारण्यात आली होती. त्याबद्दलचा कोणताही कारणमिमांसा असणारा निर्णय हा जन माहिती अधिकारी यांनी दिलेला नाही. तसेच अधिनियमाचे कलम ६ (१) प्रमाणे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्रयस्थ पक्षाशी संबधित माहिती हवी असेल तर अधिनियमाचे कलम ११ (१) प्रमाणे त्रयस्थ पक्षाबद्दल विचारणा करताना अपिलकर्ता यांना कळविणे आवश्यक होते, तसेही त्यांनी कळविले नाही. व कलम ११ प्रमाणे त्रयस्थ पक्षास नोटीस काढलेली असल्याचेही दिसून येत नाही. त्रयस्थ पक्षाने हरकत घेल्यास त्यावर नियमाप्रमाणे प्रथम अपील किंवा द्वितीय अपील सादर करता येते. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी असा कोणताही निर्णय घेतलेला नाही व त्रयस्थ पक्षाचे काय म्हणणे आहे, हे सुध्दा अर्जदार यांना स्पष्टपणे कळविलेले नाही. कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन घेऊन त्या माहितीचा उपयोग माननीय उच्च न्यायालयात दावा दाखल करणे किंवा दाखल असलेल्या दाव्यात ती माहिती दाखल करण्यासाठी सादर केली तर त्यास माहितीचा गैरवापर करणे असे म्हणता येत नाही. व नेमकी हीच बाब जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे आकलन करुन न घेता अर्जदार अपिलकर्ता यांना कळविलेले आहे, त्यामुळे अपिलकर्ता यांनी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय यांनी याही पुढे जाऊन माहिती काय मागितलेली आहे, याबद्दल कोणत्याही प्रकारे विचार किंवा आकलन करुन न घेता प्रत्येक मालमत्ता धारकास त्रयस्त पक्ष म्हणून विचारणा करण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय देण्यात आलेला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व मालमत्ताधारक किंवा विकासक हे संगमताने महानगरपालिकेत काम करत आहेत, असे दिसून येते. Ivory Properties and Hotels Pvt. .Ltd. यांनी जी हरकत घेतलेली आहे ती हरकत ही अधिनियमाच्या तरतूदींप्रमाणे वैध नाही, त्यांनी संपूर्ण संकूलाची माहिती मागितलेली नाही तर १८ इमारतींपैकी एका इमारतीच्या संदर्भामध्ये IOD, सुधारित आराखडा, Complition Certificate मागितलेले आहे. न्यायालयात जी केस आहे ती Raheja and vadiya Trust यांच्या मध्ये संपूर्ण संकुलाच्या संदर्भात आहे. त्यामुळे अर्जदार सदरच्या माहितीचा न्यायालयात गैरवापर करेल हे म्हणणे गैरलागू आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाच्या सदंर्भात आहे. त्यामुळे Ivory properties and Hotels Pvt. .Ltd. यांनी दि. ०८/०२/२०१० रोजी हरकत घेतलेली आहे. त्यामध्ये महानगरपालिकेकडील दि. ३०/०१/२०१० रोजीच्या पत्राचा उल्लेख आहे. व मागितलेली माहिती सार्वजनिक हिताच्या दृष्टीने योग्य नाही त्यांचे अपील सुध्दा निकाली काढण्यात आले होते. व त्यामुळे सदरचा नवीन अर्ज हा त्याप्रमाणे निकाली काढण्यात यावा. Mr. Nusali N. Wadia, Administator of estate of E.F. Dinshaw and us, in respect of the land bearing Survey No. ५०४ (pt) (including the property in respect of which the information is sought by the present Applicant); and Suit No. ४१४ of २००८ is pending in the Hon'ble High Court of Bombay. आणि त्यामुळेच सदरच्या माहितीचा गैरवापर केला जाईल अशी त्यांनी हरकत घेतलेली आहे. तसेच व्यापक जनहित नसल्यामुळे सदरची माहिती देण्यातम येऊ नये अशी हरकत घेतलेली आहे. व त्यामुळेच अपिलकर्ता यांना दि.१०/०२/१० रोजी त्याप्रमाणे कळविण्यात आलेले दिसून येते. त्रयस्थ पक्ष म्हणून Ivory Properties and Hotels Pvt. .Ltd. हे हजर होते व त्यांचे वकील सुध्दा हजर आहेत त्यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, ज्या माहितीच्या संदर्भात माहिती मागितलेली आहे ती मालमत्ता ही, Toyota Lakozy Auto Pvt.Ltd. आणि Mindspace Project situated in C-२ Zone (Central Business District) Mindspace is one of the largest commercial hubs in the subrbus, withinfrastructure conforming to global standard hidg density of working population. असे असल्यामुळे त्या ठिकाणी Anti Terrorist Squad सुध्दा येऊन गेलेले आहे. व अशाप्रकारची माहिती उपलब्ध करुन दिल्यास अतिरेकी हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेक सदरचही माहिती उपलब्ध करुन देणे योग्य नाही त्याकरिता त्यांनी कलम ८(१) (G)(D) चा आधार घेऊन माहिती उपलब्ध करुन देऊ नये असा युक्तीवाद केला. त्रयस्थ पक्षाच्या वकिलांनी देखील युक्तीवाद सादर केला आहे त्यामध्ये सदरचे आराखडे फक्त टोयाटा करिता तयार करण्यात आलेले आहेत व ते वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हतेचा तसेच व्यवसायिक गुपिते यांच्या दृष्टीने प्रकट केल्यास त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानांना हानी पोहोचेल, तसेच त्यांनी युक्तीवाद करताना असे म्हटले की, कॉपी राईटच्या संबधी तरतूदी सुध्दा नसतील, कॉपी राईट ॲक्टीव्हीटीच्या वस्तुस्थीतीचे केलेले आराखडे हे Artistic

Work म्हणून सुध्दा त्यांl संरक्षण दिलेले असे त्यांनी सांगितले व त्यामुळै त्यासंदर्भाततत्यांची हरकत आहे.

असे असलेतरी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे त्रयस्थ पक्षाच्या म्हणण्यानुसार कारणमिमांसा देणारे निर्णय पारित केलेले नाहीत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तर कोणत्याही मालमत्तेच्या सदंर्भामध्ये माहिती मागितल्यास त्रयस्थ पक्ष म्हणून प्रक्रिया करावी असेच आदेशात म्हटले आहे परंतु अपिलकर्ता यांनी एकूण १८ इमारतीच्या संकुलापैकी पैकी एकच इमरतीच्या संदर्भामध्ये IOD, सुधारित व मंजूर आराखडा, Complition Certificate ची प्रत मागितली आहे. जन माहिती अधिकरी हे सहय्यक अभियंता तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हे कार्यकारी अभियंता आहेत. व त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कोणत्याही इमारतीच्या बांधकामास परवानगी घ्यावी लागते व त्याकरिता वास्तुशास्त्रज्ञाना आराखडा दाखल करावा लागतो. ही प्रक्रिया विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे व महाराष्ट्र नगररचना अधिनियमाप्रमाणे प्रक्रिया करावी लागते. इमारतीला परवानगी देताना IOD, बांधकामाच्या शर्थी दिल्या जातात. त्याचप्रमाणे सुधारित आराखडा मंजूर करावा लागतो व इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर Complition Certificat दिले जाते. व योग्य रित्या विकास होण्यासाठी ही प्रक्रिया करणे आवश्यक आहे व तशी प्रक्रिया पूर्ण न केल्यास त्यास अनधिकृत बांधकाम समजून ना मंजूर करण्याची तरतूद आहे व त्यामुळे शहराच्या नियोजित विकासाकरिता जे नियम तयार केलेले आहेत व त्या नियमंाप्रमाणे जो विकास व बांधकाम होत असेल ते सार्वजनिक क्षेत्रात येते व त्यामुळे एखाद्या इमारतीच्या संदर्भात IOD, सुधारित व मंजूर आराखडा Complition Certificat हे एखाद्या विकासकाची किवा मालमत्ता धारकाची वैयक्तीक माहिती आहे असे म्हणता येणार नाही व याबाबत जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तारतम्याने निर्णय देणे आवश्यक आहे. अन्यथा कोणत्याही बांधकामासंदर्भातील IOD, सुधारित व मंजूर आराखडा, Complition Certificat हे त्रयस्थ पक्षाची माहिती म्हणून सार्वजनिक क्षेत्रामध्ये येऊ शकणार नाही व कोणत्याही शहराच्या विकासाच्या संदर्भात त्यामध्ये पारदर्शकता तसेच जबाबदारी ही येऊ शकणार नाही व ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीना छेद देणारी असल्यामुळे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे विकासकाशी हातमिळवणी करुन देण्यात आलेला आहे असा निष्कर्ष काढता येईल व त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकरी तसेच जन माहिती अधिकारी यांचा निर्णय हा रद्द करण्यास पात्र आहे. कोणत्याही इमारतीचे बांधकाम संदर्भातील IOD, सुधारित व मंजूर आराखडा, Complition Certificate हे सार्वजनिक क्षेत्रात येतात ही माहिती कोणत्याही विकासकाच्या किंवा मालमत्ता धारकाच्या वैयक्तिक माहितीशी संबधित नाही. त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**--- आदेश ---**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत अपिलकर्ता यांच्या दि. १८/०१/२०१०**

रोजीच्या अर्जानुसार मागितलेली माहिती विनामूल्य रजिस्टर उपलब्ध पोस्टान उपलब्ध करुन द्यावी, व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०४-०५-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती
२) स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०४२७ /अपील क्र. ६७१९/०२.**

**श्री. हरदेव सिंग बी. रास कोहली,**
**२रा मजला, फ्लॅट नं. ७ अमृत भवन,**
**६५ डी, व्ही. पी. रोड, सांताक्रुझ (प.)**
**मुंबई ४०० ०५४.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच वेस्ट वार्ड,तळमजला,**
**सेंट मार्टिस रोड , बांद्रा (प.), मुंबई ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरिक्षक (लायसन्स),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच वेस्ट वार्ड,तळमजला,**
**सेंट मार्टिस रोड , बांद्रा (प.), मुंबई ४०० ०५०.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक १८/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ०६/०६/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. १४/०६/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरिक्षक अनुज्ञप्ती बांद्रा प. यांचे कडे, Issued licences u/r glow sign board permit/ sign board & bill boardd from March 1995 to April 2010 in whole Property Amrit Bhanvan, 65-D,V.P. Road Santacruz (west) Mumbai 400 054. च्या संदर्भात एकूण A ते H या मुद्यांमध्ये तपशीलात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. १९/०७/२०१० रोजी "I have to inform u that no permission is granted to glowsign board at Amrit Bhavan" असे अपिलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु त्यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि. ०९/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. ३०/०८/२०१० रोजी देण्यात आलेला असून, " P.I.O /Sr. Inspector (Licences) is hereby directed to take joint inspection with the appellent and take appropriate action as per procedure also give revised reply to the appelent" अशा प्रकारे निर्णय दिलेला होता. त्यानंतर दि. ०४/०६/२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना एकत्रित निरिक्षण केलेल्या संदर्भात वरिष्ठ निरिक्षक (अनुज्ञप्ती)

यांनी मेसर्स ओसिम यांना परवानगी दिलेली आहे. तसेच निरिक्षण करते वेळेस Illumination garage board वर दिसून आले नाही. तसे दिसून आल्यास म्युन्सिपल कॉर्पोरेशन ॲक्ट १८८८ च्या कलम ३२८ (A) प्रमाणे त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दि. २९/०३/२००९ रोजी तक्रार केलेली होती. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने ओटयावरती कोणत्याही प्रकारचे बोर्ड नाही असे त्यांनी कळविले होते. दि. १८/०६/२००९ रोजी सुध्दा त्यांना उत्तर दिलेले होते, त्याप्रमाणे कारवाई झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी माहितीचा अर्ज ज्या वेळेस आला त्या वेळेस परवानगी देण्याच्या संदर्भात जी माहिती कार्यालयात उपलब्ध होती ती माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती एकत्रित निरिक्षण करुन सर्वच Sign Board संदर्भात परवानगी दिलेली आहे व नियमित केलेले आहे. अपिलकर्ता यांना जी कारवाई अपेक्षित होती ती झालेली असल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०६-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**निवडनस्ती**
**स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०४२९ /अपील क्र. ६७२०/०२.**

**श्री. भरत विरचंदजी गुर्जर,**
**७, गझदर स्ट्रीट, श्री जी भवन,**
**जे.एस.एस. रोड, मुंबई- ४०० ००२ ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य अभियंता(परिमंडळ-२),**
**मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ,**
**रजनी महाल, ८९/९५, ताडदेव रोड,**
**मुंबई- ४०० ०३४**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (विभाग डी १),**
**मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ,**
**रजनी महाल, ८९/९५, ताडदेव रोड,**
**मुंबई- ४०० ०३४ ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक -निरंक.**
**नोंदणी दिनांक ०१/१२/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ०६/०६/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. २७/०५/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता Repair Board यांच्या कार्यालयातील माहिती अधिकारी यांना ८ जुन्या इमारतींची नावे देऊन त्यांचा प्लॅन, त्यानंतर भाडेकरूंची यादी प्रमाणित करून आणि पुर्नविकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र दिले असल्यास, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२/०६/२०१० रोजी अर्जदारास माहिती घेण्यासाठी बोलावून त्यांच्या अर्जामधील अनु. क्र. १, ५, ६, ७ वरील इमारतींची माहिती पुरविण्यात आली. परंतु

अपिलकर्ता यांनी दि. ११/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. १९/११/२०१० रोजी देण्यात आलेला असून उर्वरित अनु. क्र. २,३,४ वरील इमारतींची माहिती पुढील ७ दिवसांच्या आत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती कार्यालयात उपलब्ध आहे. परंतु अपिलकर्ता ती माहिती घेण्याकरिता कार्यालयात आले नाहीत. तसेही कार्यालयीन विभागणीच्या आदेशानुसार सदर माहिती ही कार्यकारी अभियंता, डी-३ विभाग यांचे कार्यकक्षेत येत असल्यामुळे अपिलकर्ता यांना त्यांच्याकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करून घेता येईल. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती व्यक्तीशः घेऊन जाणार असे नमूद केलेले असल्याने त्यांना ती पाठविण्यात आली नाही. यावरून अपिलकर्ता यांना माहिती विनामूल्य उपलब्ध करून देण्यास जन माहिती अधिकारी हे तयार आहेत. त्यामुळे अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करून घेणे संयुक्तिक राहील. अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०६-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०४२३ /अपील क्र. ६७१४/०२.**

**श्री. सय्यद सईद अमिनुद्दीन,**
**बी/२३, आनंद अपार्टमेंट, टी. पी.-६,**
**सबवे-५, सांताक्रुझ(प.), मुंबई- ४०० ०५३** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी,**
**सहाय्यक आयुक्त(मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत, दुसरा मजला,**
**पलटन रोड, मुंबई- ४०० ००१**

**जन माहिती अधिकारी,**
**सहाय्यक आयुक्त(मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत, दुसरा मजला,**
**पलटन रोड, मुंबई- ४०० ००१** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक -१८/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ०६/०६/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी यांच्या**
**वतीने कार्यालय अधिक्षक - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ०९/०८/२०१० रोजी ( दि.१०/०८/२०१० रोजी.) सीताराम इमारती संदर्भात लीझ रेंट भरण्यासंदर्भात दि. ०१/०१/१९८६ ते दि. ३१/०७/२०१० पर्यंतची माहिती मागितलेली आहे ती खालीलप्रमाणे,

१) Provide me with detail statements of payment received by you.Copies duly certified by your office.
२) Provide me with copies of receipt of payments received duly certified by your office.
३) Provide me with detailed year wise mode of payment (Cash/Cheque/Bankers Cheque) duly certified by your office.

वरील माहिती ही व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि. २९/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. निरंक रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व त्यामध्ये दहा दिवसाचे आत अपिलकर्ता यांना Document of payment received as per old policy देण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही, म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सागितले की, त्यांना जी माहिती त्यानी जी माहिती मागितलेली, त्यासदंर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही किंवा माहितीच्या संदर्भातसुध्दा काहीही उपलब्ध करुन दिलेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि. ०९/०९/२०१० रोजी रुपये ७५/- चा भरणा करावा असे पत्र दिलेले होते. परंतु अपिलकर्ता यांना अशा प्रकारचे पत्र मिळाल्यानंतर माहिती मिळविण्यासाठी व रु ७५/- भरण्यासाठी ६ वेळा खेपा मारुनही त्यांना इकडून तिकडे फिरावे लागले असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु तरीही ते कार्यालयात गेले व प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस त्यांना ४ पृष्ठे दाखवण्यात आली व परंतु तश्याप्रकारची कोणतीही माहिती त्यांनी मागितलेली नसल्यामुळे त्यांनी रुपये ७५/- भरले नाहीत व ती माहिती घेतली नाही. अपिलकर्ता यांना अर्जात मागितलेल्याप्रमाणे कागदपत्रांच्या स्वरुपात त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. यावर जन माहिती अधिकरी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांचे आदेशानुसार जुन्या धोरणानुसार प्राप्त झालेली अधिदानाची कागदपत्रे घेण्याकरिता अर्जदारास कळविलेले होते. तथापि अर्जदाराने ही कागदपत्रे स्वीकारण्यास नकार दिला. अर्जदार श्री. सय्यद सईद अमिनुद्दीन यांना उपरोक्त विषयावरील कागदपत्रांच्या तपासणीकरिता कळविलेले होते. त्यानुसार अर्जदार यांनी कार्यालयात येऊन सदर कागदपत्रांची तपासणी दि. २६/०४/२०१० रोजी व दि. २७/०४/२०१० रोजी केलेली आहे. तपासणी झाल्यानंतर अर्जदाराने आराखडे वगळून इतर कागदपत्रांची मागणी केली. त्यानुसार अर्जदार यांना कार्यालयातील दि.०९/०५/२०११ च्या पत्राद्वारे रुपये ३५३२/- भरुन कागदपत्रे घेऊन जाण्यास कळविलेले होते. तथापि अर्जदाराने त्यानंतर कार्यालयाशी संपर्क साधलेला नाही असे आयोगापुढे लेखी व तोंडी सांगितले. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ३० दिवसात कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांच्या अर्जात मागितलेली माहिती ही विनामूल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे संपूर्ण कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यांनी जे पत्र दि. ०९/०९/१० रोजी दिले ते शेवटच्या दिवशी दिलेले आहे. अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे अर्जदाराने माहिती मागितल्यावर ती कलम ७ (१) प्रमाणे ३० दिवसाच्या आत उपलब्ध करु देणे बंधनकारक आहे. ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देताना जी संपूर्ण प्रक्रिया करावयाची आहे ती ३० दिवसात करणे आवश्यक आहे. तीसाव्या दिवशी खर्चाचा भरणा करण्याचे पत्र पाठवून अपिलकर्ता यांना खर्चाचा भरणा करण्यास कोणताही दिवस शिल्लक ठेवला नसल्यामुळे सदरची

माहिती ही विनामूल्य उपलब्ध करुन देणे अशी तरतूद अधिनियमाच्या कलम ७ मध्ये आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतूदीचे पालन केलेले नाही. अर्जदारास जी माहिती ज्या स्वरुपात हवी असते त्याच प्रकारे ती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. अर्जदारास सुरुवातीस कागदपत्रांच्या किती प्रती आहेत व प्रतिपृष्ठ रुपये २/- (विशेष कागदपत्रे वगळून) प्रमाणे करावा लागणारा खर्चाचा भरणा कळविणे आवश्यक असते. जेणेकरुन अपिलकर्ता यांना खर्चाचा भरणा करण्यासाठी वेळ मिळाला पाहीजे व त्यांनतर माहिती उपलब्ध करुन देण्यास सुध्दा ३० दिवसांतील कालावधी शिल्लक असला पाहिजे. तसेही खर्चाचा भरणा करण्याचे पत्र दिल्यापासून खर्चाचा भरणा करेपर्यंतचा कालावधी तीस दिवस वगळून मिळतो. परंतु तीसाव्या दिवशी पत्र पाठविल्यानुसार पुढे कोणताही दिवस शिल्लक नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी केलेली प्रक्रिया ही अनियमित आहे व त्यामुळे एकत्रित निरिक्षण करुन जी कागदपत्रे अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावयाची होती ती कागदपत्रे सुध्दा त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. याबद्दलचा सुध्दा कोणताही पत्रव्यवहार जन माहिती अधिकरी यांनी आयोगापुढे सादर केलेला नाही. आयोगाची नोटीस ही स्पष्ट आहे. परंतु त्या नोटीसीचे वाचनकेले असता आयोगासमोर जाताना कोणत्या प्रकारची कागदपत्रे घेऊन जावीत कळून येते, परंतु कोणत्याही प्रकारचे वाचन करावयाचे नाही अशी कार्यपध्दती असल्यामुळे, वाचन न करता आयोगापुढे हजर होतात व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना प्रशासकिय समज देणे आवश्यक आहे. अपिलकर्ता यांचे अपील हे अशंत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**--- आदेश ---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि. १०/०८/१० रोजीच्या अर्जानुसार मागितलेल्या माहितीची कागदपत्रे विनामूल्य व्यक्तीश: उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरता अपिलकर्ता यांना कामकाजाच्या दिवसाची वेळ व तारीख जन माहिती अधिकारी यांनी कळवावी. तसेच छायांकित प्रती माहितीच्या अधिकारात दिली असे प्रमाणित करुन द्यावे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०६-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०४२२/अपील क्र. ६७१३/०२.**

**श्रीमती. सरिना अस्मेरेल्डा लोपेझ,**
**३०२, वाहेदना अपार्टमेंट, ७५ हिल रोड,**
**बांद्रा (प.), मुंबई ४०० ०५०. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता H /west,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच वार्ड वेस्ट,**
**सेट मार्टिन्स रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (परिरक्षण) H /west, ...उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच वार्ड वेस्ट,**
**सेट मार्टिन्स रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक -१५/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ०६/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ०४/०५/२०१० रोजीजन माहिती अधिकारी तथा Maintenance Department H/W ward bandra (w) यांच्या कडे extra wide garden strip/flower beds outside Wahedna Apts, Hill road Bnadra (w.) १९८० पासून ते अर्जाच्या तारखेपर्यंतचा कालावधी या संदर्भामध्ये A ते I या मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे दि. २०/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. त्यांनतर अपिलकर्ता यांना मुद्देनिहाय उत्तर देण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २३/०९/२०१० रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण) H/W यांनी दि. ०४/०५/२०१० रोजीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी त्याप्रमाणे त्यांना पुन्हा दि. १३/०९/२०१० रोजी प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु

समाधान झाले नाही त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सागितले की, flower beds च्या संदर्भात काही नियम आहेत का, याबद्दलची माहिती त्यांनी मागितलेली आहे. परंतु कागदपत्रांमध्ये तशी माहिती उपलब्ध नाही, असे त्यांनी उत्तर दिलेले असून, ते दिशाभूल करणारे उत्तर आहे. तसेच अपिलकर्ता यांना मुंबई म्युन्सिपल कॉर्पोरेशन ॲक्ट मध्ये अशी तरतूद आहे का, याबद्दलची माहिती हवी होती, असे असल्यास मुंबई म्युन्सिपल कॉर्पोरेशन ॲक्ट किंवा महानगरपालिकेच्या ठरावामध्ये किंवा परिपत्रकाच्या स्वरुपात अश्याप्रकारचे नियम उपलब्ध आहेत किंवा नाहीत हे अपिलकर्ता यांना कळविणे संयुक्तीक राहील. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२ च्या संदर्भात निश्चित नियम आहेत किंवा नाहीत , याबाबतचे उत्तर विनामूल्य पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.**

**२) अलिपकर्ता आणि उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०६-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./७७९ /अपील क्र. ६७३६/०२.**

**श्रीमती. स्मिता मधुकर जोशी,**
**द्वारा, सौ. स्मिता महेश चंद्रात्रे,**
**अे/१०२, सिध्दिविनायक हौ.**
**सोसायटी, प्लॉट नं. ३६,**
**सेक्टर १ ई. कळंबोली,**
**ता. पनवेल. जि. रायगड ४१०२९८.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग,**
**मुंबई यांचे कार्यालय, जवाहर बालभवन,**
**चर्नीरोड मुंबई ४०० ००४.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,**
**शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग,**
**मुंबई यांचे कार्यालय, जवाहर बालभवन,**
**चर्नीरोड मुंबई ४०० ००४.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक -२४/०१/२०११.**
**सुनावणीचा दिनांक - ०६/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३/११/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक कार्यालयामध्ये सुधागड एज्युकेशन सोसायटी, पाली या संस्थेची शालेय अस्थापनेवरील माहिती एकूण ७ प्रमुख व प्रत्येक उपमुद्यामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.०४/१२/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, शिक्षण उपसंचालक यांनी सुधागड एज्युकेशन सोसायटी, पाली या संस्थेची शालेय आस्थापनेवरील माहिती ही सदरहू शाळा ही शिक्षणाधिकारी (माध्य.), जि. प. रायगड यांच्या कार्यकक्षेत येत असल्याने त्यांचा अर्ज त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.), जि. प. रायगड यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. आपण माहिती अधिकारातंर्गत आवश्यक असणारी माहिती संबधित

कार्यालयातील माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २८/१२/२०१० रोजी अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.०६/०१/२०११ रोजी देण्यात आलेला असून मागविलेली माहिती ही संबधीत शाळेशी / कनिष्ठ महाविद्यालयाशी संबधित आहे. शाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी आहेत त्यामुळे आपण मागितलेली माहिती संबधित शाळेच्या /कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकांकडून उपलब्ध करुन घ्यावी सदर माहिती शाळेच्या माहिती अधिकाऱ्याने न दिल्यास आपण प्रकरणपरत्वे शिक्षणाधिकारी/शिक्षण उपसंचालक यांचेकडे अपील दाखल करावे असे त्यांना कळविलेले दिसून येते. तसेच दि. ०१/०२/११ रोजी सुध्दा अपिलकर्ता यांच्या दि. २३/१२/२०१० च्या अर्जासंदर्भात पुन्हा माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी सदरची माहिती शाळेकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती ही शाळेशी संबधित असल्याने व सर्व शाळांची मान्यता ही उपसंचालक यांच्या कार्यालयातून होत असल्याने सदरची माहिती त्यांनी उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, शाळा व शैक्षिणक संस्था या स्वतंत्रपणे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या तरतूदींप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण आहेत. सुधागड एज्युकेशन सोसायटी, पाली या शाळेस अनुदान मिळते व त्यामुळे ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येमध्ये येते. त्यामुळे सदरच्या संस्थेमध्ये सचिव सुधागड एज्युकेशन सोसायटी, पाली तसेच मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहेत. व तसेही सदरचा अर्ज हा संबधित शिक्षण अधिकारी यांचेकडे हस्तांतर केला होता. व अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती शाळा स्तरावरील असल्यामुळे शिक्षण अधिकारी यांचेकडून काहीही पत्रव्यवहार झालेला नाही असे दिसून येते. मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी व शिक्षण अधिकारी हे प्रथम अपिलीय अधिकारी आहेत. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती शिक्षक नियुक्ती, मुलाखती, जाहिरात इ. स्वरुपात आहे. त्यामुळे शिक्षकांची नियुक्ती ही संस्था करते, मुलाखती संस्था घेते व जाहिरात संस्था देते, त्यामुळे ही माहिती संस्थेकडूनच उपलब्ध करुन घेणे संयुक्तीक राहील.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ५(१) प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये माहिती आयुक्त नियुक्त करण्याची तरतूद आहे व कलम ६(१) प्रमाणे अर्जदाराने ज्या स्तरावरील माहिती मागितलेली असेल ती माहिती संबधित माहिती अधिकारी यांचेकडे मागणे अपक्षित असते. शिक्षण विभागाचे नियंत्रण जरी असले तरी सर्वच माहिती एकाच कार्यालयात उपलब्ध नसते त्यामुळे सर्व कार्यालयामध्ये त्या त्या स्तरावर जन माहिती अधिकारी हे त्या त्या कार्यालयात नियुक्त करण्यात आलेले आहेत. अधिनियमाचे कलम २ (ञ) नुसार 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली माहिती, त्या त्या स्तरावरील माहिती अधिकारी यांचेकडे मागितल्यास ती माहिती तीस

दिवसात उपलब्ध होऊ शकते. प्रत्येक कार्यालयाची व प्राधिकरणाची स्वतंत्र अशी यंत्रणा तसेच स्वतंत्र माहिती असते. व ती माहिती त्या त्या माहिती अधिकाऱ्याकडे मागणे अपेक्षित असते.

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, शिक्षण उपसंचालक यांनी सदरचा अर्ज हा संस्थेचे सचिव यांचेकडे हस्तांतर करणे आवश्यक होते. व दि. ३१/०५/२०११ रोजी आयोगाची नोटीस मिळाल्यानंतर शिक्षण उपसंचालक श्री. चौहान यांनी सदरचा अर्ज हा सचिव सुधागड एज्युकेशन सोसायटी, पाली यांचेकडे विलंबाने हस्तांतर केलेला दिसून येतो. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांना अधिनियमाच्या तरतूदींची कोणतीही माहिती नाही असे दिसून येते. शिक्षण उपसंचालक श्री. चौहान यांनी सचिव सुधागड एज्युकेशन सोसायटी, पाली यांच्याकडून माहिती घेऊन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून तीस दिवसाचे आत संबधित शिक्षणाधिकारी यांना जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक शिक्षण उपसंचालक कार्यालय यांनी आदेश देऊन सचिव सुधागड एज्युकेशन सोसायटी, पाली यांच्याकडून मागितलेली माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलकर्ता यांना विनामूल्य देण्यात यावी. व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी व शिक्षणाधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी . तसेच यापुढे अर्जांचे हस्तांतर करताना योग्य रीतीने अर्ज हस्तांतर करण्याची खबरदारी घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०६-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०६५५ /अपील क्र. ६७३८/०२.**

**श्री.अनिल महेश्वरी,**
**सी- २०१, वसंत गॅलक्सी, बांगुरनगर,**
**गोरेगाव (प), मुंबई ४०० ०९०. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ १२,**
**शैलेंद्र नगर, दहिसर (पू), मुंबई ४०० ०६८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त,**
**सहा. पोलीस आयुक्त, उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,**
**कांदीवली (पू.), मुंबई ४००१०१. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक -२२/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - १४/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. १०/०६/२०११ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त कांदीवली (पू.) यांच्याकडे (i) CC No. 110/M/08 of Goregaon Police station in the 24th Court of Additional Chief Metropolitan Megistrate Borivali (W.) Copy of complete file of investigation (including Statement taken on record diary, findings final report and etc.) 31st july 2007 to 10th june 2010 याबाबतची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. २३/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर दि. १४/०८/२०१० रोजी अपिलकर्ता यांना वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरेगाव पोलीस ठाणे यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. १७/०८/२०१० रोजी देण्यात आलेला असून शासकिय माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती नियमानुसार देय असल्यास, गोरेगाव पोलीस ठाणे यांच्याकडून प्राप्त करुन अपिलकर्ता अर्जदार यांना पुरविण्यात यावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर अपिलकर्ता यांना दि.

२८/०९/२०१० रोजी पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलकर्ता यांना प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात आतापर्यंत सर्व माहिती मिळाली आहे. परंतु, पोलीस डायरी मधील तपासाच्या संदर्भातील नोंदी या उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, फौजदारी आचारसंहिता १९७३ च्या कलम १७२ (३) प्रमाणे पोलीस डायरी मधील नोंदी या तपासीय अमलदाराच्या स्वतःच्या नोंदी असतात. त्यामुळे सदरच्या नोंदी या न्यायालयीन आदेश दिले तरी अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येत नाहीत. मात्र तपासीय अमलदार सदरच्या नोंदीचा वापर हा पुरावा देताना करु शकतो म्हणून अपिलकर्ता यांना पोलीस नोंदीची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच तपासीय अधिकारी हे अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या वेळेस रुग्णनिवेदनात होते तसेच कर्तव्यावर हजर झाल्यापासून कायदा व सुव्यवस्था राखणे कामी सतत व्यस्त होते. त्यामुळे अर्जदार यांना विहीत मुदतीत माहिती पुरविण्यास विलंब
झाला होता असाही खुलासा त्यानी आयोगापुढे केला. हा त्यामुळे अपिलकर्ता यांना तपासीय अधिकारी यांनी त्यांच्या आठवणी ताज्या करण्याकरिता पोलीस डायरीतील नोंदीचा उपयोग पुरावा देताना केलेला असल्यास, आरोपीस त्या संदर्भात न्यायालयाची परवानगी घेऊन तपासीय अधिकाऱ्यास याबद्दल विचारता येईल त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०६५७ /अपील क्र. ६७३९/०२.**

**श्री. मुनाफ बरमारे,**
**३०१, रोम लुई, तिसरा मजला,**
**पितांबर लेन, माहिम, मुंबई ४०० ०१६.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**विभागीय सह-निबंधक, सहकारी संस्था,**
**मुंबई विभाग, ६ वा मजला,**
**मल्होत्रा हाऊस, मुंबई ४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यालय अधिक्षक अधिन सह- निबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग, ६ वा मजला,**
**मल्होत्रा हाऊस, मुंबई ४००००१.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक -२३/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - १४/०६/२०११.**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. २८/०७/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयात एकूण ४० मुद्यामध्ये अनेक विषयांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही अपिलकर्ता हे रोम-लुई सोसायटीचे प्रशासक झाल्या संदर्भात मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि. २५/०८/२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २४/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. ०४/११/२०१० रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली

काढण्यात आलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता हे गैरहजर आहेत. तसेच अपिलकर्ता यांना कोणत्या प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही याबद्दल कोणतेही निवेदन किंवा खुलासा त्यांनी आयोगापुढे केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली होती ती प्रश्नोत्तराच्या स्वरुपात आहे. तसेच उपनिबंधक सहकारी संस्था यांनी संबधित संस्थेच्या कागदपत्राची तपासणी करावी वगैरे असे त्यांनी सूचित केलेले आहे. तसेच या कार्यालयाशी काहीही संबध नसलेल्या जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची नावे व दूरध्वनी क्र. मागितलेले आहेत. त्यामुळे अपिलकर्ता यांना मुद्देनिहाय माहिती त्यावेळेस उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीस सुध्दा अपिलकर्ता उपस्थित नव्हते मात्र प्रथम अपील मेमो मध्ये त्यांनी व्यक्तीश: सुनावणीस हजर राहावे असे नमूद केलेले असून सुध्दा ते हजर राहीले नाहीत व ते आजही सुनाणीस गैरहजर आहेत तसेच त्यांनी कोणताही खुलासा दाखल केलेला नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(च) व कलम २(ञ) प्रमाणे 'माहिती' व 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्याप्रमाणे कार्यालयात उपलब्ध असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. जन माहिती अधिकारी यांचे कोणत्याही प्रकरणातील अभिलेख अभिप्रेत नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी यांनी एखादी कारवाई करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी अशीही तरतूद नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रे तपासून माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी केलेली दिसून येते. तसेच सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली माहितीच जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील अन्य प्रधिकरणातील माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नसल्यामुळे अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेले मुद्देनिहाय उत्तर हे योग्य असल्यामुळे, अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१. अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**
**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०६६१ /अपील क्र. ६७४०/०२.**

**श्री. शंभूशरण सक्सेना,**
**पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,**
**रे-रोड स्टेशनसमोर, माजगांव,**
**मुंबई ४०००१०. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प.), मुंबई ४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) ,**
**पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प.), मुंबई ४०००६४. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक -०८/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - १४/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ३०/०८/२०१० रोजी जन माहिती अधिकारी पी/उत्तर विभाग, बृ. मनपा. लिबर्टी गार्डन, मालाड (प.), मुंबई. यांच्याकडे सन २००९-२०१० या कालावधीत श्री. मोहोम्मद शेख यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात अस्लम शेख नगरसेवक मालवणी, यांच्यासदंर्भात केलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही झाली अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. ०१/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगापुढे अपिलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी अर्जामध्ये मोहोम्मद शेख यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली होती ती अद्यापपर्यंत मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही कारण एक तर अपिलकर्ता यांनी मोहोम्मद शेख यांनी कोणत्या तक्रारीच्या संदर्भात माहिती मागितलेली आहे हे अर्जात नमूद केलेले नाही. तसेच मोहोम्मद शेख यांच्याकडून अनेक तक्रारी

प्राप्त झालेल्या आहेत. परंतु त्यांनी कोणत्या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात तक्रारी केलेल्या आहेत, या बाबतचा तपशील दिलेला नसल्यामुळे त्यांना पत्राद्वारे मोका जागा दाखविण्याचे कळविण्यात आलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत त्याबाबत कोणतीही जागा दाखिविली नाही. सदरचे संकुल हे फार मोठे संकुल आहे व त्या संपूर्ण संकुलामध्ये कोणत्या अनधिकृत बांधकामाची तक्रार आहे हे त्यांनी दाखविल्याशिवाय कोणत्याही प्रकारची कारवाई करता येत नाही. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरचे अवैध बांधकाम हे श्री. उस्मान शेख यांचे आहे व ते नगरसेवक आहेत, त्यामुळे त्या सदंर्भात कारवाई केली जात नाही. पूर्वी सुध्दा सदरच्या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात आयोगाच्या कार्यालयात दि. ३०/०१/२०१० रोजी व ३१/०८/२०१० रोजी अनुक्रमे द्वितीय अपील व तक्रारीचे निर्णय झालेले आहेत व दि. ३१/०८/२०१० ची तक्रार निकाली काढण्यात आलेली असली तरी अपिलकर्ता यांना मोहोम्मद शेख यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांना कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील त्या करिता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि. ३०/०८/२०१० च्या अर्जात मोहोम्मद शेख यांनी केलेल्या तक्रारी संदर्भात केलेली करवाई म्हणजेच जो पत्रव्यवहार मोहोम्मद उस्मान शेख यांच्याशी केलेला आहे. त्या पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती अपिलकर्ता यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१. निवडनस्ती**
**२. स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०६४२ /अपील क्र. ६७३७/०२.**

**श्री. शंभूशरण सक्सेना,**
**रुम नं. १०१४, मुळेबाई चाळ, रामगडनगर,**
**गोशाला रोड, मुलुंड (प.)**
**मुंबई ४०००८०.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**टी विभाग, बृ.मनपा, टी विभाग, म्युन्सिपल ऑफिस,**
**लाला देवीदयाल मार्ग, मुलुंड (प.)**
**मुंबई ४०००८०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.),**
**बृ.मनपा, टी विभाग, म्युन्सिपल ऑफिस,**
**लाला देवीदयाल मार्ग, मुलुंड (प.)**
**मुंबई ४०००८०.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक -२४/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - १४/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ०८/०९/२०१० रोजी जन माहिती अधिकारी 'टी' विभाग यांच्याकडे हॉटेल अचिजा यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामासंदर्भात एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून दि. १५/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.११/११/२०१० रोजी देण्यात आलेला असून मागितलेली माहिती निशुल्क १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना राज्य माहिती आयोगापुढे असे सांगितले की, मूळ अर्जाच्या संदर्भात आतापर्यंत अनधिकृत बांधकामासंदर्भात अनेक तक्रारी केलेल्या आहेत. परंतु

हॉटेल बाहेरील अनधिकृत बांधकाम हे काढूनही टाकण्यात येत नाही व कार्यालयात सुध्दा त्याबद्दलची काहीही माहिती उपलब्ध नाही, असे सांगण्यात आलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊन सुध्दा माहिती उपलब्ध करुन देलेली नाही. जन माहिती अधिकारी हे उशीरा उपस्थित झाले व त्यांनी आयोगापुढे दि. १५/११/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व ती माहिती दि. ०९/१२/१० रोजी अपिलकर्ता यांना उपलब्ध झाली व याबद्दलची पोच आयोगाच्या निदर्शनास आणली. विलंबाच्या संदर्भात त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली होती ती माहिती संकलित करण्याकरिता विलंब झालेला आहे. तसेच काही माहिती त्यांनी प्रश्नोत्तराच्या संदर्भात मागितलेली आहे, त्यामुळे ती त्यांना देण्यात आलेली नाही. मात्र अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रश्न विचारलेले आहेत. तरी सुध्दा त्यात जन माहिती अधिकारी यांचे प्रकरणातील अभिप्राय किंवा मत मागितलेले नाही तर अनधिकृत बांधकामास कोणते अधिकारी जबाबदार होते अशी माहिती मागितलेली आहे व त्यामुळे प्रश्न विचारलेला आहे म्हणून उत्तर देता येत नाही असे जे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे ते माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचे उत्तर आहे. तसेच विलंबाने माहिती दिली व माहिती देण्यास सुध्दा टाळाटाळ केली व माहिती दिली आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले, त्यामध्ये निश्चित अशी कोणतीही माहिती दिलेली दिसून येत नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस अधिनियमाचे कलम २० (२) अन्वये करणे आवश्यक झाले आहे. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसांचे आत अपिलकर्ता यांना कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली व तसेच माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली असल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येते.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०७३० /अपील क्र. ६७६७/०२.**

**श्री. देव ए. पाका,**
**४०२, चौथा मजला, प्रीती डॉक्टर्स सोसायटी,**
**के.सी. मार्ग, वांद्रे रेक्लमेशन ,वांद्रे (प.),**
**मुंबई ४०० ०५०. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपसचिव (कामगार I), उद्योग ऊर्जा व**
**कामगार विभाग, महाराष्ट्र शासन,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी (कामगार I),**
**उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - ०१/१२/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - १७/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. १७/०९/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी कामगार विभाग यांच्याकडे सहसंचालक औद्योगिक सुरक्षिततेच्या संदर्भामध्ये सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीच्या कार्यपध्दती इ. बाबत असलेली कागदपत्रे मागितलेली दिसून येतात. विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून दि. २६/१०/२०१० रोजी अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय सुध्दा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, कोणत्याही प्रकारचे सेवाप्रवेश नियम नसताना सहसंचालक या पदावरती पदोन्नती किंवा नियुक्ती केली जाते, त्यामुळे सदरची माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सेवाप्रवेश नियम हे वेबसाईटवर देण्यात आलेले आहेत. परंतु त्यासंदर्भातील नस्ती ही २००२ पासून असल्यामुळे ती आढळून येत नव्हती, मात्र शोध घेतल्यानंतर सर्व कागदपत्रे उपलब्ध

झालेली आहेत व ती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यानंतर आयोगाच्या समक्ष जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्तो यांना सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिली व अपिलकर्ता यांनी पोच सुध्दा दिली असल्यामुळे, सदरचे अपील हे निकाली काढण्यात येते.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१. निवडनस्ती**
**२. स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०७२६ /अपील क्र. ६७६६/०२.**

**श्री. रामबच्चन बारकुमार जैस्वाल,**
**महात्मा फुले नगर, एस १०३५,**
**आय.आय.टी. मार्केटजवळ,**
**पवई, मुंबई ४०००७६.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप नियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,**
**ई-परिमंडळ, चंचल स्मृती इमारत,**
**१ला मजला, ग.द.आंबेकर मार्ग, वडाळा,**
**मुंबई ४०० ०३१.**

**जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी,**
**शि.का. क्र. ३० ई, ईश्वर नगर, एल.बी.एस मार्ग,**
**भांडुप (प.) मुंबई ४०० ०७८.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - ०२/१२/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - १७/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०३/०९/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी ३० ई, ईश्वर नगर एल.बी.एस मार्ग, भांडुप (प.) मुंबई यांच्याकडे पवईतील महात्मा फुले नगरातील रुम क्र.ए/१०३५,या अधिकृत घराच्या नावे श्रीमती आशादेवी कमलेश जैस्वाल यांच्या नावे शिधापत्रिका दिली आहे का?, ही शिधापत्रिका देत असताना शिधावाटप निरिक्षक यांनी ज्या कागदपत्रांची पडताळणी केली आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्वत: घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. ०४/१०/१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ११ प्रमाणे त्रयस्थ पक्षाची माहिती आहे असे कारण देऊन, त्रयस्थ पक्षाने माहिती उपलब्ध करुन देण्यास आक्षेप घेतला असल्यामुळे, माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे पत्र दि.०४/१०/२०१० रोजी दिलेले दिसून

येते. मात्र कार्यालयीन अभिलेखाची त्यांचे नाव असलेल्या ३० ई ९९ या दुकानाच्या संदर्भ नोंदवहीची छायांकित प्रत देत आहोत, रु. २/- इतके शुल्क भरुन आपण सदर प्रत उपल्बध करुन घेऊ शकता, असे कळविलेले दिसून येते. परंतु, अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २०/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. ०२/११/१० रोजी देण्यात आला असून कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली माहिती तातडीने अपिलकर्ता यांना देण्यात यावी, असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, सदरची रुम त्यांची स्वतःची असून रुम संदर्भात त्यांना सुध्दा शिधापत्रिका उपलब्ध झालेली आहे, श्रीमती जैस्वाल यांनासुध्दा शिधापत्रिका दिलेली आहे. त्यामुळे श्रीमती जैस्वाल यांना कोणत्या कागदपत्रांच्या आधारावर शिधापत्रिका दिलेली आहे, याबद्दलची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, श्रीमती जैस्वाल यांनी काही खाजगी कागदपत्रे दाखल केलेली असावीत त्यामुळे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येत नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे विसंगत दिसून येते. कलम ११ प्रमाणे त्यांनी विचारणा केली याचा अर्थ त्यांच्याकडे कागदपत्रे उपलब्ध नाहीत व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत असे आदेश दिल्यानंतर मात्र कागदपत्रे आढळून येत नाहीत असे ते सांगतात. जर कागदपत्रे उपलब्धच नाहीत तर कलम ११ ची प्रक्रिया करण्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असले तर, त्यांनी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी ती कागदपत्रे गहाळ करण्यात आलेली आहेत या कारणास्तव संबधित पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर दाखल करणे आवश्यक होते. शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या सोयी , सुविधा किंवा सवलती नागरिकांना उपलब्ध करुन द्यावयाच्या असल्यास त्याकरिता काही निकष हे दिलेले असतात. व त्या निकषांची पूर्तता केल्यानंतरच त्या सोयी ,सुविधा किंवा सवलती संदर्भात परवानगी दिली जाते. ते सर्व निकष किंवा निकष संदर्भातील कागदपत्रे ही निर्णय घेण्याकरिता आवश्यक असल्यास ती कोणत्याही व्यक्तीची खाजगी माहिती होऊ शकत नाही, तर अशी कागदपत्रे ही सार्वजनिक अभिलेखाचाच भाग होतात त्यामुळे ती सार्वजनिक क्षेत्रात येतात. त्याकरिता कलम ११ ची प्रक्रिया करणे हे योग्य नाही. कलम ११ प्रमाणे जी कागदपत्रे व्यक्तीगत माहितीच्या संदर्भात आहेत किंवा त्रयस्थ पक्षाने ती शासनाकडे विश्वासाने सदर केलेली आहेत व ती गोपनीय आहेत, असे जर कळविलेले असले तरच कलम ११ ची प्रक्रिया करणे आवश्यक असते. वरील प्रकरणातील सर्व कागदपत्रे सार्वजनिक अभिलेखाचाच भाग असल्यामुळे, ती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु कागदपत्रे गहाळ झाली आहेत, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले असल्यामुळे, त्या संदर्भात एफ.आय.आर दाखल करणे आवश्यक आहे. त्यानंतर कागदपत्रे मिळाल्यास ती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

---आदेश---

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून , अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.०३/०९/२०१० रोजीच्या अर्जात श्रीमती आशादेवी कमलेश जैस्वाल यांना शिधापत्रिका उपलब्ध करुन देण्याकरिता जी कागदपत्रे आधार म्हणून दाखल करुन घेतलेली आहेत, ती आढळून येत नसल्यास संबधित पोलीस स्टेशन कडे एफ.आय.आर दाखल करावी व त्या एफ.आय.आर ची छायांकित प्रत अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १७-०६-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती
२) स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०७२५ /अपील क्र. ६७६५/०२.**

**श्री. सुधीर आर घेडीया,**
**१५९, माहिमतुरा मार्ग,**
**एस.व्ही.पी रोड,**
**मुंबई ४००००४. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रा (पू.),**
**मुंबई ४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी- १,**
**उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रा (पू.),**
**मुंबई ४०००५१. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - ०१/१२/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - १७/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. २३/०९/२०१० रोजी जन माहिती उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे वर्सोवा संदीप सरोवर गृहनिर्माण संस्था संदर्भामध्ये १९९३ मध्ये नेमण्यात आलेल्या प्रशासका संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु, माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. २९/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, १९९३ मध्ये सदरच्या संस्थेवरती प्रशासक बसविण्यात आलेले होते व त्या प्रशासका संदर्भात त्यांना माहिती पाहिजे होती.

परंतु त्यांना ती उपलब्ध झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, १९९३ रोजीच्या माहितीचा शोध घेतला असता संबधित कागदपत्रे आढळून आली नाहीत, असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या अर्जाची दखल घेतलेली दिसून येत नाही. आज सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर असले तरी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे त्यांनी दाखल केलेली नाहीत. मात्र सुनावणीच्या वेळी उत्तर दिल्याचे दाखविण्यात आले त्याबद्दल जावक नोदवहीमधील नोंदी सुध्दा दाखविण्यात आलेल्या नाहीत. व त्यामुळे आयोगापुढे सुनावणीच्या वेळेस मागील तारखेचे उत्तर तयार करून आणलेले दिसून येते. सदरचे पत्र हे अपिलकर्ता यांना उपलब्ध झालेले नाही असे अपिलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे. आलेल्या अर्जाची दखल न घेणे, आयोगाच्या नोटीसीप्रमाणे कागदपत्रे दाखल न करणे, यावरुनच जन माहिती अधिकारी हे बेजबाबदार आहेत, असे दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसांचे आत अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्यासंदर्भातील नस्तीचा शोध घेऊन कागदपत्रे उपलब्ध झाल्यास छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात व कागदपत्रे उपलब्ध होत नसतील तर त्याबाबतची कारणे अपिलकर्ता यांना कळविण्यात यावीत.**

**२) जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे येताना सुध्दा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नसल्यामुळे व जी कागदपत्रे आयोगापुढे दाखविण्यात आली, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सुध्दा दाखल केलेल्या नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. तसेच शिस्तभंगाची कारवाई जिल्हा उपनिबंधक सक्षम अधिकारी यांनी करावयाची असल्यामुळे त्यांच्याकडे सुध्दा निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०७२३/अपील क्र. ६७६४/०२.**

**श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले,**
**सिध्दिविनायक प्रसाद,**
**डॉ. शामा प्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली (पू), ४२१ २०१,**
**ता. कल्याण, जिल्हा. ठाणे ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-सचिव,**
**नगरविकास विभाग (न.वि. २३),**
**मंत्रालय, मादाम कामा रोड,**
**मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**नगरविकास विभाग (न.वि. २३),**
**मंत्रालय, मादाम कामा रोड,**
**मुंबई ४०० ०३२. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - २५/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - १७/०६/२०११.**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. २१/०८/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा नगरविकास न.वि.२३ नगरविकास विभाग यांचेकडे मा. उच्च न्यायालय (औरंगाबाद खंडपीठ) यांनी रिट पीटीशन क्रमांक ८६०८/२००९ मध्ये दि. ०९/०२/१० रोजीच्या दिलेल्या आदेशाची छायांकित प्रत सोबत जोडून याचिका कर्त्याने न्यायालयाच्या आदेशानुसार दाखल केलेल्या अर्जाची छायांकित सत्यप्रत, त्यावर शासनाने केलेल्या कार्यवाहीची प्रत, विधी विभागाचे व अन्य विभागाचे अभिप्राय घेतलेले असल्यास त्याची प्रत मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून, अपिलकर्ता यांनी दि २८/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय मिळालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदर माहिती अर्जावरुन व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशावरुन सदर अर्ज कोणत्या विषयासंदर्भात आहे व कोणत्या कार्यासनाशी संबधित आहे याचा अर्थबोध होत नव्हता व त्यामुळे सदरच्या कार्यालयातील संपूर्ण न्यायालयीन केस तपासल्या त्याच प्रमाणे मुंबई उच्च न्यायालयीन वेबसाईट वर जाऊन स्वतः पाहिले तरीही याबाबतची माहिती मिळाली नाही. यामुळे सदर अर्ज दि. १३/०९/२०१० रोजीच्या टिप्पणी अन्वये नोंदणी शाखेत परत करुन नोंदणी शाखेतील लिपीकाची स्वाक्षरी घेतली व माहिती अर्ज परत केला. प्रथम अपील

झालेले आहे परंतु मूळ अर्ज नोंदणी शाखेत परत पाठविल्यामुळे प्रथम अपील अर्ज सुध्दा नोदणी शाखेत परत करण्यात आला. त्यानंतर मूळ माहिती अर्ज व प्रथम अपीलाचा शोध घेतला असता अर्ज कोणाला दिला आहे याची नोंद कुठेही आढळून आली नाही. परंतु यापूर्वी श्री. गोखले यांना त्यांच्या दि. १८/०८/२०१० च्या माहिती अर्जास अनूसरुन याच विषयाबाबतची संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी न.वि. २८ यांनी दि. ३०/०८/२०१० दि. १३/०९/२०१० रोजी पाठविण्यात आलेली आहे. त्यामुळे माहिती अर्जदार माहिती पासून वंचित राहीला नाही. शोधाअंती सुध्दा सदर अर्ज न.वि. २८ शी संबधित असल्याने स्पीड पोस्टाद्वारे पुन्हा दि. १५/०६/२०११ रोजी माहिती दिलेली आहे व त्यामुळे अर्जदाराच्या अर्जाच्या संदर्भात कोणतीही कारवाई केलेली नाही, असे म्हणता येणार नाही त्यामुळे माहिती उपलब्ध झाली असल्याकारणाने अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने विचारलेल्या माहितीच्या संदर्भात अर्थबोध होत नसला तर त्यांनी त्याबाबत अर्जदाराला पुन्हा स्पष्टिकरण किंवा खुलासा विचारणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनाच जर बोध होत नसेल तर अर्ज पुन्हा नोंदणी शाखेत पाठवून नोंदणी शाखेतील कर्मचाऱ्यांना सुध्दा अर्थबोध होणार नसेल तर ते माहिती अर्ज संबधित माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज हस्तांतर करु शकणार नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनीच अपिलकर्ता यांना विचारणा करुन योग्य ती कारवाई करणे आवश्यक असते, परंतु या संदर्भात त्यांनी तशी कारवाई केलेली दिसून येत नाही. मात्र शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी न.वि. २८ यांच्याकडे माहिती मागितलेली होती व ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.०१/अपील क्र.६७९१/०२**

**श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले,**
**सिध्दिविनायक प्रसाद,**
**डॉ. शामा प्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली (पू), ४२१ २०१,**
**ता. कल्याण, जिल्हा. ठाणे ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव,**
**नगरविकास विभाग (न.वि.२८ व नि.वि. १४)**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कक्ष अधिकारी (न.वि.२८ व नि.वि. १४),**
**नगरविकास विभाग (न.वि.२८ व नि.वि. १४)**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक ०२/१२/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - २७/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी (न.वि. २८) - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी (न.वि. १४) - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१८/०८/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नगरविकास २८ यांचे कडे जळगाव महानगरपालिका आयुक्तपदी श्री. रामनाथ सोनावणे यांच्या नियुक्ती संदर्भात तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपायुक्त, श्री रामनाथ सोनावणे यांची आयुक्तपदी नियुक्ती, तसेच सिडको येथील मान्यतेसाठी ठराव पारित झाला आहे, या ठरावाची शासनाने केलेल्या अंमलबजावणीची माहिती, कल्याण-डोबिवली महानगरपालिकेच्या आयुक्तपदी प्रतिनियुक्ती किंवा पदोन्नतीने नियुक्ती झाली याबद्दलची माहिती तसेच सदरच्या नियुक्त्या करुन विधी विभागाचे अभिप्राय घेण्यात आलेले आहेत किंवा नाहीत, 'ड' वर्ग महापालिका आयुक्तपदी नियुक्ती करताना ३८ च्या आकृतीबंधातील कोणकोणत्या नियुक्त्यांची पूर्तता आयुक्तपदी करण्यात आल्या, 'ड' वर्ग महापालिकेचे आयुक्त पद हे शासन सेवेतील इतर कोणकोणत्या पदाशी समकक्ष आहे याबद्दलची माहिती , सन २००१ ते अर्जाचे

तारखेपर्यंत शीघ्र टपालाने मिळावी असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि. ३०/०८/२०११ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली असून, कागदपत्रांच्या व पोस्टाच्या खर्चाकरिता एकूण रु २१५/- एवढे शुल्क भरावे, असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे मुद्दा क्र.२,४,५,६ च्या संदर्भात माहिती न.वि. १४ कार्यासनाशी संबधित असल्याने अर्जाची प्रत पुढील कार्यवाहीसाठी अवर सचिव तथा जन माहिती अधिकारी नगरविकास विभाग न.वि.१४ यांच्या कडे पाठविण्यात आली आहे. मुद्दा क्र. ३ च्या संदर्भामध्ये प्रतिनियुक्तीबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने पारित केलेला ठराव व त्याबाबतची कागदपत्रे या कार्यासनात आढळून येत नाहीत व ठरावाच्या अंमलबजावणीबाबत या कार्यासनामार्फत कार्यवाही झाल्याचे आढळत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २५/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.०२/११/२०१० रोजी देण्यात आलेला असून मुद्दा क्र. १ व मुद्दा क्र. २,४,५,६,७ च्या सदंर्भात न.वि.१४ यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तसेच मुद्दा क्र. ६ च्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय देऊन अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्या अनुषंगाने दि. ०२/११/२०१० रोजी अपिलकर्ता यांना मुद्दा क्र. ६ ची सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल करुन त्यामध्ये अपूर्ण व चूकीची माहिती मिळाली अशी कारणे दिलेली आहेत.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे लेखी निवेदन सादर केलेले आहे, त्यामध्ये त्यांना माहिती उपलब्ध असून देखील माहिती दिलेली नाही व सोनावणे यांच्या बदली आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली नाही असा उल्लेख केलला आहे. श्री. रामनाथ सोनावणे यांची नियुक्ती बदलीने केलेली आहे. सबब सदरची माहिती चूकीची व दिशाभूल करणारी आहे. तसेच त्यांच्या निवेदनामध्ये प्रत्येक मुद्यांच्यासंदर्भामध्ये जे विश्लेषण दिलेले आहे ते निर्णय प्रक्रियेच्या गुणवत्तेबाबत दिलेले आहे. संबधित माहिती असली पाहिजे, ती दिलेली नाही असा युक्तीवाद केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती जळगाव महानगरपालिकेच्या संदर्भातील माहिती न.वि.२८ हाताळत असल्यामुळे माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे जी कार्यवाही झालेली आहे व जी नस्तीत उपलब्ध आहे ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. न.वि. १४ च्या संदर्भात त्यांना मुद्देनिहाय माहिती दि. ११/१०/२०१० रोजी देण्यात आलेली आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवादामध्ये जी अपूर्ण व चूकीची माहिती दिलेली आहे याबद्दल सांगितले, त्याबाबत न.वि. २८ मधील श्री. रामनाथ सोनावणे यांच्या बद्दलची टिप्पणी मा. मुख्यामंत्री यांच्या मान्यतेसहीत दिलेली आहे. श्री रामनाथ सोनावणे यांच्यापुढील नियुक्ती संदर्भामध्ये न.वि. १४ कडे कार्यवाही झालेली आहे व ती एकट्या श्री. रामनाथ सोनावणेच्या संदर्भात झालेली नसल्यामुळे सर्वसाधारण बदलांच्यासंदर्भामध्ये मुख्याधिकारी संवर्ग यांचे परिशिष्ट 'अ', 'ब' आणि 'क' मधील नियुक्तीच्या संदर्भामध्ये सध्याची पदस्थापना व सुधारित पदस्थापने सदंर्भामध्ये तसेच विभागाच्या प्रस्तावाच्या

संदर्भामध्ये नगरविकास विभागाने केलेली टिप्पणी मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेकरिता पाठविल्यानंतर मा. मुख्यमंत्री यांच्या कार्यालयामध्ये विभागाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे असे मुख्यमंत्री सचिवालयाने घेतलेल्या टिप्पणी मध्ये परिशिष्ट अ, परिशिष्ट 'ब', परिशिष्ट 'क' च्या संदर्भामध्ये मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या मान्यतेच्या प्रती सुध्दा अपिलकर्ता यांना दिलेल्या आहेत.

परंतु अपिलकर्ता यांचा युक्तीवाद श्री. रामनाथ सोनावणे यांच्या नियुक्तीबाबतच्या अनयिमितते बाबत दिसून येतो. श्री. रामनाथ सोनावणे यांच्यासंदर्भात त्यांच्या सेवेच्यासंदर्भात ज्या काही अनियमितता झालेल्या असतील त्या संदर्भामध्ये गुणवत्तेबाबत अपिलकर्ता यांना योग्य त्या सक्षम प्राधिकरण किंवा न्यायालयाकडून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे दाद मागून घेता येतील. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) व (त्र) प्रमाणे 'माहिती' व 'माहितीचा अधिकार' या दोन संज्ञाची व्याख्या केलेली आहे. त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली व अधिनियमाप्रमाणे मिळविता येण्याजोगी माहिती म्हणजे साहित्याच्या स्वरुपात कार्यालयात उदा. कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज ही माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते, उपलब्ध असलेल्या माहिती वरुनच जर निर्णयप्रक्रियेच्या गुणवत्तेबाबत अनियमितता आढळून आल्यास वर नमूद केल्याप्रमाणे योग्य त्याप्राधिकरणाकडे तक्रार करणे अपेक्षित असते. मात्र कोणतीही कागदपत्रे असून दिलेली नाहीत याबद्दल शक्यतेपेक्षा प्रत्यक्ष माहिती आहे परंतु ती उपलब्ध करुन दिलेली नाही असे सिध्द करावे लागते. अन्यथा कागदपत्रांची तपासणी करणे हा एकच पर्याय आहे तसेही शासकिय कामकाजाची कार्यपध्दती माहित करुन घेऊनच माहिती मागणे अपेक्षित असते व ती माहिती उपलब्ध करुन घेतली नाही तर माहिती असण्याच्या शक्यतेबद्दलच युक्तीवाद केले जातात. अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना कार्यासन १४ व २८ यांनी कागदपत्रांच्या स्वरुपात असलेली सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २७-०६-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.०४/अपील क्र.६७९३/०२**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.०६/अपील क्र.६७९८/०२**

**श्री. नवनाथ वैजनाथ गोसावी,**
**ए ११/००६, निलगीरी सोसायटी,**
**लोकधारा, कल्याण(पू.),**
**कल्याण ४२१३०६. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**पोलीस उपायुक्त, बिनतारी संदेश विभाग यांचे कार्यालय,**
**नविन प्रशासकीय इमारत,**
**मुंबई ४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त**
**पोलीस उपायुक्त, बिनतारी संदेश विभाग यांचे कार्यालय,**
**नविन प्रशासकीय इमारत,**
**मुंबई ४०००३२. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक ०२/१२/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - २७/०६/२०११.**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी अपील क्रमांक ६७९३/०२ मध्ये दि.०५/०४/२०१० रोजी आहारभत्याबाबत तसेच अपील क्रमांक ६७९८/०२ मध्ये ॲक्सिस बँक मधील त्यांच्या खात्यावर जमा असलेल्या रक्कमेची सविस्तर माहिती मागितलेली दिसून येते. दोनही अर्जांच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांनी दि. ३१/०५/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. १३/०७/२०१० रोजी दोन प्रथम अपील दाखल केली. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे दोन द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांना सुनावणीची जी नोटीस पाठविली होती ती त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये दिलेल्या पत्त्यावरच पाठविण्यात आली होती परंतु ती परत आलेली आहे. जन माहिती अधिकारी

यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांची दोन्ही अपील ही निकाली काढण्यास पात्र आहेत.

**--- आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील क्र.६७९३/०२ व अपील क्र. ६७९८/०२ निकाली काढण्यात येते.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २७-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**निवडनस्ती**
**स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.०५/अपील क्र.६७९४/०२**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.२७/अपील क्र.६८४१/०२**

**श्री. रागेन एम. भावसार,**
**ए-१, शाह भुवन, एल.बी.एस.मार्ग,**
**गंगावाडी रोड, घाटकोपर (प.)**
**मुंबई ४०००८६.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरिक्षक**
**शिक्षण निरिक्षक (पश्चिम विभाग) यांचे कार्यालय,**
**आय. वाय. कॉलेज कंपाऊंड, जागेश्वरी (पू.),**
**मुंबई ४०००६०.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (वेतन व भ.नि.नि.पथक),**
**शिक्षण निरिक्षक (पश्चिम विभाग) यांचे कार्यालय,**
**आय. वाय. कॉलेज कंपाऊंड, जागेश्वरी (पू.),**
**मुंबई ४०००६०.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक ०७/१२/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - २७/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ०१/०९/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षण निरिक्षक यांचेकडे २००७ ते २०१० या कालावधीतील सर्व अभिव्याख्यातांचे कर्ज संदर्भातील माहिती एकूण ३ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. १५/०९/२०१० रोजी जन अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना घर खरेदी प्रकरणी सबंधित प्रकरण कार्यालयात सादर करण्यापूर्वीच पूर्ण रक्कमेचे प्रदान झालेले असल्यास म्हणजेच घर खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर घर खरेदी करण्यासाठी या सदराखाली अग्रिम (Advance) मागणेच अनुचित आहे. आपण मागविलेल्या माहितीप्रमाणे वर्ष २००७-०८, २००८-०९, २००९-२०१० ते ऑगस्ट १० पर्यंत अशाप्रकारची प्रकरणे या कार्यालयास सादर झालेली नाहीत. कामाचा आवक यावर भविष्य निर्वाह निधी प्रकरणे पारित होण्याचा कालावधी अवलंबून आहे. आपल्या प्रकरणाशी मिळतेजुळते प्रकरण या कार्यालयास सादर न झाल्याकारणाने नाकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे आपण

विचारणा केल्याप्रमाणे यादी देता येणार नाही अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. ०८/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये अपिलकर्ता यांना दि. २२/११/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तरीही त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना गृहकर्ज नाकारले आहे व त्यामुळेच इतरांना दिलेले असून सुध्दा त्यांना नाकारण्यात आल्यामुळे त्या सर्वांचे प्रकरण त्यांना तपासून पहावयाचे आहे. त्यामुळे त्यांना २००७ पासून ते २००९ पर्यंत ज्या व्याख्यात्यांना कर्जे दिलेली आहेत त्या संदर्भात प्रकरणे मागितली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी कर्ज मिळविण्याकरिता जो अर्ज केलेला आहे त्या अर्जामध्ये घर खरेदी करावयाचे आहे असे नमूद केलेले आहे. नियमाप्रमाणे घर खरेदी करावयाचे असल्यास अग्रीम देण्यात येतो व त्यानंतर सर्व रक्कम सुध्दा देण्यात येते. परंतु ही प्रक्रिया घर खरेदी करण्यापूर्वीची आहे. अपिलकर्ता यांनी जरी सहकारी संस्थकडून कर्ज घेतलेले असले तरी ती सर्व प्रक्रिया पूर्वीच झालेली होती व त्यांना सहकारी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाचे हफ्ते देण्याकरिता कर्ज हवे होते असे त्यांनी अर्जात म्हटले आहे व त्यामुळेच त्यांना कर्ज नाकारले होते. त्यांनी मागितलेल्या सर्व अभिव्याख्यात्यांच्या सदंर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झ ाल्यास कार्यालयाची यंत्रणा ही संपूर्णपणे वळवावी लागेल. तीन वर्षाच्या कालावधीत शेकडो कर्ज प्रकरणे होतात व याबाबत अतिशय व्यापक व विस्तृत प्रकारची कागदपत्रे असतात व तसेही अपिलकर्ता यांच्याप्रमाणे एकही मिळतेजुळते प्रकरण या कार्यालयात सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात यावे अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

अपिलकर्ता यांचे दुसरे अपील क्र. ६८४१/०२ हे दि. ०७/०७/२०११ रोजी सुनावणीस लावण्यात आलेली आहे असे अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले त्यामध्ये पुन्हा अपिलकर्ता यांनी दि. १७/०७/२०१० रोजी शिक्षण निरिक्षण यांनाच त्यांच्या भविष्य निर्वाह निधी सदंर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२४/०८/२०१० रोजी अपिलकर्ता यांना मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रामुख्याने मुद्दा क्र.४ च्या संदर्भामध्ये भविष्य निर्वाह निधी कलम १७ (ड) नुसार घरासाठी घेतलेले गृहकर्ज असणे आवश्यक आहे वैयक्तिक कर्ज असू नये. क्रेडीट सोसायटी मार्फत देण्यात येणारे कर्ज हे वैयक्तिक कर्ज असते, त्यावरील व्याजाची आकारणी ही वैयक्तिक कर्जाप्रमाणे होते. सबब क्रेडीट सोसायटी मार्फत देण्यात येणारे कर्ज हे गृहकर्जाखाली मोडत नाही इत्यादी माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा अपिलकर्ता याचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. ०८/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.२४/०८/२०१० रोजी

मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती व त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असे दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील क्र. ६७९४/०२ व अपील क्र. ६८४१/०२ निकाली काढण्यात येते.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २७-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**निवडनस्ती**
**स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.०८/अपील क्र.६८०२/०२**

**श्री. अनिलकुमार धोत्रे,**
**३३ के/१७/मुगभाट क्रॉसलेन,**
**गिरगाव, मुंबई ४०० ००४. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,**
**शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांचे कार्यालय,**
**जवाहर बालभवन, नेताजी सुभाष पथ,**
**चर्नीरोड (प.), मुंबई ४००००४.**

**जन माहिती अधिकारी**
**शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांचे कार्यालय,**
**जवाहर बालभवन, नेताजी सुभाष पथ,**
**चर्नीरोड (प.), मुंबई ४००००४. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक ०२/१२/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - २८/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - प्रतिनिधी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ३०/०४/२०१० रोजी जन माहिती अधिकारी, शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयामधून श्री. अनिलकुमार धोत्रे स्वत: अर्जदार यांच्याकडून प्राप्त झालेले पत्र शासनाच्या शालेय शिक्षण क्रिडा व विभाग यांचे पत्र दि.२५/०७/२००९ अन्वये शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयात पाठविण्यात आलेले आहे. त्यापत्रावर कार्यालयीन टिप्पणी तसेच अर्जदार यांना पाठविण्यात आलेल्या उत्तराची प्रमाणित प्रत. त्याचप्रमाणे कार्यबळ गटाच्या बैठकीत एस.एल. ॲन्ड एस.एस. गर्ल्स हायस्कूल शाळेतील श्रीमती पुष्पा बडतरे यांच्यासंदर्भात तसेच चिकित्सक समूह, शिरोळकर हायस्कूल मधील श्री. मनोहर रुपचंद नारखेडे यांच्या संदर्भात झ ालेल्या बैठकितील चर्चा व निर्णय घेतला गेला त्या इतिवृत्ताची प्रत इ. माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही

म्हणून त्यांनी दि. १५/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यांनतर दि. १७/०६/२०१० रोजी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि. ३०/०४/२०१० रोजीच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपिलाची सुनावणी दि. २४/०८/२०१० रोजी घेण्यात आलेली आहे. त्या संदर्भात दि. ०९/०९/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी संपूर्ण कागदपत्रे विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आली असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी आयोगासमोर युक्तीवाद करताना असे सांगितले की त्यांना ज्या जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली होती ते जन माहिती अधिकारी आज हजर नाहीत व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलाची सुनावणी न घेता सहसंचालक यांनी सुनावणी घेतली होती. तसेच त्यांनी मागितलेली माहिती ही त्यांना विलंबाने व अपूर्ण अशी माहिती प्राप्त झालेली आहे. त्यांना कोणत्याही प्रकरची कागदपत्रे उपलब्ध झालेली नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना आयोगपुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती आता मागितलेली आहे या संदर्भामध्ये ते वारंवार अनेक माध्यमातून तक्रारी करुन हा मुद्दा कायम ठेवीत आहेत. सन २००६ पासून मा. लोकपाल, मा. आमदार, तसेच शासनाकडे वेगवेगळया पध्दतीने तक्रारी करत असतात व त्यामुळे ही सर्व कागदपत्रे या प्राधिकरणाकडे वारंवार पाठविले जातात तसेच त्यांना सुध्दा प्रत्येक वेळेस ही संपूर्ण कागदपत्रे दिलेली आहेत व त्यामुळे एकचएक विषयाकरिता अनेक माध्यामातून तक्रारी करत राहणे असेच सुरु आहे.

अपिलकर्ता यांनी पत्रे मिळाली परंतु अहवालाची कागदपत्रे मिळाली नाहीत असा युक्तीवाद करुन त्यामध्ये त्यांनी गुणवत्तेबाबत युक्तीवाद केलेला आहे. परंतु त्यांच्या पत्रावरती अहवाल कसा करावा किंवा कार्यबळ गटाने कोणते मुद्दे चर्चेस घेतले पहिजे या सदंर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करता येणार नाही व त्यावरच त्यांना ही सर्व कागदपत्रे मिळाली आहेत असा निष्कर्ष काढावयास लागतो असे असले तरी विद्यमान प्रभारी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना पूर्वी अनेक वेळा ही कागदपत्रे दिलेली असली तरी आतासुध्दा कागदपत्रांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देण्यास त्यांची हरकत नाही त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांच्या दि. ३०/०४/२०१० रोजीच्या अर्जामध्ये मागितलेली माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती पुनः विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.०७/अपील क्र.६८०१/०२**

**श्री. कमाल अहमद खॉंन,**
**रुम नं. ३६/०१/१ , प्रबुध नगर,**
**रफी अहमद किडवाई रोड, वडाळा,**
**मुंबई ४०००३१.** **.... अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**प्रमुख सामाजिक विकास कक्ष,**
**नियोजन विभाग, ७ वा मजला, ए विंग,**
**एम. एम. आर. डी. ए. इमारत,**
**बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पू.), मुंबई ४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सामाजिक विकास विशेषज्ञ,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**प्रमुख सामाजिक विकास कक्ष,**
**नियोजन विभाग, ७ वा मजला, ए विंग,**
**एम. एम. आर. डी. ए. इमारत,**
**बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पू.), मुंबई ४०००५१.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - निरंक (नोंदणी दिनांक ०३/०१/२०११)**
**सुनावणीचा दिनांक - २८/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी -अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०४/०८/२०१० रोजी जन माहिती अधिकारी, आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे घाटकोपर बोरले ठेकेदार नटवर पारिख बिल्डिंग नं ५ C नेशनल को. हौ. सो. के अन्तर्गत कौन कौन मकानो दुकानो मे कौन कौन लोगो को पोजीशन कब्जा मिला है? एम. एम.आर डी. ए. के पास रजिस्टर्ड स्थापित सोसायटी के अभिलेख के अनुसार ५ C बिल्डिंग के सभी लोगो की सूची दी जाए, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्वत: घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.

२६/०८/२०१० रोजी घाटकोपर बोरले ठेकेदार नटवर पारिख कंपाऊड, लल्लू भाई कंपाऊंड, मानखुर्द, येथील पुर्नवसन वसाहतीमधील सन २००७ ते २०१० पर्यंत किती संस्था नोंदणी झाल्या या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. ३०/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. निरंक रोजी देण्यात आलेला दिसून येतो. त्यामध्ये अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती एम.एम आर.डी. ए. यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे व ती माहिती कोणत्या कार्यालयात उपलब्ध आहे याबद्दलची माहिती नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अलिपकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती आतापर्यंत दिलेली आहे, त्यामध्ये बिल्डिंग नं ५ c घाटकोपर बोरला (नटवर पारिख R &R site) संदर्भात सोसायटी पंजीबध्द झालेल्याची माहिती त्यांना दिलेली नाही. त्या संपूर्ण इमारतीमध्ये निवासी गाळयांमध्ये रहिवासी तथा त्या इमारतीमधील दुकाने सुध्दा दिलेली आहेत. सदरची इमारत ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणची आहे. तसेच त्या ठिकाणी नॅशनल को. हौ. सो. पंजीबध्द आहे असा बोर्ड असून सुध्दा सदरच्या सोसायटीची माहिती किंवा त्या इमारतीतील रहिवास्यांची माहिती एम.एम.आर.डी.ए. यांच्याकडे उपलब्ध नाही असे म्हटले म्हणजे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करणे असेच आहे व ती माहिती लपविण्याचा प्रयत्न करित आहेत.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर असून त्यांनी कोणती ही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दि. ३१/०५/२०१० रोजीच जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांना नोटीस निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. अपिलकर्ता यांना नोटीस उपलब्ध होते व जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांना ती मिळत नसावी असे म्हणता येणार नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी हे आयोगापुढे उपस्थित न होता माहिती लपविण्याचा प्रयत्न करित आहेत अशी आयोगाची खात्री झ ालेली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१. अपिलकर्ता यांचे अपील अशंतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना बिल्डिंग नं ५ c घाटकोपर बोरला (नटवर पारिख R & R site) या इमारतीतील रहिवास्यांनी सहकारी संस्था स्थापन केलेली आहे किंवा नाही व ती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पंजिबध्द केलेली आहे किंवा नाही याबद्दलची माहिती तसेच सदरची इमारत ही मुंबई उपनगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बांधकाम केलेली**

आहे किंवा नाही या संदर्भात हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत अपिलकर्ता यांना विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. जन माहिती अधिकारी हे आज आयोगापुढे सुनावणीस उपस्थित झालेले नसल्यामुळे व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सादर केलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये या बद्दलचा खुलासा त्यांनी आयोगापुढे येऊन दहा दिवसाचे आत करावा. तसे न केल्यास त्यांच्या विरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २८-०६-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१. निवडनस्ती
२. स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.८०५/अपील क्र.६८००/०२**

**श्री. गिरीश गजानन कोचरेकर,**
**फ्लॅट नं अ - ३०३, जगत विद्या को.ओ.हौ. सो.,**
**कलानगर रोड , बांद्रा (प.), मुंबई ४०००५१.** **.... अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,**
**वित्त विभाग/ वि. प्र. ३, मादाम कामा रोड,**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**वित्त विभाग/ वि. प्र. ३, मादाम कामा रोड,**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - २०/०१/२०११.**
**सुनावणीचा दिनांक - २८/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.११/०९/२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांचे स्वतःचे वार्षिक गोपनीय अहवाल दि. ०१/०४/१९९४ ते दि.१९/०१/२०१० तसेच श्री. बोधडे यांचे १५ वर्षाचे म्हणजे दि. ०१/०४/१९९४ ते ३०/०४/२००८ पर्यंतचे उपलब्ध करुन देण्यात यावेत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दि. ०६/१०/२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १८ (१) (त्र) (section 8 clause J) विचारात घेऊन मागणी नाकारण्यात येत आहे, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि २८/१०/२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.१६/११/१० रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, ते स्वतः व श्री. बोधडे हे एकाच संवर्गातील आहेत व श्री. बोधडे हे त्यांना कनिष्ठ असताना श्री. बोधडे यांना त्यांचेपेक्षा जास्त वेतन मिळत होते याकरिता त्यांनी वेळावेळी निवेदन केली परंतु त्याबाबत

कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला नाही आणि त्यामुळे स्वतःचे गोपनीय अहवाल (न्यायाधिकरणाचे सदस्य असताना) तसेच श्री. बोधडे यांच्या गोपनीय अहवालाची माहिती त्यांनी तुलना करुन वस्तुस्थिती जाणून घेण्याकरिता मागितलेली होती. परंतु गोपनीय अहवाल ही वैयक्तिक माहिती आहे या कारणास्तव जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १८ (१) (त्र) प्रमाणे ती माहिती नाकारली आहे. वास्तविक गोपनीय अहवाल हे सार्वजनिक सेवकाच्या कार्यक्षमतेच्या संदर्भामध्ये लिहिण्यात येतात व त्यामुळे ते सार्वजनिक अभिलेखाचाच भाग होतात. ती संबधित सार्वजनिक सेवकाची वैयक्तिक माहिती होत नाही. सार्वजनिक सेवकांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन अधिकारी किंवा पुनर्विलोकन अधिकारी यांच्या अभिप्रायास दिलेले असतात त्या अभिप्रायाची माहिती सुध्दा गोपनीय माहिती किंवा वैयक्कि माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तसेच जी माहिती राज्य विधान मंडळात उपलब्ध करुन देता येते ती माहिती प्रकट करण्याकरिता अपवाद करता येणार नाही अशी तरतूद असल्यामुळे व कोणत्याही सार्वजनिक सेवकाची माहिती ही राज्य विधान मंडळाने मागितल्यास नाकारता येणार नाही. त्यामुळे ती अपिलकर्ता यांना सुध्दा नाकारणे योग्य होणार नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, केंद्र शासनाचे परिपत्रका प्रमाणे तसेच आयोगाच्या पूर्वीच्या निर्णयांप्रमाणे गोपनीय अहवालाच्या संदर्भातील माहिती ही वैयक्तिक माहिती आहे या काणास्तव ती नाकारण्यात आलेली आहे. शासनाचे सेवेतील अधिकारी यांना भारताचे संविधानाच्या अनुच्छेद, ३११ प्रमाणे सेवेच्या संदर्भामध्ये संरक्षण देण्यात आलेले आहे व त्यांची कोणत्याही प्रकारे चौकशी केल्याशिवाय कोणत्याही प्रकारची शास्ती ही त्यांच्या विरुध्द लादता येत नाही असे असल्यामुळे प्रत्येक शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांची कार्यक्षमता ही तपासण्याच्या दृष्टिने किंवा कायम ठेवण्याच्या दृष्टिने शासनामध्ये दरवर्षी प्रत्येक कर्मचाऱ्याचे गोपनीय अहवाल हे कार्यक्षमतेच्या दृष्टिने त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लिहिण्याचा अधिकार देण्यात आलेला असतो. वर्षभरामध्ये त्या शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या कामकाजाच्या दृष्टिने कोणत्या प्रकारची कार्यक्षमता दाखविलेली आहे अशॉ प्रकारचा अहवाल त्या शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या पुढील सेवेच्या संदर्भात आवश्यक असतो. त्यामुळे अशा प्रकारचे गोपनीय अहवाल हे त्या कर्मचाऱ्यांचे किंवा अधिकाऱ्यांचे वैयक्तिक अहवाल न होता ती सार्वजनिक अभिलेखाचाच भाग होतात. परंतु असे असले तरी प्रतिवेदन किंवा पुर्नविलोकन अधिकारी यांचे अभिप्राय त्या कर्मचाऱ्याचे संदर्भात दिलेली असतात, ते त्या अधिकाऱ्याचे वैयक्तिक निरिक्षण असल्यामुळे व त्याच अभिप्रायाच्या आधारावर गोपनीय अहवालाची प्रतवारी काढण्यात येत असल्यामुळे प्रतिवेदन व पुर्नविलोकन अधिकाऱ्यांचे अभिप्राय हे उपलब्ध करुन देणे हे योग्य नाही. मात्र प्रत्येक अधिकाऱ्यांच्या संदर्भात जी प्रतवारी काढलेली असते ती अधिकारी किंवा कर्मचारी यांना सुध्दा कळविण्यात आलेली असते व त्या प्रतवारीच्या आधारावरच त्यांच्या पुढील सेवे संदर्भामध्ये जे निर्णय घेतले जातात ते अर्थातच सार्वजनिक सेवक म्हणूनच घेतले जातात. त्यामुळे गोपनीय अहवालाची प्रतवारी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणतीही हरकत असता

कामा नये. त्यातूनच प्रत्येक विभागाच्या अधिकऱ्यांची कार्यक्षमता दिसून येते. त्याप्रमाणे राज्य माहिती आयोगापुढील अपिल क्र. मुमाआ/३२२/अपील क्र.६६४३/२०११/०२, अपील क्र.मुमाआ/५०६९२/६७००/२०११/०२, श्री. नंदकुमार माधवराव धुमाळ विरुध्द जन माहिती अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. देवप्पा अण्णप्पा गावडे विरुध्द जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वित्त विभागाने निर्णय दि. ०९/०५/११ रोजी, दि. १८/०५/११ रोजी मिळालेल्या निर्णयाप्रमाणे अपिलकर्ता यांना त्यांच्या स्वतःच्या गोपनीय अहवालासंदर्भातील तसेच श्री. बोधडे यांच्या गोपनीय अहवाला संदर्भातील

दरवर्षाची प्रतवारी कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि. ११/०९/१० रोजीच्या अर्जात मागितलेली माहिती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २८-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**निवडनस्ती**
**स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.५०६५९/अपील क्र.६७९९/०२**

**श्री. चंदू तुलसीदास पाहूजा,**
**सी- ६०३, ॲटलांन्टा को. ऑप.हौ.सो. लि.,**
**एव्हरशाईन नगर, मालाड, मार्वे लिंक रोड,**
**मालाड (प.), मुंबई ४०००६४. ... अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इ. प्र.),**
**पश्चिम उपनगर, पी/ दक्षिण,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय,**
**२ रा मजला, ९० रोड, संस्कृती कॉम्प्लेक्स**
**आणि सेंट लॉरेन्स शाळेजवळ, ठाकूर कॉम्प्लेक्स,**
**कांदिवली (पू.) मुंबई ४००१०१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. प्र.),**
**पश्चिम उपनगर, पी/ दक्षिण,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय,**
**२ रा मजला, ९० रोड, संस्कृती कॉम्प्लेक्स,**
**आणि सेंट लॉरेन्स शाळेजवळ, ठाकूर कॉम्प्लेक्स,**
**कांदिवली (पू.) मुंबई ४००१०१. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - १८/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - २८/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.**
**प्रतिनिधी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. २६/०६/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. प्र.), PN वॉर्ड, कांदिवली (पू.) यांचेकडे अटलांटा सहकारी संस्था संदर्भात एकूण ११ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि. २१/०१/१० रोजी माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु मागितलेल्या माहितीच्या संदर्भात नस्तीचे

निरिक्षण करावे व निरिक्षणाअंती खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. १२/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. १३/०९/२०१० रोजी देण्यात आलेला असून "जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य आहे तसेच अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव हा कार्यालयाकडे आलेला नाही किंवा परवानगी दिलेली नाही त्यामुळे अपिलकर्ता यांनी संबधित वॉर्ड ऑफिस यांच्याकडे तक्रार करावी" असा निर्णय दिलेला असून प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु तरी सुध्दा अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना ११ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली होती व त्या मुद्यांमधील कागदपत्रांचे त्यांनी वर्णन केलेले आहे. त्यामुळे सदरची कागदपत्रे काढून त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यांनी मोघम माहिती मागितलेली नाही व त्यामुळे संपूर्ण नस्तीचे निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे जे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, त्यांनी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ७, ८, व इतर मुद्यांमध्ये मोघम माहिती मागितलेली आहे, ती माहिती उपलब्ध असल्यास द्यावी याचा अर्थ संपूर्ण कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी तपासणी करावी. इमारतीच्या संदर्भात जे अभिलेख असतात त्या अभिलेखामध्ये भरपूर प्रमाणात कागदपत्रे असतात, त्यामुळे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी तपासणी करावी व माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले होते.

अपिलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता काही मुद्यांच्या संदर्भात त्यांनी निश्चित कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागितलेल्या आहेत त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. ज्यामध्ये मोघम माहिती मागितलेली असेल त्या मुद्यांच्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविण्यास हरकत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांच्या दि. २८/०६/२०१० रोजीच्या अर्जामध्ये ज्या मुद्यांतून निश्चित कागदपत्रांचे वर्णन करुन माहिती मागितलेली आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचा खर्च त्यांना कळवावा व खर्चाचा भरणा मिळाल्यानंतर छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात, ज्या मुद्यांच्या संदर्भात मोघम माहिती मागविलेली आहे त्या संदर्भात स्पष्टपणे कळविण्यात यावे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २८-०६-२०११.
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवडनस्ती
स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.०९/अपील क्र.६८०७/०२**

**श्री. आर. जी. मूलतानी,**
**२२८/२३०, मोतीवाला मेन्शन,**
**२ रा मजला, डंकन रोड, मुंबई ४००००८. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता(इ. प्र.) शहर,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, 'ई' विभाग म्युन्सिपल कार्यालय,**
**तिसरा मजला, १० शेख हाफिझुद्दिन मार्ग,**
**भायखळा (प.) मुंबई ४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ( इ. प्र)शहर- II**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, 'ई' विभाग म्युन्सिपल कार्यालय,**
**तिसरा मजला, १० शेख हाफिझुद्दिन मार्ग,**
**भायखळा (प.) मुंबई ४००००८. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - निरंक**
**सुनावणीचा दिनांक - २९/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ०२/०६/१० रोजी जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता (इ.प्र.) City II यांच्याकडे IOD No.EB/4807/EA, dtd 08/10/2009 IOD plan approved by Ex.Eng. MCGM on false area which is no there in P.R Card and without update P.R Card in name of Owner, IOD condition No. 8, IOD condition No. 23, IOD condition No. 35, IOD condition No. 36, IOD condition No. 41 बाबत तसेच माहिती आहे किंवा आहे किंवा नाही अशी द्यावी नस्तीचे निरिक्षण देऊ नये अशी माहिती त्यांनी मागितलेली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१/०७/१० रोजी माहिती उपलब्ध आहे निरिक्षण करुन खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दि. २३/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. २३/०८/१० रोजी दिलेला असून अपिलकर्ता यांनी जे प्रश्न उपस्थित केले होते त्या प्रश्नासंदर्भात जन माहिती

अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित नाहीत असे त्यांनी सांगितले व त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध झाली नाही त्यावर जन माहिती अधिकरी यांनी सांगितले की, अपिलकर्ता यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये IOD संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितले होते. तसेच फाईल निरिक्षण नको असे सुध्दा कळविलेले आहे. तरी सुध्दा त्यांनी निरिक्षण घ्यावे असे कळविण्यात आलेले आहे व त्यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा नस्तीचे निरिक्षण घ्यावे व कागदपत्रे उपलब्ध करुन घ्यावीत असा निर्णय दिलेला असल्यामुळे पुन्हा त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी IOD condition पूर्ण केली किंवा नाही अशाप्रकारचे अभिप्राय मागितलेले होते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्राधिकरणातील अभिप्राय अभिप्रेत नसल्यामुळे त्यांनी नस्तीचे निरिक्षण करुन आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन घेऊन योग्य तो निष्कर्ष काढावा असे त्यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस सुध्दा सांगितले होते. अपिलकर्ता यांनी पूर्वी सुध्दा दि. २०/०२/१० रोजी माहितीचा अर्ज केला होता व त्यामध्ये सुध्दा नस्तीचे निरिक्षण नको असेच दिलेले होते IOD च्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली होती.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (ज) प्रमाणे माहिती या संज्ञेच्या व्याख्येत कार्यालयामध्ये साहित्य स्वरुपात उदा. कागदपत्रे, दस्तऐवज इ. स्वरुपात ती माहिती उपलब्ध असते त्याचा समावेश होतो. त्याचप्रमाणे अधिनियमाचे कलम (त्र) मध्ये माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमाप्रमाणे मिळविता येण्याजोगी माहिती यामध्ये कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज यांचे निरिक्षण करणे व छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूदी आहे. त्यामध्ये त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांचे एखाद्या प्रकरणातील निर्णय प्रक्रिया किंवा गुणवत्तेसंदर्भात अभिप्राय अपेक्षित नाहित. त्यामुळे अपिलकर्ता यांना IOD condition fulfil झाली किंवा नाही याबद्दलचे अभिप्राय उपलब्ध करुन न देता त्या संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन घेऊन त्यातून अपिलकर्ता यांनी योग्य तो निष्कर्ष काढावा असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी निरिक्षण करुन माहिती घ्यावी. त्यामुळे अपिलकर्ता यांना संबधित नियमांची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**--- आदेश ---**

**५. अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांना कळवून नस्तीचे निरिक्षण करावे किंवा अपिलकर्ता यांना जन माहिती**

अधिकारी यांनी उपलब्ध असलेली संबधित नियमांची प्रत उपलब्ध करुन द्यावी.

६. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २९-०६-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

३) निवडनस्ती
४) स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र.५०६७५/अपील क्र.६७९६/०२**

**श्री. मुन्ना मिश्रा,**
**८ बी, गोरेगाव म्युन्सिपल मार्केट,**
**टोपीवाला रोड, गोरेगाव (प),**
**मुंबई ४०००६२. .... अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,**
**पी- विभाग, इमारत प्रस्ताव, पश्चिम उपनगरे-२,**
**पी विभाग, ९० फुट रोड, ठाकूर कॉम्प्लेक्स,**
**कांदिवली (पू.), मुंबई ४०० १०१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**पी- विभाग, इमारत प्रस्ताव, पश्चिम उपनगरे-२,**
**पी विभाग, ९० फुट रोड, ठाकूर कॉम्प्लेक्स,**
**कांदिवली (पू.), मुंबई ४०० १०१. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक -१६/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २७/०६/२०११ व २८/०६/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी प्रतिनिधी - दि. २७/०६/२०११ उपस्थित**
**जन माहिती अधिकारी - दि. २८/०६/२०११ रोजी उपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ०१/०७/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पी- विभाग यांच्याकडे, १) मालाड पश्चिमेकडील आरक्षित असलेल्या भूखंडाच्या न.भू.क्र. १४०६/अे/३/९ मालाड पश्चिम येथील भूखंडाची सध्याची स्थिती काय, २) सदर भूखंडावर सध्या कोणत्या पध्दतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे किंवा नाही, ३) बांधकाम करण्यात यावयाचे असल्यास कार्यालयाकडे परवानगी प्रस्ताव टाकण्यात आलेला आहे का? आला असल्यास त्या प्रस्तावाची प्रत तसेच ४) या भूखंडाच्या आराखडयाची प्रमाणित प्रत मिळणेबाबत. तसेच वर्ष २००१ ते आजतागायत माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. १५/०९/१० रोजी प्रथम अपील

दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.१४/१०/१० रोजी देण्यात आलेला असून अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे त्यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीये अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, न.भू.क्र. १४०६/अे/३/९ मालाड (प.) हा आरक्षित भूखंड होता व त्या आरक्षित भूखंडावर बांधकाम सुरु असल्यामुळे त्यांनी ही माहिती मागितलेली होती. परंतु माहिती विहित मुदतीत मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता हरकत घेतलेली आहे असे दि. २६/०७/१० रोजी त्यांना कळविण्यात आले होते. तसेच विकासकाच्या वकिलाने माहिती उपलब्ध करुन दिली तर त्यांच्या व्यवसायिक स्पर्धा स्थानावर, व्यापारी व व्यावसायिक गणितांवर तसेच वास्तुशास्त्रांचे copy right च्या संदर्भात हानी होण्याची शक्यता आहे व तसेही सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यामध्ये कोणतेही व्यापक जनहित नाही. मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीने सुध्दा आराखडे उपलब्ध करुन देणे योग्य नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, इमारत व कारखाने विभाग हे आरक्षणाच्या बाबत कोणतेही प्रकरण हाताळत नाही, D.P, Department हे प्रकरण हाताळते आणि तसेही विकासकाने त्यांच्या वकिलाच्या माध्यामातून त्रयस्थ पक्ष म्हणून माहिती उपलब्ध करुन देण्यास हरकत घेतलेली आहे.

श्रीमती हंसा आडवाणी यांनी सदरच्या अपिलाच्या संदर्भात त्रयस्थ पक्ष म्हणून हजर होण्याकरिता आयोगापुढे परवानगी मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ १९(४) अन्वये माहिती जर त्रयस्थ पक्षाशी संबधित असेल तर त्रयस्थ पक्षाचे म्हणणे आयोगाने ऐकून घेणे बंधनकारक आहे परंतु असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाची व त्रयस्थ पक्षाशी संबधित माहिती असली तरी त्या संदर्भात अधिनियमाचे कलम ११ (१) अन्वये त्रयस्थ पक्षास रितसर नोटीस देऊन त्यांचे काय म्हणणे आहे हे दहा दिवसात ऐकून घेऊन स्वत: सदरची माहिती ही उपलब्ध करुन दिल्याने त्रयस्थ पक्षास काय हानी होणार आहे किंवा त्यापेक्षा व्यापक जनहित मोठे आहे असे दिसून आल्यास त्याप्रमाणे निर्णय देणे आवश्यक आहे. आयोगापुढे युक्तिवाद करताना त्रयस्थ पक्षाचे वकिल श्रीमती आडवाणी यांनी युक्तीवादात विकासकाच्या Commercial and Trade Secrets वर परिणाम होईल. तसेच त्यांच्या स्पर्धात्मक स्थानास धक्का बसेल तसेच सध्या अतिरेक्यांपासून सुरक्षिततेचा सुध्दा प्रश्न उपस्थित होतो असे सांगितले. परंतु, त्याप्रमाणे त्यांनी कोणत्याही प्रकारचा तपशीलात युक्तीवाद केलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाशी किंवा त्रयस्थ पक्षाने सदरची माहिती गोपनीय आहे असे कळविले असल्यास त्याप्रमाणे त्रयस्थ पक्षास अधिनियमाचे कलम ११(१) अन्वये विचारणा करुन प्रक्रिया पूर्ण करुन Intellectual property rights, copy rights, causing harm and injury to the competitive position, commercial and trade secrets तसेच सुरक्षितता या संकल्पनांच्या संदर्भात तपशीलात विश्लेषण करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबद्दलचा निर्णय करणे संयुक्तिक राहील जेणे करुन त्रयस्थ पक्ष किंवा अपिलकर्ता

यांना प्रथम अपील व द्वितीय अपीलांत सदरच्या मुद्यावर पुन्हा तपशीलात युक्तीवाद करण्याची संधी मिळेल त्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी कलम ११ प्रमाणे प्रक्रिया करुन कारणमिमांसा देणारा निर्णय देणे संयुक्तीक राहील.

**--- आदेश---**

**जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या दि. ०१/०७/२०१० रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्रयस्थ पक्षाची किंवा त्रयस्थ पक्षाशी संबधित माहिती असल्याने किंवा माहिती गोपनीय आहे असे कळविलेले असल्यास त्रयस्थ पक्षाचे म्हणणे कलम ११ प्रमाणे ऐकून त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबद्दलचा कारणमिमांसा देणारा निर्णय द्यावा. त्या निर्णया विरुध्द अपीलकर्ता व त्रयस्थ पक्ष यांना प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करण्याचा अधिकार राहील.**

**अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक: २८/०६/२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मुळ आदेशाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**श्रीमती हंसा अडवाणी, ॲडव्होकेट, उच्च न्यायालय, ४ था मजला, तुलसी बिल्डिंग, हिंदुजा मार्ग, १४ वा रोड, खार(पश्चिम), मुंबई-५२**
**निवडनस्ती**
**स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र. ०३ /अपील क्र.६७९२/०२**

**श्री. कांचन कृष्णा बापर्डेकर,**
**२/३३, मयूर सोसायटी चाळ नं २,कॉलेज लेन,**
**दादर (प.), मुंबई ४०००२८. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई,**
**नवीन प्रशासकीय इमारत, १३ वा मजला,**
**मुंबई ४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (का.२),**
**राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई,**
**नवीन प्रशासकीय इमारत, १३ वा मजला,**
**मुंबई ४०००३२. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक ०६/१२/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - २७/०६/२०११.**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.३०/०४/२०१० रोजी जन माहिती अधिकारी राज्य माहिती आयोग यांचे कडे दि. २३/०४/२०१० रोजीच्या झालेल्या सुनावणीच्या वेळी माहिती अधिकारी उपनिबंधक (मत्स्य) व अपील अधिकारी आयुक्त (मत्स्य) यांनी वरळी कोळी समाज या संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सांक्षाकित करुन मिळाव्यात तसेच सदर सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी संस्थेने राज्य माहिती आयक्तांना दिलेल्या अर्जाची व त्यास राज्य माहिती आयुक्तांनी दिलेली संमती पत्राच्या छायांकित प्रती सांक्षकित करुन मिळाव्यात अशाप्रकारे माहिती मागितलेली दिसून येते. परंतु विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांना दि. ०२/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये अपिलकर्ता यांनी दि. १०/०८/२०१० रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळ सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली परंतु ती विलंबाने मिळाल्यामुळे त्यांनी द्वितीय अपिलाच्या सुनावणीस कागदपत्रे सादर करता आली नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये अपील क्रमांकाचा संदर्भ दिलेला नाही त्यामुळे सदरचे अपील हे राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई, यांचे कार्यालयामध्ये त्याच दिवशी सुनावणी झालेली नसल्यामुळे राज्य मुख्य माहिती आयुक्त, यांचे कार्यालयामध्ये हस्तांतर केलेले दिसून येते. मात्र राज्य मुख्य माहिती आयुक्त, यांचे कार्यालयात सुध्दा सुनावणी तारखेवरुन त्या अपिलाच्या संदर्भात कोणताही संदर्भ लागलेला नसल्यामुळे माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु विलंब हा अपिलकर्ता यांनी अपील क्र. न दिल्यामुळे झालेला आहे, असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. सदर प्रकरणी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**--- आदेश ---**

**३) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २७-०६-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**निवडनस्ती**
**स्वीय सहाय्यक**